# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

एम. ए. भाग–१ : राज्यशास्त्र

# भारताचे परराष्ट्र धोरण

**(Foreign Policy of India)**

**सत्र १ : पेपर २ (ऐच्छिक)**

(शैक्षणिक वर्ष २०१८–१९ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०१८

एम. ए. (राज्यशास्त्र) भाग-१ पेपर २ (ऐच्छिक)

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-81-939381-9-5

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


### सल्लागार समिती

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### राज्यशास्त्र समन्वय समिती

अध्यक्ष - **डॉ. व्ही. एम. पाटील**
आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, रामानंदनगर, जि. सांगली

- **प्रा. डॉ. पी. आर. पवार**
  अधिविभागप्रमुख,
  राज्यशास्त्र विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. मेजर एम. आर. घनवट**
  मुधोजी कॉलेज, फलटण,
  जि. सातारा

दूर शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**भारताचे परराष्ट्र धोरण**
**एम. ए. भाग–१ : राज्यशास्त्र ऐच्छिक पेपर २**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **प्रा. सागर जाधव**<br>संत गाडगेबाबा महाविद्यालय, कापशी | १, ३ |
| **डॉ. रविंद्र भणगे**<br>राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २, ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. रविंद्र भणगे**
सहयोगी प्राध्यापक,
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूर शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूर शिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक एम. ए. भाग एक च्या राज्यशास्त्र विषयाच्या ऐच्छिक पेपर क्रमांक २ सत्र एक साठी 'भारताचे परराष्ट्र धोरण' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

भारताचे परराष्ट्र धोरण यामध्ये भारताच्या परराष्ट्र धोरणाचे वैचारिक अधिष्ठान, भारतीय परराष्ट्र धोरणावरील प्रभाव, शीतयुद्धोत्तर काळातील भारताचे इतर राष्ट्राशी संबंध व भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसमोरील संघर्षकालीन आव्हाने या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. डी. बी. शिंदे यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. त्याचप्रमाणे राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, राज्यशास्त्र विभागाच्या माजी विभागप्रमुख डॉ. वासंती रासम, डॉ. भारती पाटील, राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ मधील प्राध्यापक डॉ. भगवान माने, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शिरिष पवार व अधिसभा सदस्य डॉ. वसंत पाटील व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूर शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे दूर शिक्षण केंद्रातील सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

■ **संपादक** ■

**डॉ. रविंद्र भणगे**
सहयोगी प्राध्यापक,
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र**

अध्यक्ष – **प्रा. डॉ. श्रीमती भारती तुकाराम पाटील**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **प्रा. डॉ. प्रकाश पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. राजेंद्र कुरळपकर**
  के.आर.पी. कन्या महाविद्यालय, उरुण-इस्लामपूर,
  जि. सांगली
- **डॉ. एस. जी. कुंभार**
  राजा श्रीपतराव भगवंतराव कॉलेज, औंध,
  जि. सातारा
- **डॉ. आर. आर. कांबळे**
  कर्मवीर हिरे आर्टस, सायन्स, कॉमर्स अॅण्ड
  एज्युकेशन कॉलेज, गारगोटी, जि. कोल्हापूर
- **डॉ. अनिता संजिव कणेगांवकर**
  डी.डी. शिंदे सरकार कॉलेज, महालक्ष्मी मंदीर जवळ,
  कोल्हापूर
- **डॉ. शिवाजी सुबराव पाटील**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **प्राचार्य डॉ. शिरिषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि. सातारा
- **प्रा. डॉ. श्रीमती उत्तरा सहस्त्रबुद्धे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **डॉ. श्रीमती मृदुल निळे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **प्रा. डॉ. ए. एस. चौसाळकर**
  आर. के. नगर हौसिंग सोसायटी,
  एमएसईबी ऑफीस समोर, कोल्हापूर
- **श्री. वैभव नायकवडी**
  हुतात्मा किसन अहिर शुगर मिल, वाळवा,
  जि. सांगली
- **श्री. दशरथ विठोबा पारेकर**
  फ्लॅट नं. ५०८, एव्हरग्रीन होम्स, फेज-४,
  टॉवर डी, प्रभू हॉस्पिटल रोड, नागाळा पार्क, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | भारताच्या परराष्ट्र धोरणाचे वैचारिक अधिष्ठा | १ |
| २. | भारतीय परराष्ट्र धोरणावरील प्रभाव | १४ |
| ३. | शीतयुद्धोत्तर काळातील भारताचे इतर राष्ट्रांशी संबंध | ३३ |
| ४. | भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसमोरील सद्यकालीन आव्हाने | ६१ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१७-१८ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## घटक-१

# भारताच्या परराष्ट्र धोरणाचे वैचारिक अधिष्ठान

# (Idealogical Foundation's of India's Foreign Policy)

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

 १.२.१ भारतीय परराष्ट्र धोरणातील तत्त्वे व उद्दिष्ट्ये

 अ) भारतीय परराष्ट्र धोरणातील तत्त्वे

 ब) भारतीय परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्ये

 १.२.२ भारतीय परराष्ट्र धोरणातील नेहरू कालखंड व नेहरूत्तर कालखंड

 १.२.३ जागतिकीकरणाच्या काळातील भारताचे परराष्ट्र धोरण

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयंअध्ययन प्रश्न व उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्ट्ये

'भारतीय परराष्ट्र धोरणाचे वैचारिक अधिष्ठान' या अभ्यास घटकाच्या अध्ययनाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. भारतीय परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक समजून घेणे.

२. भारतीय परराष्ट्र धोरणाची तत्त्वे व उद्दिष्टांची माहिती घेणे.

३. भारतीय परराष्ट्र धोरणावर नेहरू व त्यानंतरच्या पंतप्रधानांच्या कारकिर्दीचा प्रभाव समजून घेणे.

४. भारतीय परराष्ट्र धोरणावर जागतिकीकरणाचा प्रभाव जाणून घेणे.

## १.१ प्रास्ताविक

परराष्ट्र धोरणाची निर्मिती ही सर्वोच्च शासनकर्त्यामार्फत होत असते, पण आधुनिक काळातील लोकशाही व्यवस्थेत परराष्ट्र धोरणाची निर्मिती राज्याच्या शासनकर्त्यामार्फत होत असली तरी त्यावर वास्तविकपणे मंत्रीमंडळावर प्रभाव पडत असतो तसेच या परराष्ट्र धोरणासंबंधी कायद्यांना निर्णयांना कायदे मंडळाची संमत्ती घ्यावी लागते. या कायदेमंडळाच्या संम्मत्तीमध्ये अप्रत्यक्षपणे जनतेची संमत्ती असते. त्याचप्रमाणे परराष्ट्र धोरणाच्या निर्मितीत भौगोलिक, आर्थिक, राजकीय इत्यादी घटकांचाही विचार करावा लागतो, हे निर्धारित घटक परराष्ट्र धोरणाची मर्यादा स्पष्ट करतात. भारतीय परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करताना राजकीय नेतृत्त्वाप्रमाणेच या निर्धारित घटकांचाही अभ्यास 'भारतीय परराष्ट्र धोरणाचे वैचारिक अधिष्ठान' या घटकात आपण करणार आहोत.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ भारतीय परराष्ट्र धोरणातील तत्त्वे व उद्दिष्ट्ये

❒ **अ) भारतीय परराष्ट्र धोरणातील तत्त्वे**

**१. अलिप्ततेचे धोरण :–**

दुसऱ्या महायुद्धानंतर भारतीय परकीय धोरणाने संपूर्ण जगाला प्रभावित केले आहे. भारतीय परकीय धोरणाचा मुख्य आधार म्हणजे अलिप्ततेचे धोरण होय. अलिप्ततेच्या धोरणाचे अनेक अर्थ स्पष्ट होतात. अलिप्तता म्हणजे पृथकवाद याचा अर्थ आंतरराष्ट्रीय राजकारणापासून वेगळे राहण्याशी संबंधित आहे. दुसऱ्या अर्थ म्हणजे तटस्थता होय. नेहरूंनी स्पष्ट केले की, आमच्या स्वातंत्र्यास धोका निर्माण झाला असेल अशावेळी तटस्थ राहणार नाही. म्हणूनच अलिप्तता म्हणजे निष्क्रीय तटस्थता नव्हे, आणखी अर्थ म्हणजे असंबंधतावाद याचा अर्थ म्हणजे विश्वशक्तीच्या तणावापासून वेगळे राहणे होय.

**२. पंचशील तत्त्व :–**

भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी चीनचे पंतप्रधान चाऊ. एन. लाषिबरोबर पंचशीलाची घोषणा केली. भारताचे परकीय धोरणाचे पंचशील हे महत्त्वाचे तत्त्व म्हणून नेहरूंनी घोषीत केली.

(१) प्रादेशिक अखंडता.

(२) अनाक्रमण.

(३) हस्तक्षेप न करणे.

(४) समानता.

(५) शांततामय सहजीवन.

या पाच तत्त्वांचा परराष्ट्रीय धोरणाचा समावेश केला गेला. शांततामय सहअस्तित्वासाठी याची आवश्यक असल्यामुळे ते परकीय धोरणाचे एक महत्त्वाचे मानले जाते.

### ३. रंगभेद व जातीभेदाला विरोध :–

भारताने जातीभेद तसेच रंगभेदाला कडाडून विरोध केला. नोव्हेंबर १९४६ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत पहिल्या अधिवेशनात भारताने दक्षिण आफ्रिकेच्या जातीय भेदभावाच्या धोरणाची निंदा केली. आफ्रिकेत व अन्य अप्रगत देशात पाश्चात्य राष्ट्रांनी वर्णभेद धोरण अंमलात आणून काळ्या लोकांचा छळ केला. वर्णभेद भीषण समस्येचा अनुभव स्वत: महात्मा गांधीना आफ्रिकेत आला. संयुक्त राष्ट्रांनी दक्षिण आफ्रिकेच्या धोरणाची निंदा करताना दक्षिण आफ्रिकेविरुध्द आर्थिक प्रतिबंध करण्याचा निर्णय घेतला.

### ४. संयुक्त राष्ट्रांचे व आंतरराष्ट्रीय संघटनांचे समर्थन :–

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने संयुक्त राष्ट्राचे सभासदत्व स्विकारले आहे. युनोच्या सामूहिक सुरक्षा पद्धतीवर भारताचा विश्वास आहे व वेळोवेळी भारताने युनोला मदत केली आहे. सुरक्षा मंडळ, आर्थिक, सामाजिक मंडळ, आंतरराष्ट्रीय न्यायालय या युनोच्या महत्त्वपूर्ण अंगामध्ये भारतीय प्रतिनिधींनी सभासद म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे.

### ५. संयुक्त राष्ट्रांस सहकार्य :–

भारताने संयुक्त राष्ट्रांना प्रभावशाली बनवण्याची महत्त्वपूर्ण प्रयत्न केले. भारतीय संविधानाच्या ५१ व्या अनुच्छेदामध्ये आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षा आणि न्यायाच्या अभिवृत्तीची तरतूद केली आहे. संयुक्त राष्ट्राच्या विविध शांतता निर्माण करण्यासाठी सैन्य कारवाईत भारताचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे.

### ६. आशिया व आफ्रिकेतील राष्ट्रात मैत्रीभाव :–

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने आशिया व आफ्रिकेतील स्वातंत्र्य आंदोलनाला पाठिंबा दिला. आशिया व आफ्रिकेतील राष्ट्रात मैत्रीभाव तयार व्हावा म्हणून भारताने प्रयत्न केले.

## ७. जागतिक शांतता व सुरक्षिततेसाठी प्रयत्न :-

भारताच्या परराष्ट्रीय धोरणात भारताने जागतिक शांततेच्या पुरस्कार केल्यामुळे भारत सतत जागतिक शांततेसाठी प्रयत्नशील राहिला आहे. आपली जागतिक प्रतिष्ठा वाढविण्याच्या उद्देशाने राष्ट्राने विनाशकारी अशी शस्त्रास्त्रे तयार केल्याने सुरक्षितता टिकून राहिली.

## ❒ ब) भारतीय परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्ये

### १. राष्ट्रांचे संरक्षण :-

परकीय धोरणामध्ये राष्ट्रांचे संरक्षण करण्याचे उद्दिष्ट समोर असते. नैसर्गिक संपत्ती, त्या राज्याची भूमी यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी परराष्ट्र धोरणाला पार पाडावी लागली आणि त्यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात. जे राज्य केवळ आपल्या भूमीचे संरक्षण करण्याचे धोरण ठरविते त्या धोरणास 'यशस्थितीचे धोरण' असे म्हणतात, परंतु जे दुसऱ्या राज्याचे प्रदेश किंवा कोणाचाही हक्क नसलेले प्रदेश हस्तगत करण्याचे धोरण ठरविते त्या राज्यास सुधारणावादी धोरण असे म्हणतात. लष्करी शक्तीचा उपयोग, प्रत्यक्ष बोलणी करून अशा प्रकारचे धोरण आखले जाते. राष्ट्रांचे संरक्षण करत असताना त्या राज्याची भूमी तसेच नैसर्गिक संपत्तीचे जतन करणे, तसेच सांस्कृतिक मूल्यांचे जतन करणे यांचाही समावेश होतो. यामुळे भारताने राष्ट्रांच्या संरक्षणाच्या दृष्टीने आपल्या परराष्ट्र धोरणाची आखणी केली आहे.

### २. राष्ट्रीय शक्तीत वाढ :-

प्रत्येक राष्ट्राला आपली शक्ती वाढविण्यासाठी प्रयत्न करावे लागते. परराष्ट्र धोरणाची अंमलबजावणी व्यवस्थित होण्यासाठी शक्तीची आवश्यकता असते. शक्तीचा संचय नसल्यास धोरण अयशस्वी होवू शकते व त्याचा राष्ट्रावर विपरित परिणाम होण्याची शक्यता असते. सैन्य शक्तीची जेवढी वाढ होईल तेवढी राष्ट्रशक्तीची वाढ होत असते. राष्ट्रशक्तीत वाढ करण्यासाठी राष्ट्रे वेगवेगळ्या शस्त्रास्त्र निर्मिती करत असतात, त्यासाठी लष्करी स्वरूपाचे संरक्षणात्मक करार केले जातात. भारताने यादृष्टीने आपली राष्ट्रीय शक्ती वाढवण्यावर परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून प्रयत्न करते.

### ३. आर्थिक विकास :-

राज्याचा आर्थिक विकास घडवून आणणे हे राज्याचे प्रमुख उद्दिष्ट असते. राष्ट्राचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी राष्ट्रे एकमेकांमध्ये व्यापारी संधी करून आपले उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करतात. अलिप्त राष्ट्रेदेखील आर्थिक विकासाच्या उद्दिष्टांसाठी जागतिक शांतता व सहकार्याचे आवाहन करतात.

## ४. राष्ट्राला प्रतिष्ठा :-

जागतिक प्रतिष्ठा प्राप्त करण्यासाठी राष्ट्रे सतत प्रयत्नशील असतात. प्रतिष्ठा प्राप्त करण्यासाठी धडपडत असतात. अमेरिका, रशिया या राष्ट्रांनी संशोधन करून वैज्ञानिक प्रगती साधली आहे. त्यामुळे त्यांची प्रतिष्ठा वाढली असून, त्या दोन महाशक्ती समजल्या जातात. भारतानेही जागतिक राजकारणात परराष्ट्र धोरणातील तत्त्वानुसार आपली प्रतिष्ठा निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

## ५. भूमी विस्तारास विरोध :-

काही राज्ये आपल्या सीमांचा विस्तार करण्यासाठी प्रयत्न करतात. साम्राज्यवादी धोरणासाठी युरोपीय राष्ट्रांनी आर्थिक गरजा, राष्ट्रीय प्रतिष्ठा यासारखी अनेक कारणे दाखविली आहेत. इंग्लड, स्पेन, फ्रान्स इत्यादी राष्ट्रांनी मागास प्रदेशांमध्ये आपला प्रभाव वाढवून आपल्या विचारधारांचा प्रचार केला. व्यापाराच्या निमित्ताने मागास देशात प्रवेश मिळवून हळूहळू त्या देशांना आपल्या वसाहती बनवले. पण भूमी विस्तारात भारताचे परराष्ट्र धोरण अनुकूल नाही.

## ६. दबाव गटांचे हितसंवर्धन :-

प्रत्येक राष्ट्रांमध्ये आर्थिक, सामाजिक, धार्मिक इत्यादी स्वरूपाचे दबाव गट असतात. या दबाव गटांच्या हिताचे संरक्षण करणे हे परकीय धोरणाचे एक मध्यवर्ती उद्दिष्ट मानले जाते. परराष्ट्राचे धोरण जे निर्धारित करतात, त्यांना या दबाव गटांच्या प्रभावानुसार कार्य करावे लागते. भारत, अमेरिका इत्यादी देशांमध्ये दबाव गटांचे अधिक महत्त्व आहे. उदा. अमेरिकेतील यहुदी मतदारांचा दबाव गट तेथील परराष्ट्र धोरणाला, प्रभावित करीत असतो तर भारतातील मुस्लीम मतदारसंघ अंतर्गत व बाह्य धोरणांवर प्रभाव पाडतो. त्याचप्रमाणे देशांतील औद्योगिक व व्यापारी केंद्रे देखील दबाव गटांप्रमाणेच परिणामकारक ठरतात.

## स्वयं-अध्ययन प्रश्न-२

❑ **एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. पंचशील तत्त्वातील घटक सांगा?

२. अलिप्ततावाद धोरण म्हणजे काय?

# १.२.२ भारतीय परराष्ट्र धोरणातील नेहरू कालखंड व नेहरूत्तर कालखंड

## ❑ अ) भारतीय परराष्ट्र धोरणातील पं. नेहरू कालखंड :-

भारतीय परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणून नेहरूंना ओळखले जाते. नेहरूंनी भारतीय परराष्ट्र धोरणात आदर्श तत्त्वाचा आधार दिला, त्यांनी नैतिक मूल्यांची जोड परराष्ट्र धोरणाला दिली. नेहरूंचे

परराष्ट्र धोरण हे हितसंबंधांपेक्षा विचारसरणीवर भर देणारे होते. पंडीत नेहरूंच्या पंतप्रधान कारकिर्दीमध्ये (१९४७-६४) परराष्ट्र धोरणात एक मुरब्बी नेतृत्त्व व प्रभाव होता.

## ❀ पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणांची वैशिष्ट्ये :-

१) परराष्ट्र धोरणे आदर्शवादी असून नैतिक मूल्यांना अधिक स्थान होते.

२) परराष्ट्र धोरण हे मूल्यांपेक्षा हितसंबंधाना महत्त्व देते. पण पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणात हितसंबंधाना दुय्यम स्थान होते.

३) पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणामध्ये राष्ट्रीय सुरक्षेप्रमाणेच मानवी सुरक्षेला अधिक महत्त्व होते.

४) देशातील सामान्य माणसाला अन्न, वस्त्र, निवारा मिळणे हे त्याच्या परराष्ट्र धोरणाचे मुख्य उद्दिष्ट होते.

५) पंडित नेहरूंनी परराष्ट्र धोरणामध्ये अलिप्तवादी धोरणाचा स्विकार केला आहे.

६) पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणामध्ये पंचशील तत्त्व हे अत्यंत महत्त्वपूर्ण असून याद्वारे जागतिक शांतता निर्माण करण्याचे उद्दिष्ट होते.

७) वंश भेदाला विरोध करणे, साम्राज्यवादाला विरोध करणे, नि:शस्त्रीकरण हे मूलभूत तत्त्व परराष्ट्र धोरणात अंगीकारले आहेत.

अशाप्रकारे पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाची वैशिष्टये दिसून येत असून त्यांच्या परराष्ट्र धोरणाची तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत.

## १. विश्वशांतीला प्राधान्य :-

पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाचे विश्वशांतीला प्राधान्य हे तत्त्व असून याद्वारे कोणताही संघर्ष सोडवू शकतो असा नेहरूंचा विचार होता. यानुसार त्यांनी भारत-पाकिस्तान, भारत-चीन संघर्ष सोडवण्यास प्राधान्य दिले आहे.

## २. शांततामय सहजीवन आणि सहकार्याला प्राधान्य :-

नेहरूंच्या परराष्ट्र धोरणामध्ये हे महत्त्वपूर्ण तत्त्व असून याद्वारे सर्वांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित केले होते. जगात आता संघर्ष नको हा विचार त्यांनी जगाला दिला.

## ३. अलिप्तता :-

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व रशिया या दोन देशाच्या नेतृत्त्वाखाली जगात भांडवलशाही व साम्यवाद असे दोन गट निर्माण झाले होते. पण या दोन गटाच्या संघर्षाने युद्धांची परिस्थिती निर्माण

झाली होती. हे दोन्ही देश नवस्वातंत्र्य राष्ट्रांना आपल्या गटामध्ये घेण्याची चढाओढ सुरू झाली होती, यामुळे नवस्वातंत्र्य राष्ट्र सुप्त अवस्थेत होते. या राष्ट्रांना विकास करण्यासाठी दोन्ही गटाची आवश्यकता होती. यावेळी पंडित नेहरूंनी अलिप्तता हे धोरण स्विकारले. ज्यामध्ये दोन्ही गटांच्या संघर्षात मध्यम मार्ग मिळू शकेल. हे धोरण भारताच्या परराष्ट्र धोरणाचे अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले.

### ४. साम्राज्यवाद व वंशवादाला विरोध :-

पंडित नेहरूंनी मानवी हितसंबंधाला अधिक महत्त्व देवून त्यांनी आपल्या परराष्ट्र धोरणात साम्राज्यवाद व वंशवादी तत्त्वांचा स्विकार केला आहे. ज्याद्वारे ते जगातील साम्राज्यवादी धोरण ठरविणारे राष्ट्र तसेच वंशवादाचा स्विकार करणाऱ्या राष्ट्राच्या विरोधी भूमिका घेतली.

### ५. पंचशील तत्त्वाचा स्विकार :-

पंडित नेहरूंनी पंचशील तत्त्वाच्या माध्यमातून परराष्ट्र धोरणाला नवीन उंचीवर नेले, ज्यामध्ये अनाक्रमण, अहस्तक्षेप, अखंडता व सार्वभौमत्व आणि परस्पर सहकार्य व शांततामय सहअस्तित्त्व ह्या तत्त्वांचा समावेश यात आहे. या तत्त्वाला अनुसरून भारत-चीन यांच्यात पंचशील करार झालेला आहे. पंचशील तत्त्व हे भारतीय परराष्ट्र धारेणाचे मुलभूत तत्त्व असून यावर भारतीय परराष्ट्र धोरणाची दिशा ठरविली जाते.

अशाप्रकारे पंडित नेहरूंच्या काळामध्ये भारतीय परराष्ट्र धोरणाची तत्त्वे दिसत असून त्याचे परराष्ट्र धोरण संकुचित नसून व्यापक हितसंबंधावर आधारित होते. हे हितसंबंध हे फक्त भारतीय नसून जागतिक स्वरूपाचे होते.

## ❒ पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल :-

पंडित नेहरूंच्या काळातील परराष्ट्र धोरणावर पंडित नेहरूंच्या व्यक्ती महत्त्वाचा प्रभाव दिसून येतो. त्याच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल पुढीलप्रमाणे :-

### १. पंडित नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव :-

पंडित नेहरू हे भारतीय जनमाणसातील लोकप्रिय नेतृत्त्व होते. तसेच त्यांना जागतिक स्तरावर मान्यता होती, त्यामुळे भारतीय परराष्ट्र धोरणाच्या वाटचालीत त्यांचा प्रभाव पडलेला दिसतो. परराष्ट्र धोरणामध्ये संस्थात्मक पातळीवर असणारा प्रभाव पंडित नेहरूंच्या नेतृत्त्वामुळे दिसून येत नाही. त्यांच्या आदर्श विचाराचा स्विकार भारतीय परराष्ट्र धोरणावरती झालेला आहे.

### २. रशियाशी निकटसंबंध :-

पंडित नेहरूंनी आपल्या परराष्ट्र धोरणाच्या वाटचालीमध्ये अलिप्तता धोरण स्विकारले असले

तरी अमेरिकेपक्षा रशियाकडे कल दिसून येतो. त्यांनी रशियाच्या पंचवार्षिक योजनेचा स्विकार भारतात केला. भारताने रशियाशी नेहमीच आर्थिक संबंध प्रस्थापित केले.

### ३. भारत–पाकिस्तान संबंध :–

पंडित नेहरूंच्या परराष्ट्र कारकिर्दीत भारत–पाकिस्तान हा संबंध आंतरराष्ट्रीय राजकारणाचे केंद्रबिंदू ठरले, ज्यामध्ये काश्मिर प्रश्न हा अत्यंत संघर्षाचा होता. पंडित नेहरूंना शांतता हवी होती व काश्मीर प्रश्न सोडवायचा होता, पण हा प्रश्न त्याच्या काळात सुटण्याऐवजी अतिशय गुंतागुंतीचा बनला. त्याचबरोबर सर क्रिक सियाचीन असे वादाचे प्रश्न निर्माण झाले. पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धारेणाच्या कारकिर्दीमध्ये काश्मीर प्रश्न न सोडवल्याबद्दल नेहरू निराश होते.

### ४. भारत–चीन संबंध :–

पंडित नेहरूंनी आपल्या कारकिर्दीमध्ये भारताचे चीनशी संबंध मैत्रीपूर्ण रहावे यासाठी नेहमी प्राधान्य दिले. यासाठी पंचशील कराराही केला पण चीनचे साम्राज्यवादी धोरण व तिबेटचा मुद्दा यामुळे भारत–चीन संबंधाला चढ–उतार निर्माण झाला, याचाच परिणाम म्हणजे २० ऑक्टोबर १९६२ ला चीनने केलेले भारतावर आक्रमण होय. भारतावर चीनचे हे आक्रमण गाफिल असताना केले असल्यामुळे भारताता यात पराभव पत्करावा लागला. हे आक्रमण पंडित नेहरूंना आपल्या परराष्ट्र धोरणाचे सर्वात मोठे अपयश आहे असे वाटू लागले.

### ५. आशिया खंडाची नेतृत्त्व करण्याची वाटचाल :–

पंडित नेहरूंनी भारताच्या परराष्ट्र धोरणाचे आदर्शवादी प्रतिमा तयार करून अलिप्ततावादी चळवळीच्या माध्यमातून जागतिक नेतृत्व करण्याचा त्यांनी प्रयत्नही केला. तो काही प्रमाणात यशस्वी झालेला दिसून येतो.

अशाप्रकारे पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल दिसून येते. त्याच्या परराष्ट्र धोरणामध्ये सामूहिक विकासावर अधिक भर होतो. इतर राष्ट्राच्या हितसंबंधाचाही समावेश होता, संघर्ष युद्धाला विरोध करून त्यांनी शांततामय सहजीवनावर अधिक भर दिलेला आहे.

## ❒ ब) भारतीय परराष्ट्र धोरणातील नेहरूनंतरचा कालखंड

भारतीय परराष्ट्र धोरण हे दीर्घकाळ पंडित नेहरूंच्या प्रभावाखाली होते. १९६४ ला पंडित नेहरूंच्यानंतर भारतीय परराष्ट्र धोरणाला नवीन वाटचाल मिळण्यास सुरवात झाली, ही प्रत्येक पंतप्रधानाच्या कारकिर्दीनुसार पुढीलप्रमाणे दिसून येते.

### १. लालबहादूर शास्त्री :–

१९६४ नंतर भारताचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी पंतप्रधान कार्यालयाच्या अधिकार

क्षेत्रात वाढ केली, त्यांच्या काळात भारत-पाकिस्तान युद्ध झाले. या युद्धात पाकिस्तानचा पराभव झाला आणि चीनबरोबरच्या पराभवाने भारताची आंतरराष्ट्रीय राजकारणात गेलेली पत पुन्हा निर्माण केली.

## २. इंदिरा गांधी : -

इंदिरा गांधीचा काळ हा भारतीय परराष्ट्र धोरणाचा वास्तववादी काळ होता. भारतीय परराष्ट्र धोरण आदर्शवादाकडे झुकलेले होते. इंदिरा गांधीच्या काळात भारतीय परराष्ट्र मंत्रालयापेक्षा पंतप्रधान कार्यालयाला अधिक महत्त्व प्राप्त झाले. त्यांनी रशिया, अमेरिका या देशांना भेटी देवून संबंध सुरळीत करण्याचा प्रयत्न केला. तसेच आपल्या शेजारील राष्ट्रांना विश्वासात घेतले. त्यांच्या कारकिर्दीमध्ये १९७१ ला भारत-पाक संबंधातूनच पुढे बांगला देशाची निर्मिती त्यांच्या भूमिकेमुळे झाले. तसेच पाकिस्तानला या युद्धात हार पत्करावी लागली यामुळे जगात भारताची प्रतिमा उजळून निघाली. त्याचबरोबर १९७४ ला पोखरण येथे अणुचाचणी घेवून भारताच्या परराष्ट्र धोरणाची दिशा बदलली.

## ३. राजीव गांधी :-

राजीव गांधी यांनी आपल्या शेजारी देशावरून संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला, त्यांच्या काळात दक्षिण आशिया प्रादेशिक सहयोग संघटना (सार्क)ची स्थापना केली. तसेच १९८७ ला श्रीलंकेशी करार करून शांतीसेना श्रीलंकेत पाठविली. या शांतीसेनेच्या माध्यमातून श्रीलंका ते अहस्तक्षेपाचे धोरण भंग झाले ज्याचा परिणाम राजीव गांधीच्या हत्येने झाला.

## ४. पी. व्ही. नरसिंहराव :-

शीतयुद्धांची समाप्ती जगातील बदलते राजकारण या सर्वांचा प्रभाव भारतीय परराष्ट्र धोरणावर पडला. १९९२ नंतर भारतीय परराष्ट्र धोरण बदलत गेले यावेळी पी.व्ही.नरसिंहराव हे पंतप्रधान होते, त्यांनी भारतासाठी जागतिकीकरण धोरण स्विकारले. ज्यातून परराष्ट्र धोरणामध्ये आर्थिक मुद्दा पुढे आला. तसेच पूर्वेकडे पहा हे धोरण स्विकारून भारताचे परराष्ट्र धोरणामध्ये पूर्वेकडील देशांना महत्त्व प्राप्त करून दिले. पी.व्ही.नरसिंहराव यांच्या पंतप्रधानाच्या कारकिर्दीमध्ये, परराष्ट्र धोरणात आर्थिक घटकाला महत्त्व प्राप्त झाले.

## ५. अटल बिहारी वाजपेयी :-

अटल बिहारी वाजपेयी यांनी त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकिर्दीमध्ये परराष्ट्र धोरणाला नवीन आयाम प्राप्त होवू लागले होते. या परराष्ट्र धोरणात राष्ट्रीय हितसंबंधाच्या दृष्टिकोनातून हितसंबंध प्राप्त होवू लागले होते. यांच्या काळात १९९८ ला दुसरी अणुचाचणी झाली. ज्यातून भारत अणवस्त्रधारी देश अशी प्रतिमा निर्माण झाली. वाजपेयी यांच्या काळातच १९९९ ला कारगिल युद्ध

झाले, ज्या युद्धात पुन्हा एकदा पाकिस्तानचा पराभव झाला. तसेच पुढे अटल बिहारी वाजपेयी यांनी पाकिस्तानशी संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला, ज्यात समझोता एकस्प्रेसच्या माध्यमातून शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

## ६. डॉ. मनमोहन सिंग :-

डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळामध्ये भारतीय परराष्ट्र धोरणामधील लुक ईस्ट पॉलीसीवर अधिक भर देण्यात आला, यामुळे २००५ साली भारत ईस्ट एशिया समितीचा सदस्य बनला. २००५ साली मनमोहन सिंग व जॉर्ज बुश यांच्या दरम्यान नागरी अणुकराराच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाला व २००८ साली ऐतिहासिक अनुकरार झाला, यामुळे भारताची प्रतिमा जागतिक राजकारणात वाढली याच काळात भारताने युरोपीय युनियन व जगातील विविध राष्ट्रांबरोबर आर्थिक संबंध सुधारणेची सुरवात केली, पण भारताशेजारील राष्ट्रे बांगलादेश, मालदीप, श्रीलंका, म्यानमार यांच्याबरोबर काहीवेळा संबंधामध्ये दुरावा निर्माण होवू लागला यामुळे भारतातील शेजारील राष्ट्राबरोबर अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले होते. पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या काळामध्ये भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून दहशतवाद हा मुद्दा जागतिक स्तरावर मांडण्यास भारत यशस्वी झाला आहे.

डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळात भारतीय परराष्ट्र धोरण हे आर्थिक विकासावर आधारित होते असे मानावे लागेल.

## ७. नरेंद्र मोदी :-

२०१४ नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे सरकार सत्तेवर आल्यानंतर भारतीय परराष्ट्र धोरणामध्ये दक्षिण आशियाई राष्ट्रांना सर्वप्रथम स्थान दिले. यासाठी शांतता राजकीय सोयी व विकास या गोष्टींना महत्त्व देवून आर्थिक संबंध घनिष्ठ करण्यास मदत केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जपान, दक्षिण कोरिया, चीन, सिंगापूर या चार देशाच्या निर्यात श्रम विकासाचे मॉडेलसमोर ठेवून गुंतवणूकीला परराष्ट्र धोरणामध्ये अधिक महत्त्व दिले. भारताच्या आयातीपेक्षा निर्यातीला महत्त्व देण्यासाठी त्यांनी विविध देशाचे दौरे करून भारतात गुंतवणूकीचे आवाहन केले.

नरेंद्र मोदी यांनी परराष्ट्र धोरणात राष्ट्रीय सुरक्षेच्यादृष्टीने पाकिस्तान व चीनबरोबर सहकार्य करताना सुरक्षेला महत्त्व दिलेले आहे. तसेच परराष्ट्र धोरणात वास्तववादाला महत्त्व देवून राष्ट्रीय हिताला प्राधान्य दिले आहे. जागतिक स्तरावर इराण, म्यानमार, श्रीलंका यांच्यातील मानवी हक्कासंबंधीच्या प्रश्नांच्यावेळी राष्ट्रीय हिताचा विचार करण्यात आला आहे. नरेंद्र मोदींच्या सद्यस्थितीत 'सर्जिकल स्ट्राईक' करून पाकिस्तानला स्पष्ट इशारा देण्याचे कार्य केले आहे. याप्रकारे नरेंद्र मोदींनी परराष्ट्र धोरणात आर्थिक विकास व संरक्षण सिद्धता या दोन तत्त्वांचा स्विकार केलेला दिसून येतो.

अशाप्रकारे भारतीय परराष्ट्र धोरण नेहरूनंतरच्या काळात बदललेले दिसले. ज्यात परराष्ट्र

धोरणात 'आर्थिक' घटक महत्त्वपूर्ण झालेला आहे. नेहरूंच्या आदर्शवादी प्रतिमेतून वास्तववादाकडे परराष्ट्र धोरण आले असून सध्या यात आर्थिक व संरक्षण या दोन्हींचा प्रभाव परराष्ट्र धोरणावर दिसून येतो.

### १.२.३ जागतिकीकरणाच्या काळातील भारताचे परराष्ट्र धोरण

१९९१ नंतर भारताचे परराष्ट्र धोरण हे वास्तववादाकडे झुकलेला आहे. भारताचे रशियाकडे असणारा कल हा अमेरिकेकडे गेलेला दिसतो. १९९१ नंतर एक ध्रुवीय व्यवस्था निर्माण झाली व यात राष्ट्रीय हिताला महत्त्व देणे आवश्यक होते. त्यानुसार राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने भारताने आपले परराष्ट्र धोरण बदलले. याचा परिणाम १९९१ ला पोखरण अणुस्फोट घडवून अण्वस्त्र सज्जता जगाला दाखवली. बदलत्या जागतिक परिदृश्यात भारत जागतिक बाजारपेठ म्हणून विकसित झाला व परराष्ट्र धोरणात 'आर्थिक संबंधास महत्त्वपूर्ण स्थान आले. ज्यात विविध क्षेत्रीय आर्थिक संघटनात भारताचा सहभाग वाढू लागला. भारत आज परराष्ट्र धोरणाबाबत अवलंबून नसून स्व:हिताच्या दृष्टीने आपले परराष्ट्र धोरण तयार करतो.

## १.३ सारांश

भारतीय परराष्ट्र धोरणाची मूलभूत चौकट प्रभावी असून लोकशाही, साम्राज्यवादविरोधी, वंशवादाला विरोध, युद्ध प्रवृत्तीला विरोध, आंतरराष्ट्रीय सुरक्षा, शांतता व सहकार्य, अहिंसावाद या तत्त्वांचा प्रभाव अजूनही परराष्ट्र धोरणावर आहे. या परराष्ट्र धोरणावर भारतीय पंतप्रधानांच्या कारकिर्दीचा प्रभाव पडला असून त्याच्या व्यक्तित्त्वाचाही प्रभाव यात निदर्शनास येतो. १९४७ ते २०१७ या कालखंडात भारतीय परराष्ट्र धोरणात अनेक बदल झाले. अनेक देशांशी संबंध ताण-तणावाचे राहिले, तसेच व्यवस्थितसुद्धा झाले. पण यात भारताने कधीही साम्राज्यवादी, आक्रमक असे परराष्ट्र धोरण स्विकारले नाही. भारताने नेहमी दुसऱ्या देशाच्या सार्वभौमत्वाचा व अखंडतेचा आदर केला आहे व त्यादृष्टीनेच इतर देशाशी संबंध प्रस्थापित केले आहेत.

### स्वयं-अध्ययन प्रश्न-३

❑ **रिकाम्या जागा भरा.**

१. जागतिकीकरणाचा स्विकार ............... पंतप्रधानांच्या काळात झाला.

२. नेहरूंचा मृत्यू ............ साली झाला.

३. बांगला देशाची निर्मिती ............ वर्षी झाली.

४. भारत-अमेरिका दरम्यान .......... साली अणुकरार झाला.

५. भारत-चीन युद्ध .......... साली झाले.

## १.४ पारिभाषिक शब्द

१. **अलिप्तता** : साम्यवाद व भांडवलशाही गटात न जाता तटस्थ राहणे म्हणजे अलिप्तता.

२. **पंचशील** : पंडित नेहरूंनी प्रादेशिक अखंडता, अतिक्रमण, अहस्तक्षेप समानता, शांततामय सहजीवन या तत्त्वाला अनुसरूनची पंचसूत्री परराष्ट्र धोरणात तयार केली त्यास पंचशील म्हणतात.

३. **परराष्ट्र धोरण** : एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राबद्दल स्विकारलेले धोरण म्हणजे परराष्ट्र धोरण होय.

## १.५ स्वयंअध्ययन प्रश्न व उत्तरे

❑ **स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे**

१. एखाद्या राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राच्याबाबतीत स्विकारलेले धोरण व व्यवहार म्हणजे परराष्ट्र धोरण होय.

२. भारताच्या परराष्ट्र धोरणातील भौगोलिक घटकात सीमा, स्थान, समुद्र किनारा, नैसर्गिक साधनसंपत्ती यांचा समावेश होतो.

❑ **स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे**

१. पंचशील तत्त्वात प्रादेशिक अखंडतता, अनाक्रमण, अहस्तक्षेप, समानता, शांततामय सहजीवन या घटकांचा समावेश होतो.

२. अलिप्तता धोरण म्हणजे दुसऱ्या महायुद्धानंतर साम्यवादी व भांडवलशाही या दोन गटात सामिल न होता स्वतंत्रपणे पण सर्वांशी संबंध ठेवणे याला अलिप्तता म्हणतात.

❑ **स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे**

१. पी.व्ही.नरसिंहराव.

२. १९६४.

३. १९७१.

४. २००८.

५. १९६२.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

### अ) थोडक्यात उत्तरे लिहा.

१. भारतीय परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे स्पष्ट करा?

२. भारतीय परराष्ट्र धोरणावर पंडित नेहरूंच्या प्रभावाची चर्चा करा?

### ब) टिपा लिहा.

१. पंचशील तत्त्व.

२. नरेंद्र मोदींचे परराष्ट्र धोरण.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **देवळाणकर शैलेंद्र :** *''भारतीय परराष्ट्र धोरण : सातत्य आणि स्थित्यंतर''*, प्रकाशक-प्रतिमा प्रकाशन, पुणे. जानेवारी-२०१०.

२. **भोगले शांताराम :** *''भारताचे परराष्ट्र धोरण''*, प्रकाशक-विद्या प्रकाशन, नागपूर. १९८२.

३. **दत्त पी. व्ही. :** *''बदलती दुनियामें भारत की विदेश नीती'*, प्रकाशक-हिंदी माध्यम कार्यान्वये विदेशालय, दिल्ली. २०१२.


❒❒❒

घटक–२

# भारतीय परराष्ट्र धोरणावरील प्रभाव

## (Influences on India's Foreign Policy)

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

    १.२.१ भारतीय परराष्ट्र धोरणातील निर्धारित घटक

        अ) परराष्ट्र धोरण

        ब) भारतीय परराष्ट्र धोरणातील निर्धारित घटक

    २.२.२ भारतीय परराष्ट्र धोरणात राजकीय पक्ष, दबावगट आणि माध्यमांची भूमिका

        अ) राजकीय पक्ष

        ब) दबाव गट

        क) माध्यमे

    २.२.३ भारतीय परराष्ट्र धोरणावर आंतरराष्ट्रीय राजकारण व व्यापाराचा प्रभाव

        अ) आंतरराष्ट्रीय राजकारण

        ब) आंतरराष्ट्रीय व्यापार

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वयं:अध्ययन प्रश्न व उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्ट्ये

भारतीय परराष्ट्र धोरणावर प्रभाव हे प्रकरण अभ्यासताना पुढील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली.

१. भारतीय परराष्ट्र धोरणावर भौगोलिक, सांस्कृतिक, आर्थिक घटकावर प्रभाव सविस्तर अभ्यासणे.

२. भारतीय परराष्ट्र धोरणातील कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाची भूमिका समजून घेणे.

३. भारतीय परराष्ट्र धोरणातील प्रक्रियेत राजकीय पक्ष, दबावगट व प्रसार माध्यमांची भूमिका अभ्यासणे.

४. भारतीय परराष्ट्र धोरणावर आंतरराष्ट्रीय राजकारण व व्यापाराचा प्रभाव अभ्यासणे.

## २.१ प्रास्ताविक

भारतीय परराष्ट्र धोरणाच्या निर्मिती प्रक्रियेत विविध घटकांचा प्रभाव पडतो. तसेच भारतीय पराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्ये व तत्त्वे ही परराष्ट्र धोरणाच्या विविध निर्धारक घटकाच्या प्रभावाने ही प्रभावित असतात. या घटकांमध्ये अंतर्गत व बाह्य घटकाचा समावेश होतो. यात भौगोलिक, सांस्कृतिक व आर्थिक घटकाप्रमाणेच देशांतर्गत राजकीय पक्ष, दबावगट व प्रसार माध्यमाचाही प्रभाव दिसून येतो. तसेच शासकीय संस्थाच्या निर्मिती प्रक्रिया भूमिका महत्त्वपूर्ण असते. या संस्थामार्फतच परराष्ट्र धोरण ठरवले जाते. याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय राजकारणाचा व व्यापाराचा कमी अधिक प्रमाणात प्रभाव जाणवतो. अशा या विविध घटकांच्या प्रभावातूनच परराष्ट्र धोरण तयार होत असते.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ भारतीय परराष्ट्र धोरणातील निर्धारित घटक

### ❐ परराष्ट्र धोरण

प्रत्येक राज्य हे दुसऱ्या राज्यावर अवलंबून असते म्हणून राज्या-राज्यांना विविध प्रकारचे संबंध प्रस्थापित करावे लागतात. या संबंधाना निश्चित दिशा द्यावी लागते. हे करत असताना त्यांना धोरण ठरवावे लागते. यातूनच परराष्ट्र धोरणाची निर्मिती होते.

- एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राच्या बाबतीत स्विकारलेले धोरण किंवा व्यवहार म्हणजे परराष्ट्र धोरण होय.
- परराष्ट्र धोरण म्हणजे राज्याच्या व्यवहाराची अशी विकसित पद्धती होय की, ज्याद्वारे

एक राज्य दुसऱ्या राज्याला आपल्या इच्छेप्रमाणे व्यवहार करण्यास सांगते किंवा आपल्या व्यवहाराची जुळवणी आंतरराष्ट्रीय पद्धतीनुसार करून घेते.

**– जॉन मॉडेलस्की**

- एखाद्या राज्याशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी तयार केलेला निर्णय किंवा कोणत्याही प्रकारचा संबंध न ठेवण्यासाठी घेतलेला निर्णय म्हणजे परराष्ट्र धोरण होय.

**– फेलिक्स ग्रास**

भारताच्या परराष्ट्र धोरणावर प्रभाव पाडणारे निर्धारित घटक पुढीलप्रमाणे :-

## ❐ भारतीय परराष्ट्र धोरणातील निर्धारित घटक

## (I) अंतर्गत निर्धारक घटक :–

### १. भौगोलिक घटक :–

प्रत्येक देशाच्या परराष्ट्र धोरणाचा अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणून भौगोलिक घटकाचा उल्लेख केला जातो. तो तसा होणे अगदी स्वाभाविक आहे. कोणत्याही देशाचे भौगोलिक स्थान आणि त्याची भौगोलिक परिस्थिती यांचा विचार करूनच सरकारला आपल्या देशाचे परराष्ट्र धोरण निश्चित करावे लागते. आपल्या देशाच्या बाबतीत तर भौगोलिक घटक हा अत्यंत प्रभावशाली घटक बनला आहे. याचे कारण असे की, भारताच्या विशिष्ट भौगोलिक स्थानामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताच्या भूमिकेला महत्त्व दिले जाते. भारताचे सीमेवरील देशाशी एकमेकालगत संलग्नता व याचा परिणाम संपूर्ण दक्षिण आशियाच्या राजकारणावर होतो.

**(अ) भारताचे भौगोलिक स्थान :–**

आपला भारत देश ८.४ उत्तर अक्षांश ते ३७.७ उत्तर अक्षांश आणि ६८.७ पूर्व रेखांश ते ९७.२५ पूर्व रेखांश या दरम्यान पसरलेला आहे. कर्कवृत्त भारताच्या मध्यातून गेलेले आहे. भारताचे क्षेत्रफळ ३२, ८७, २६३ चौ.कि.मी. आहे. आपला भारत हा भारतीय उपखंडातील किंवा दक्षिण आशियातील सर्वात मोठा देश आहे.

**(ब) सीमा :–**

भारताचे स्थान पूर्ण गोलार्धात मध्यवर्ती असून आशिया खंडाच्या दक्षिण भागात हा देश वसला आहे. भारताच्या उत्तरेला हिमालय पर्वताच्या रांगा तर दक्षिणेस हिंदी महासागर, पश्चिमेस अरबी समुद्र व पूर्वेस बंगालचा उपसागर पसरलेला आहे. भारताच्या सीमा वायव्येस पाकिस्तान व अफगाणिस्तान, उत्तरेस चीन, नेपाळ, भूतान आणि पूर्वेस बांगला देश व म्यानमार अशा सात राष्ट्रांना

भिडल्या आहेत. भारताची भू-सरहद्दीची एकूण लांबी १५,२०० कि.मी. इतकी आहे. यामुळे भारताने आपले परराष्ट्र धोरण निर्धारित करताना या राष्ट्रांचाही प्रभाव पडत असतो.

**(क) समुद्र किनारा :-**

भारताला सुमारे ७,५१७ कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. यामध्ये भारताची मुख्य भूमी अंदमान व निकोबार बेटे तसेच लक्षद्वीप बेटे यांच्या किनारपट्टीचा समावेश येतो. भारताच्या मुख्य भूमीचा किनारपट्टीची एकूण लांबी ६,१०० कि.मी. इतकी आहे. समुद्र किनाऱ्यामुळे भारताचे हिंदी महासागरातील राजकारणात महत्त्वपूर्ण स्थान लाभले आहे.

**(ड) आशिया खंडात मध्यवर्ती स्थान :-**

भारताच्या भौगोलिक स्थानाचा विचार करता आशिया खंडात मध्यवर्ती स्वरूपाचे स्थान लाभले आहे, असे दिसून येईल. पश्चिम आशिया आणि पूर्व तसेच आग्नेय आशिया यांना जोडणारा दुवा असे भारताचे वर्णन करता येईल, याच कारणासाठी जगाच्या इतिहासात अगदी प्राचीन काळातही जागतिक व्यापाराने एक महत्त्वाचे केंद्र म्हणून आपल्या देशाला ओळखले जाते.

**(इ) परराष्ट्र धोरणाचा घटक यादृष्टीने सरहद्दीचे महत्त्व :-**

परराष्ट्र धोरणाचा निर्धारक घटक यादृष्टीने देशाच्या सरहद्दींना पूर्वीपासून महत्त्व देण्यात आले आहे. देशाच्या सीमा किंवा सरहद्दी दोन प्रकारच्या असतात, त्या म्हणजे नैसर्गिक सरहद्दी व मानवनिर्मित सरहद्दी असे. देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने नैसर्गिक सरहद्दी नेहमीच सुरक्षित मानल्या जातात. नैसर्गिक सरहद्दीमुळे देशाला मोठ्या प्रमाणावर सुरक्षितता लाभते. भारताचा बहुसंख्य भूप्रदेश नैसर्गिक सरहद्दीचा लाभला आहे.

**(फ) भारताच्या नैसर्गिक सरहद्दी :-**

आपल्या देशाला नैसर्गिक सरहद्दीचे अनमोल देणे लाभलेले आहे. त्यामध्ये सर्वप्रथम हिमालय व काराकोरम पर्वतरांगांचा उल्लेख करावा लागेल. भारताच्या वायव्येला आणि उत्तरेला पसरलेल्या या पर्वत रांगा भारतीय उपखंडाला नैसर्गिक संरक्षण उपलब्ध करून दिले आहे. हिमालय पर्वतामुळे उत्तरेच्या दिशेने भारताला परकीय आक्रमणाचा धोका कधीही जाणवला नव्हता, म्हणून हिमालय पर्वतरांगाचा उल्लेख भारताचे नैसर्गिक संरक्षण छत्र अशा शब्दात केला जातो.

**(ग) मानवनिर्मित सरहद्दी :-**

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत मानवनिर्मित सरहद्दीचा प्रश्न निर्माण झाला नव्हता, परंतु देश स्वतंत्र होताना देशाची फाळणी होवून पाकिस्तानची निर्मिती झाली होती, त्यामुळे भारत व

पाकिस्तान यांच्यात भू-प्रदेशाची वाटणी होताना मानवनिर्मित सरहद्दीची निर्मिती करावी लागली. अशा प्रकारे भारताच्या पश्चिम बाजूला पश्चिम पाकिस्तान व पूर्वेकडे पूर्व पाकिस्तान (आताचा बांगला देश) यांच्याशी मानवनिर्मित सरहद्दी तयार झाली. मानवनिर्मित सरहद्दीमुळे देशाला संरक्षण सिद्धतेकडे विशेष लक्ष द्यावे लागले.

## २. ऐतिहासिक व सांस्कृतिक घटक :-

देशाचे परराष्ट्र धोरण प्रभावित करणारा घटक म्हणून ऐतिहासिक व सांस्कृतिक घटकाची देखील दखल घ्यावी लागते. आपल्या देशाला अतिशय प्राचीन इतिहास लाभला आहे. अगदी प्राचीन काळापासून जगातील एक महत्त्वाचा देश म्हणून भारताचा उल्लेख आहे. साहजिक आपल्या देशाला फार मोठी ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. देशाच्या परराष्ट्र धोरणाचा विचार करताना या ऐतिहासिक परंपरेची दखल अवश्य घ्यावी लागते. आपली ऐतिहासिक परंपरा व वारसा यांचे जतन करणे हे कोणत्याही देशाच्या सरकारचे कर्तव्य मानले जाते. या कर्तव्याची जाणीव ठेवूनच सरकारला आपल्या परराष्ट्र धोरणाची आखणी करावी लागते.

भारताला प्राचीन संस्कृती ही उदारमतवादी व सहिष्णू संस्कृती म्हणून ओळखले जाते. अगदी प्राचीन काळापासून साहिष्णुता हे भारतीय संस्कृतीचे खास वैशिष्ट्ये बनून राहिले आहे. भारतातील वैदिक धर्म, जैन धर्म, बौद्ध धर्म यासारख्या प्राचीन काळातील धर्मानी सहिष्णुतेबरोबर सत्य, अहिंसा, भूतदया इ. तत्त्वांचा पुरस्कार केला होता. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात इंग्रजी सत्तेची स्थापना झाल्यावर भारतीय जनतेने इंग्रजी सत्तेच्या विरोधात दीर्घकाळ संघर्ष केला. इ.स. १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना तर या संघर्षाला विशेष धार चढली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास हा प्रत्येक भारतीय नागरिकाला अभिमानास्पद वाटा असा वैभवशाली कालखंड आहे. या कालखंडात साम्राज्यवाद व वसाहतवाद यांना विरोध, परकीय सत्तेच्या विरोधात संघर्ष करणाऱ्या जगातील इतर देशाच्या जनतेला पाठिंबा, वर्णभेदाला विरोध, फॅसिझमला विरोध ही त्यापैकी काही महत्त्वाची मूल्ये होत.

## ३. नैसर्गिक साधनसंपत्ती :-

परराष्ट्र धोरणाचा निर्धारक घटक म्हणून आधुनिक काळात नैसर्गिक साधनसंपत्ती देखील महत्त्व प्राप्त झाले आहे, याचे कारण असे की, देशाचे परराष्ट्र धोरण आणि औद्योगिक विकास यांचा निकटचा संबंध आहे आणि कोणत्याही देशाचा औद्योगिक विकास हा त्या देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीवर अवलंबून असतो. नैसर्गिक साधन संपत्तीमध्ये शेती उत्पादन आणि खनिज संपत्ती यांचा प्रामुख्याने अंतर्भाव होतो. यामध्ये प्रामुख्याने शेती उत्पादन, खनिज उत्पादन, वनस्पती व जल संपत्ती असे घटक येतात.

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. आजदेखील देशातील सुमारे ७०% लोक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहेत. भारतात शेतीची उत्पादकता तुलनेने खूपच कमी आहे. म्हणूनच काही वर्षापर्यंत आपल्या कृषिप्रधान देशाला अन्नधान्याच्या बाबतीत परकीय मदतीवर अवलंबून राहावे लागते. अनेक महत्त्वाच्या उद्योगधंद्यासाठी लागणारा कच्चा माल शेतीतूनच मिळत असतो, म्हणून देशातील जनतेच्या अन्नधान्यविषयक गरजांची पूर्तता करण्याबरोबरच औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठीदेखील शेती व्यवसायाच्या विकासाकडे लक्ष देणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे नैसर्गिक साधनसंपत्तीचा दुसरा महत्त्वाचा घटक खनिज संपत्ती हा होय. खनिज संपत्ती हादेखील देशाच्या औद्योगिक विकासशी संबंधित असलेला घटक आहे. खनिज संपत्तीच्या उपलब्धतेवर आणि प्रत्यक्ष उत्पादनावर देशाचा औद्योगिक विकास अवलंबून असतो, त्यामुळे खनिज संपत्तीचा देशाच्या परराष्ट्र धोरणाशी संबंध येतो. तसेच देशाच्या नैसर्गिक साधनसंपत्तीमध्ये वनसंपत्ती व जलसंपत्ती यांचाही समावेश होतो. या दोन्ही बाबतीत आपला देश तसा भाग्यवान आहे वनस्पती व जलसंपत्ती यांचा आपण नियोजनपूर्वक व तारतम्याने वापर केला तर आपल्या गरजांची व्यवस्थित पूर्वता होईल अशी आपली स्थिती आहे.

## ४. आर्थिक विकास :–

आर्थिक विकास हा परराष्ट्र धोरणाच्या निर्धारणातील आणखी एक महत्त्वाचा घटक होय. कोणत्याही देशाची राष्ट्रीय सत्ता ही त्याच्या आर्थिक विकासावरून ठरत असते, म्हणूनच आर्थिक विकास हा राष्ट्रीय सत्तेतील महत्त्वाचा घटक मानले जाते. आंतरराष्ट्रीय राजकारणात विकसित देशाच्या भूमिकेला कसे महत्त्व प्राप्त होत असते हे आपण प्रत्यक्ष पाहत आहोत. स्वातंत्र्यप्राप्तीच्या सुमारास आपला देश आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या स्थितीत होता. ही आपणास परकीय सत्तेची मिळालेली देणगी होती. साहजिकच आपल्या परराष्ट्र धोरणावर ही काही मर्यादा पडल्या होत्या. आपल्या देशाला अनेक बाबतीत विकसित किंवा प्रगत राष्ट्राच्या मदतीवर अवलंबून राहावे लागत असल्यामुळे त्या राष्ट्रांना दुखविणारे निर्णय घेण्यास आपणास अडचणी येत होत्या. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांनी हे अचूक ओळखले की, आपल्या देशाची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यासाठी आर्थिक विकासावर लक्ष केंद्रीत करण्याची गरज आहे, त्यामुळे त्यांच्या नेतृत्त्वाखालील भारत सरकारने आर्थिक विकासाच्या कार्यक्रमाला प्राधान्य देण्याचा निर्धार केला.

देशाच्या आर्थिक विकासाला कारणीभूत ठरणारा घटक म्हणून आता तंत्रज्ञानाचीही दखल घ्यावी लागते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने देशाच्या आर्थिक विकासाला कशी चालना देता येते. अनुभव आपण प्रत्यक्ष घेत आहोत. भारत सरकारने स्वातंत्र्योत्तर काळात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासाला प्राधान्य देण्याचे धोरण स्विकारले. त्यातून देशाच्या आर्थिक विकासाचा पाया घातला गेला. आपल्या देशाने अवकाश संशोधनाच्या क्षेत्रात फार मोठी मजल मारली आहे. भारताने अनेक कृत्रिम व

बहुउद्देशीय उपग्रह अवकाशात सोडले आहेत. पोखरणच्या वाळवंटात अणुचाचण्या घेवून आपली अणुक्षमता सिद्ध केली आहे.

### ५. विचार प्रणाली :–

देशाच्या परराष्ट्र धोरणाला दिशा देण्यात विचारप्रणाली किंवा तत्त्वप्रणाली या घटकाने देखील महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अर्थात आंतरराष्ट्रीय समुदायातील सर्वच राष्ट्रे आपले परराष्ट्र धोरण ठरविताना विचार प्रणालीला महत्त्व देतात असे म्हणता येत नाही. बहुतेक देश आपल्या राष्ट्रीय हितसंबंधाचा प्राधान्याने विचार करतात, जेणेकरून आपले राष्ट्रीय हितसंबंध साधता येतील. अशाच प्रकारची धोरणे स्वीकारण्याकडे त्याचा कल असतो. तथापि, काही देश मात्र राष्ट्रीय हितसंबंधाइतकेच विचारप्रणालीला महत्त्व देताना दिसतात. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात सोव्हिएत युनियनच्या परराष्ट्र धोरणावर साम्यवादी विचारप्रणालीचा फार मोठा प्रभाव होता. भारताच्या परराष्ट्र धोरणाला प्रभावित करणाऱ्या विचारप्रणाली म्हणून उदारमतवाद, समाजवाद, गांधीवाद व आंतरराष्ट्रीय वाद यांचा निर्देश करावा लागतो. स्वातंत्र्य चळवळीच्या काळातही भारताच्या राष्ट्रीय नेत्यानी आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने वरील तत्त्वांचा पाठपुरावा करणे चालूच ठेवले. भारताच्या परराष्ट्र धोरणावर या तत्त्वांची कसा प्रभाव पडला आहे. यासंबंधीचे विवेचन आपण पुढील भागात करणार आहोत.

### ६. नेतृत्त्व :–

देशाचे परराष्ट्र धोरण ठरविण्याचे कार्य शासनाचे पदाधिकारी करीत असतात, त्यामुळे परराष्ट्र धोरणाच्या निर्धारणात नेतृत्वाची भूमिकाही महत्त्वाची असते. आपल्या देशाच्या बाबतीत तर परराष्ट्र धोरणाच्या निर्धारणात नेतृत्त्वाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असलेल्याचे पहावयास मिळते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाच्या नेतृत्त्वाची सूत्रे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हाती आली. पंडित नेहरू हे देशाचे पंतप्रधान होते. तसेच ते परराष्ट्र मंत्रीदेखील होते. त्यामुळे भारताचे परराष्ट्र धोरण ठरविण्यात त्याचा फार मोठा वाटा होता. अर्थात देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावरच नेहरूनी आंतरराष्ट्रीय प्रश्नात लक्ष घातले असे नाही. स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच त्यांची आंतरराष्ट्रीय प्रश्नात रस घेतला होता. पंडित नेहरूंनी घालून दिलेल्या मार्गावरूनच देशाच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल अजूनही चालू आहे असे म्हटल्यास ते चुकीचे होणार नाही, म्हणूनच पंडित नेहरू यांना भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार असे म्हणतात.

## (II) बाह्य निर्धारक घटक :–

### १. जागतिक महासत्तांमधील संघर्ष :–

विसाव्या शतकाचा उत्तरार्ध अमेरिका व सोव्हिएत युनियन या जागतिक महासत्तामधील संघर्षाचा कालखंड होता. या संघर्षाचा भारताच्या परराष्ट्र धोरणावर परिणाम झाला नसता तरच नवल.

वास्तविक पाहता भारताने आंतरराष्ट्रीय शांततेचा पुरस्कार चालविला होता. दोन महासत्तांच्या संघर्षात आपण पडावयाचे नाही किंवा त्यापैकी कुणाही एकाची बाजू घ्यावयाची नाही हेच आपल्या परराष्ट्र धोरणाचे सूत्र राहिले होते. परंतु महासत्तामधील संघर्षाची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष झळ आपणास निश्चितच बसली होती.

## २. अलिप्ततावादी चळवळ :-

अलिप्ततावादी चळवळीवर भारताची फार मोठी छाप आहे. या चळवळीला आंतरराष्ट्रीय राजकारणातील महासत्तांच्या संघर्षाची पार्श्वभूमी लाभली होती. अमेरिका व सोव्हिएत युनियन या दोन महासत्तांपैकी कोणत्याही एका सत्तागटात सामील न होता आंतरराष्ट्रीय शांतता व सद्भाव यासाठी प्रयत्नशील राहणे, हे अलिप्ततावादी चळवळीचे उद्दिष्ट्ये होते याचा अर्थ असा की, विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील विशिष्ट आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे भारताला आपल्या परराष्ट्र धोरणात अलिप्ततावादी चळवळ मजबूत करण्यावर भर द्यावा लागला होता.

## ३. शेजारी देशांची नीती :-

आपल्या देशाच्या परराष्ट्र धोरणावर शेजारी देशांच्या नीतीचा किंवा राजकारणाचा अनेक प्रकारे प्रभाव पडला आहे, म्हणजे परराष्ट्र धोरणाची आखणी करताना आपणास शेजारी राष्ट्राच्या नीतीचीही दखल घ्यावी लागली आहे. खरे तर आपल्या देशाने आणि आपल्या राष्ट्रीय नेत्यांनी अगदी प्राचीनपासून नि:शस्त्रीकरणाच्या धोरणाचा पुरस्कार केला होता. आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्यासाठी आणि सर्वांनीच नि:शस्त्रीकरणाच्या मार्गाचा अवलंब केला पाहिजे अशी आपल्या देशाची भूमिका होती; परंतु पाकिस्तानने अगदी सुरुवातीपासून भारताशी संघर्षाची भूमिका घेतल्याने भारतालादेखील आत्मरक्षणासाठी शस्त्रसज्ज बनणे भाग पडले. चीनच्या विश्वासघातकी कृतीमुळे आपणास परराष्ट्र धोरणात असेच बदल करावे लागले होते.

## ४. आंतरराष्ट्रीय संघटना :-

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आंतरराष्ट्रीय राजकारणात झालेला एक महत्त्वाचा बदल म्हणून आंतरराष्ट्रीय संघटनांना प्राप्त झालेले महत्त्व या घटकाचा उल्लेख करता येईल. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर लगेच संयुक्त राष्ट्रे ही आंतरराष्ट्रीय संघटना अस्तित्वात आली. संयुक्त राष्ट्रांच्या विविध शाखा आंतरराष्ट्रीय क्षेत्रात महत्त्वाच्या भूमिका पार पाडू लागल्या. याखेरीज आणखीही काही आंतरराष्ट्रीय संघटना विविध क्षेत्रात उपयुक्त कार्य करू लागल्या. आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्यासाठी किंवा आंतरराष्ट्रीय क्षेत्रात शांततेला पोषक वातावरण तयार करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटनांनी आपल्या परीने प्रयत्न चालविले आहेत. संघटनेचा आंतरराष्ट्रीय समुदायातील सर्व राष्ट्रांनी आदर केला पाहिजे. याविषयी भारत नेहमीच आग्रही राहिला आहे. भारतीय राज्यघटनेतील राज्यांच्या

धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे या भागातही आंतरराष्ट्रीय शांतता व सद्‌भाव वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहण्याच्या आणि आंतरराष्ट्रीय संघटनेप्रती शांतता व सद्‌भाव वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहण्याच्या आणि आंतरराष्ट्रीय संघटनेप्रती आदर ठेवण्याच्या तत्त्वाचा उल्लेख आहे.

## स्वयं-अध्ययन प्रश्न-१

❑ **दीर्घोत्तरी प्रश्न सोडवा.**

१. परराष्ट्र धोरण म्हणजे काय?

२. भारतीय परराष्ट्र धोरणनिर्धारणातील भौगोलिक घटक सांगा?

## २.२.२ भारतीय परराष्ट्र धोरणात राजकीय पक्ष, दबावगट आणि प्रसार माध्यमांची भूमिका

परराष्ट्र धोरण ही गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत निर्धारित घटकाप्रमाणेच शासन व्यवस्थेतील संस्थांचीही भूमिका महत्त्वपूर्ण असते तसेच याबरोबर अप्रत्यक्षरित्या राजकीय पक्ष, दबावगट, प्रसार माध्यमांचीही भूमिका महत्त्वपूर्ण असते.

### ❑ अ) राजकीय पक्ष :-

राजकीय पक्ष हा परराष्ट्र धोरण निर्मितीतील अप्रत्यक्ष घटक म्हणून भूमिका पार पाडतो. भारत हा लोकशाही व्यवस्थेचे राष्ट्र आहे. त्यामुळे भारतात बहुपक्ष पद्धती अस्तित्वात आहे. या पक्ष पद्धतीत वेगवेगळी पक्ष आपली भूमिका जाहीर करत असतात. राजकीय पक्षांना निवडणूकीच्या काळात पक्षाने जाहीरनामे जनहितार्थ मांडावे लागतात. या जाहिरनाम्यातून त्या राजकीय पक्षाची ध्येय, धोरणे स्पष्ट होत असतात, त्यांची राजकीय विचारप्रणाली समजून येते. अशा विविध विचारप्रणालीचे राजकीय पक्ष निवडणूकीच्या माध्यमातून सत्ता प्राप्त करतात व शासन व्यवस्था चालवतात. ही व्यवस्था चालवताना आपल्या राजकीय पक्षाची ध्येय धोरणे राबवतात. अशा या राजकीय पक्षांची भूमिका परराष्ट्र धोरणात पुढीलप्रमाणे आहे.

**१. राजकीय विचारप्रणालीचा प्रभाव :-**

भारतातील बहुपक्ष पद्धतीतील विविध राजकीय पक्षाची निर्मिती ही विचारप्रणालीवर झालेली असते. या विचारप्रणालीचा परराष्ट्र धोरणाच्या दिशादर्शनात प्रभाव पडत असतो. भारतात राष्ट्रीय काँग्रेस, भाजप, समाजवादी पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, ऑल इंडिया मुस्लिम लिग इत्यादी राजकीय पक्षांची विचारप्रणाली भिन्न आहे. या विचारप्रणालीचा परराष्ट्र धोरणावर प्रभाव पडतो. राष्ट्रीय काँग्रेसची उदारमतवादी विचारधारा आहे. तसेच भाजप हा वास्तववादी, राष्ट्रीय हिताच्या विचारप्रणालीचा आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष हा समाजवाद व मार्क्सवाद विचारप्रणाली आहे. या

पक्षांचे सदस्य निवडणूकीतून कायदे मंडळात आल्यानंतर परराष्ट्र धोरणाच्या चर्चात व वाद-विवादात आपल्या पक्षाच्या विचारप्रणालीचा प्रभाव पाडतात.

**२. राजकीय पक्षाच्या जाहिरनाम्याचा प्रभाव :-**

भारतातील राजकीय पक्ष ही आपल्या पक्षाच्या जाहिरनाम्याच्या माध्यमातून निवडणूकीत जनतेला मत मागतात. जाहिरनाम्यानुसार राजकीय पक्ष सत्तेत आल्यावर शासन व्यवस्थेत कार्य करतो. त्यामुळे जाहिरनाम्यात परराष्ट्र धोरणावर प्रभाव पडतो. जाहिरनाम्यात परराष्ट्र धोरणाविषयी मांडलेले विचाराला अनुसरून शासन व्यवस्थेतील सत्तारूढ पक्ष कार्य करतो.

**३. राजकीय पक्षाच्या नेतृत्त्वाचा प्रभाव :-**

भारतातील परराष्ट्र धोरणावर राजकीय पक्षांच्या नेतृत्त्वाचा प्रभाव पडत असलेला दिसून येतो. भारतात स्वातंत्र्यानंतर राष्ट्रीय काँग्रेस पक्ष हा सत्तारूढ झाला. या पक्षाचे नेते पंडित नेहरू हे पंतप्रधान झाले. पं. नेहरूंचे विचार परराष्ट्र धोरणाच्या निर्मितीला व वाटचालीला प्रभावी करत होते. त्यांना पक्षीय पातळीवर विरोध होत नव्हता, त्याची भूमिका म्हणजे राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची भूमिका होय, त्यांच्यानंतर इंदिरा गांधी, राजवी गांधी, पी.व्ही.नरसिंहराव या राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी परराष्ट्र धोरण प्रभावीत केले. तसेच भाजप पक्षाच्या अटल बिहारी वाजपेयी, नरेंद्र मोदी या राजकीय पक्षाच्या नेत्यांनी परराष्ट्र धोरणाच्या प्रक्रियेत प्रभाव पाडलेला दिसतो. भारतात राजकीय पक्षाचे नेतृत्त्वाचा प्रभाव बऱ्याचअंशी परराष्ट्र धोरणावर पडलेला आहे.

**४. विरोधी राजकीय पक्षाची भूमिका :-**

भारतीय परराष्ट्र धोरणामध्ये सत्तारूढ राजकीय पक्षांप्रमाणेच विरोध राजकीय पक्षांची भूमिका ही महत्त्वपूर्ण आहे. भारताच्या राष्ट्रीय आणीबाणीच्या प्रसंगी परराष्ट्र धोरणावर विरोधी पक्षांनी टिकाही केली व सहकार्यही केलेले आहे. भारताचे पाकिस्तान, चीन बरोबरच्या युद्धात परराष्ट्र धोरणाबाबत सर्व राजकीय पक्षांची एकवाक्य पाठिंबाची भूमिका होती. भारतातील राजकीय पक्षात सत्तारूढ व विरोधक यांच्या अनेकवेळा परराष्ट्र धोरणाबाबत एकवाक्यता आढळून येते.

**५. राजकीय पक्षांच्या राजकारणाचा प्रभाव नाही :-**

भारतीय परराष्ट्र धोरणात राजकीय पक्षांच्या राजकारणाचा प्रभाव दिसत नाही. राजकीय पक्षांची विविध सरकारे आले तरी राष्ट्रीय हिताला अनुसरून परराष्ट्र धोरण प्रत्येक शासनाने अंगीकारलेले आहे. देशांतर्गत राजकारणात काँग्रेस, भाजप व इतर पक्षांमध्ये राजकारण चालत असले तरी परराष्ट्र धोरणात देशांतर्गत राजकारणाचा प्रभाव दिसत नाही. सत्ता जरी बदली तरी परराष्ट्र धोरणात सातत्य दिसते.

### ६. राष्ट्रीय पक्षांचाच परराष्ट्र धोरणात राष्ट्रीय हिताला महत्त्व :-

भारताच्या परराष्ट्र धोरणात 'राष्ट्रीय हित' नेहमीच प्रत्येक राजकीय पक्षाने महत्त्वपूर्ण मानले आहे. येथे संकुचित राजकारणाला महत्त्व दिले नाही. जर शासन व्यवस्थेत पक्षीय सत्ताबदल झाले तरी परराष्ट्र धारेणाची दिशा बदललेली नाही. स्वातंत्र्यानंतर पं. नेहरू आंतरराष्ट्रीय शांतता, सहअस्तित्व जे परराष्ट्र धोरणातील मूल्य आहे ते आज ही भाजप पक्षाचे शासन आले तरी चालू असल्याचे निदर्शनास येते.

या पद्धतीने भारतीय राजकारणातील राजकीय पक्ष हे प्रामुख्याने परराष्ट्र धोरणातील महत्त्वपूर्ण प्रक्रियेतील घटक असून परराष्ट्र धोरणाच्या दिशा निदर्शनात मोलाचे सहकार्य करतात.

## ❑ ब) दबाव गट :-

लोकशाही प्रक्रियेत 'दबावगट' हा आवश्यक भाग असून या दबावगटाच्या माध्यमातून हितसंबंधाचे अविष्कारण व स्वसंरक्षण केले जाते. आज लोकशाही व्यवस्थेच्या गुंतागुंतीच्या प्रक्रियेत अनेक दबावगट निर्माण झाले आहे. ते आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शासनाच्या विविध व्यवस्थांवर आपला प्रभाव पाडत असतात. त्यातील परराष्ट्र धोरण हे महत्त्वाची प्रक्रिया असून या प्रक्रियाच्यावर दबाव गटाचा प्रभाव पडत असतो. या दबावगटाची परराष्ट्र धारेणात पुढील भूमिका दिसून येते.

### १. शासनाच्या परराष्ट्र धोरण प्रक्रियेवर प्रभाव :-

दबाव गट म्हणजे हितसंबंधाचे अविष्कार होय. या हितसंबंधावर आधारित दबाव गट परराष्ट्र धोरणाच्या प्रक्रियेवर आपल्या विचारांचा व हितांचा प्रभाव पाडत असतो. भारतात परराष्ट्र धोरणाशी निगडीत अनेक दबाव गट आहेत. यात व्यापारी, औद्योगिक, धार्मिक यांच्याशी निगडीत दबावगटांचा समावेश होतो. हे गट भारताचे इतर राष्ट्राशी असलेल्या संबंध, करार आपल्या फायद्याच्या दृष्टीने व्हावे यासाठी प्रयत्नशील असतात. त्यासाठी उच्चस्तरीय पातळीवर दबाव निर्माण करतात.

### २. पाश्चमात्य शैलीचे दबावगटाचा प्रभाव :-

भारतातील धोरण निर्माण प्रक्रियावर व निर्णयावर पाश्चमात्य दबाव गटाचाही प्रभाव दिसून येतो. यात आंतरराष्ट्रीय राजकारणातील दबाव गटाचा समावेश होत. प्रामुख्याने व्यापार, पर्यावरण, ऊर्जाशी निगडीत प्रभाव गट परराष्ट्र धोरणावर पडला. आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरण, अणुऊर्जा, व्यापाराशी निगडीत आंतरराष्ट्रीय संघटना या आपल्या फायद्याच्या दृष्टीने भारताच्या परराष्ट्र धोरणावर दबाव आणतात. भारताच्या परराष्ट्र धोरणावर १९९१ नंतर बदल झाला हा बदल IMF, WB यासारख्या संघटनांच्या दबावामुळेच घडला. भारताने खाऊजा धोरण स्विकारले. पर्यावरणविषयक

परराष्ट्र धोरणात क्यूटो प्रोटोकॉल, तसेच IPCC ही पर्यावरण विषय संघटनेचा प्रभाव पडलेला असतो. अणु ऊर्जा संदर्भात जगातील विविध अणु ऊर्जा संघटनाचाही प्रभाव दिसतो.

**३. भारतातील दबाव गटाचे असंघटित प्रभाव :-**

भारतीय परराष्ट्र धोरणावर दबाव गटाचा प्रभाव पडत असला तरी पाश्चमात्य देशाप्रमाणे येथे दबावगट प्रभावशाली व सुसंघटित नाहीत. त्यामुळे यांचा प्रभाव जास्त प्रमाणात दिसून येत नाही. हे दबाव गट राजकीय पक्षांच्या माध्यमातूनच आपल्या मागण्या मांडतात. भारतात विविध विषयाला अनुसरून दबाव गट असून यांच्यात सुसंघटितपणा नसल्याने यांचा जास्त प्रभाव दिसून येत नाही.

**४. दबावगटांच्या विचारप्रणालीचा प्रभाव :-**

भारतीय परराष्ट्र धोरणावर प्रभाव पाडणाऱ्या दबाव गटांचे मर्यादित प्रभाव आहे. पण यात विचारप्रणालीवर आधारित दबाव गटांचा प्रभाव दिसतो. यात सांस्कृतिक, धार्मिक गटांचा प्रभाव दिसून येतो. सांस्कृतिक आदान-प्रदान ह्यावर भारतीय दबाव गटाच्या विचारप्रणालीचा प्रभाव दिसतो.

**५. भारतीय परराष्ट्र धोरणात आर्थिक दबाव गटाचा प्रभाव :-**

१९९० नंतर भारतीय परराष्ट्र धोरणामध्ये 'आर्थिक' घटक महत्त्वपूर्ण मानले जाऊ लागले. भारतीय परराष्ट्र धोरणाची दिशा आर्थिक व्यवस्थेवर वाटचाल करू लागली. यात भारताने विविध धोरणे राबविली, ज्यात निर्यात वाढ करणे, विविध देशांशी प्रस्थापित करून व्यापार वाढवण्याचे उद्दिष्ट्ये ठेवले गेले. यामुळे विविध आर्थिक हितसंबंधाशी निगडीत स्थापन झालेल्या दबाव गटाचा प्रभाव ही धोरण निर्माण करताना दिसून येते. या धोरणात व्यापारी, निर्यातदार गट, परकीय गुंतवणूक करणारे गट यांचा समावेश होतो.

**६. कायदे मंडळाच्या माध्यमातून दबाव गटाचा प्रभाव :-**

दबाव गट हे राजकीय पक्षांची पूर्वतयारी असते. राजकीय पक्ष आपले प्रतिनिधी कायदे मंडळात निवडणूकीच्या माध्यमातून पाठवतात. पण हे प्रतिनिधी विविध गटांचे प्रतिनिधीत्व करत असतात. हे गटाचे प्रतिनिधी जेव्हा कायदे मंडळात जातात, तेव्हा ते आपल्या दबावगटाच्या हिताचे परराष्ट्र धोरणासंबंधी कायद्याच्या प्रक्रियेत मत मांडतात, निर्णय घेतात. उदा. शुगर लॉबी, कापड, ताग. अशा व्यापारी दृष्टीने महत्त्वाचे विषयासंबंधी परराष्ट्र धोरण ठरवताना हे प्रतिनिधी आपल्या हितसंबंधाचा प्रथम विचार करतात.

अशा पद्धतीने दबाव गट हा भारतीय परराष्ट्र धोरणाच्या निर्मिती प्रक्रियेत अप्रत्यक्षपणे भूमिका बजावत असतो.

## ❑ क) प्रसार माध्यमे :–

प्रसार माध्यमामध्ये वृत्तपत्र, आकाशवाणी, दूरदर्शन व इतर दृक व श्राव्य माध्यमांचा समावेश होतो. आज इंटरनेट व सोशल मिडिया हेही प्रसारमाध्यमातील प्रभावी साधने आहेत. या प्रसार माध्यमाचा सरकारच्या विविध धोरणावर प्रभाव पडत असतो. यातील परराष्ट्र धोरणावर ही प्रसार माध्यामांचा क्रियाशिलतेचा प्रभाव पडतो तो पुढीलप्रमाणे :–

### १. परराष्ट्र धोरणाबद्दल जागृती निर्माण करणे :–

पूर्वीच्या काळी प्रसार माध्यमांवर शासनाची मक्तेदारी होती, पण यात आता बदल झाला आहे. प्रसार माध्यमात खाजगी मक्तेदारीचा शिरकाव झाल्याने विविध वृत्तमानपत्र, वृत्तवाहिन्यांची संख्या वाढली आहे. या वाहिन्यांवर व वृत्तपत्राच्यांकडून परराष्ट्र धोरणाविषयी चर्चा घडवून आणली जाते व त्यासंदर्भात जागृती केली जाते. प्रसार माध्यमे आपल्या व्यासपीठाच्या माध्यमातून परराष्ट्र धोरणाबद्दल विविध तज्ज्ञांना बोलवून त्याविषयी मत मांडून चर्चा घडवून आणतात. याप्रकारे जागृती निर्माण केली जाते.

### २. लोकमत तयार करणे :–

प्रसार माध्यमे ही लोकमत निर्माण करण्याची माध्यमे असतात. भारतीय परराष्ट्र धोरणाविषयी जनतेमध्ये जागृती करून त्याबद्दल लोकमत तयार करण्याचे कार्य केले जाते. हे तयार करताना परराष्ट्र धोरणाबद्दल चर्चा वृत्तवाहिन्यांच्या माध्यमातून घडवले जाते. लोकांना प्रश्नांच्या माध्यमातून मत विचारले जाते. अशाप्रकारे परराष्ट्र धोरणाबद्दल लोकमत तयार केले जाते.

### ३. संवेदनशील प्रश्नांची योग्य दखल घेण्याचे कार्य :–

प्रसार माध्यमाकडून भारतीय परराष्ट्र धोरणाबाबत विविध संवेदनशील प्रश्नांची दखल घेतली जाते. भारत–चीन संबंधातील तिबेट, डोकलाम प्रश्नाबाबत प्रसार माध्यमांनी व्यवस्थित वर्णन करून परिस्थितीची जाणिव करून दिली. तसेच श्रीलंकेतील तमिळ वंशाचा प्रश्न, अरब देशातील भारतीयांच्या सुरक्षेचा प्रश्न, आंतरराष्ट्रीय पर्यावरण संदर्भात भारताची भूमिका अशा विविध संवेदनशील प्रश्नांची दखल प्रसार माध्यम घेतात व याचा प्रभाव परराष्ट्र धोरणावर पडतो.

### ४. परराष्ट्र धोरण प्रक्रियेत प्रसारमाध्यामांची दखल :–

प्रसार माध्यमाकडून भारतीय परराष्ट्र धोरणाविषयी विविध पद्धतीने विश्लेषण केले जाते, मते आजमावली जातात. त्याचा प्रभाव भारतीय परराष्ट्र धोरणकर्त्यावर पडतो. तसेच त्यांना प्रसारमाध्यमांच्या प्रश्नांना उत्तरे द्यावी लागतात. त्यामुळे त्याच्या निर्णयावर प्रभाव होतो.

याप्रकारे प्रसार माध्यमेही परराष्ट्र धोरणावर लोकांमध्ये जागृती करून, विविध देशाशी निगडीत

प्रश्नांना प्रसिद्ध देवून तसेच परराष्ट्र धोरणातील उणिवा दाखवून परराष्ट्र धोरणावर प्रभाव पाडतात.

## २.२.४ भारतीय परराष्ट्र धोरणावर आंतरराष्ट्रीय राजकारण व व्यापाराचा.प्रभाव

भारतीय परराष्ट्र धोरणाचा विकासामध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणाचा प्रभाव झालेला आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात होणारे बदल हे भारतीय परराष्ट्र धोरणाच्याही धोरणात्मक बदलावर झालेले आहे, ते पुढीलप्रमाणे :-

### ❑ अ) आंतरराष्ट्रीय राजकारणाचा भारतीय परराष्ट्र धोरणावर प्रभाव

**१. स्वातंत्र्यपूर्वकाळात राष्ट्रीय काँग्रेसचा भारतीय परराष्ट्र धोरणावर प्रभाव :-**

ब्रिटीश साम्राज्यवादी व्यवस्थेत भारतीय परराष्ट्र धोरणावर आंतरराष्ट्रीय राजकारणाने प्रभावीत होत होते. यामध्ये राष्ट्रीय काँग्रेसच्या निर्णयावर दिसते. यात ब्रिटीश शासनाने शेजारी राष्ट्राच्या अंतर्गत भागात केलेला हस्तक्षेप, निषेध, तहासंबंधीचे मत, पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाच्या स्थापनेतील सहभाग, आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे सदस्यत्व, महिला व्यापाराविषयी करारावर स्वाक्षरी, जर्मन, इटलीच्या लष्करशहाचा विरोध इत्यादी विविध आंतरराष्ट्रीय घटकांवर राष्ट्रीय काँग्रेसचा परराष्ट्र धोरणावरच्या प्रक्रियेवर प्रभाव पडला होता.

**२. स्वातंत्र्यानंतर भारतीय परराष्ट्र धोरणावर प्रभाव :-**

स्वातंत्र्यानंतर भारतीय परराष्ट्र धोरणाच्या प्रक्रियेवर आंतरराष्ट्रीय राजकारणात दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचा प्रभाव पडला. यातूनच अलिप्तता, साम्राज्यवादविरोधी, वंशविरोध, आंतरराष्ट्रीय शांतता व सहअस्तित्त्व, अहस्तक्षेपही धोरणे भारतीय परराष्ट्र धोरणाची तत्त्वे बनली. यांचा प्रभाव परराष्ट्र धोरणाच्या निर्णय प्रक्रियेवर पडत असतो.

**३. शीतयुद्ध काळात भारतीय परराष्ट्र धोरणावर प्रभाव :-**

भारतीय परराष्ट्र धोरणामध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणात सुरू झालेल्या शीतयुद्धाचा प्रभाव पडला. त्यावेळी भारतीय परराष्ट्र धोरणात नववसाहतवादाला विरोध, वंशवादाला विरोध, शस्त्रास्त्र स्पर्धेला विरोध, अण्वस्त्रांना विरोध हे धोरण ठरवण्यात आले. तसेच आंतरराष्ट्रीय राजकारण संघर्षाचा नसून शांततेचा आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या माध्यमातून विकास हे परराष्ट्र धोरणाची दिशा ठरवण्यात आली होती. तसेच भारतीय परराष्ट्र धोरणात अलिप्तता हे धोरण या आंतरराष्ट्रीय राजकारणातील शीतयुद्धाचे परिणाम आहे.

**४. शीतयुद्धोत्तर भारतीय परराष्ट्र धोरणावर प्रभाव :-**

भारतीय परराष्ट्र धोरण शीतयुद्धानंतर बदललेले दिसते. आंतरराष्ट्रीय राजकारणात झालेले बदल, जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाचा प्रभाव यामुळे भारतीय परराष्ट्र धोरणात

'राष्ट्रीय हिताला' महत्त्व प्राप्त झाले व व्यापार हा घटक महत्त्वपूर्ण झाला. आंतरराष्ट्रीय राजकारणातील आर्थिक उदारमतवादामुळे भारताने परराष्ट्र धोरणात व्यापारी हितसंबंधाला महत्त्व दिले. नवीन-नवीन व्यापारी संबंध प्रस्थापित केले. ज्यात आफ्रिका खंड, पूर्वेकडे पहा धोरणाचा उल्लेख करावा लागेल. तसेच पर्यावरण संरक्षण, मानवाधिकार, दहशतवाद, अण्वस्त्राचा प्रसार रोखणे या आंतरराष्ट्रीय मुद्यांचाही प्रभाव भारतीय परराष्ट्र धोरणावर झाला.

**५. २००० नंतर भारतीय परराष्ट्र धोरणावर प्रभाव :-**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला १० वर्षानंतर भारतीय परराष्ट्र धोरणात विविध बदल जागतिक राजकारणाच्या बदलत्या परिदृश्यानुसार झाले. त्यात अणुपरिक्षणानंतर भारतीय परराष्ट्र व्यापारावर निर्बंध २००२ नंतर बदल होवू लागले. त्यांचा परिणाम २००८ साली भारत-अमेरिका अणुकरार होय. तसेच 'दहशतवाद', 'चीनचे विस्तारवादी धोरण', 'हिंदी महासागरमधील बदलते संदर्भ', 'सागरी संरक्षण', 'ब्रीक्स'सारख्या आंतरराष्ट्रीय संघटनांची निर्मिती इत्यादी सर्वांचा प्रभावाने भारतीय परराष्ट्र धोरण कधी वास्तववादाकडे राष्ट्रीय हिताकडे मार्गक्रमण करताना आढळते.

अशा पद्धतीने भारतीय परराष्ट्र धोरणावर इतर देशांशी संबंध निर्माण करताना आंतरराष्ट्रीय राजकारणाचा प्रभाव दिसतो व त्यात बदलत्या परिदृश्यानुसार परराष्ट्र धोरणात बदल करावे लागतात.

## ❑ ब) व्यापार

'व्यापार' हा प्राचीन काळापासून विविध देश एकमेकांशी करतात. आधुनिक काळात 'व्यापार' हा प्रमुख घटक परराष्ट्र धोरणाच्या प्रक्रियेत असून यावरून परराष्ट्र धोरणाची दिशा ठरत असते. व्यापारामध्ये विदेशी किंवा आंतरराष्ट्रीय व्यापार तसेच देशांतर्गत व्यापार हा परराष्ट्र धोरणाच्या धोरण निश्चितीवर प्रभाव पाडत असतात.

व्यापाराचे देशांतर्गत व विदेशी व्यापार दोन प्रकार पडतात, त्यातील देशांतर्गत व्यापार हा देशातील सीमापुरता मर्यादित असतो तर विदेशी व्यापारामध्ये विविध देशांचा समावेश होत. हा विदेशी व्यापार म्हणजे दोन भिन्न राष्ट्रांतील व्यक्तींनी एकमेकांशी वस्तू व सेवा घेण्यासंबंधी केलेली देवाण-घेवाण होय. यात निर्यात व आयात व्यापार हे प्रमुख व्यापार असून पुनर्निर्यात हाही व्यापार अलीकडे विकसित झाला आहे.

विदेशी व्यापार करतात भारताला विविध देशाशी परराष्ट्र संबंध प्रस्थापित करावे लागतात. विदेशी व्यापारातून देशांतर्गत गरजांची पूर्तता होते. तसेच भारत हा विकसनशील राष्ट्र असल्याने नवीन उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी भारताला विविध यंत्रसामुग्रीची आयात करणे अनिवार्य होते. त्यातून भारतातील उत्पादन क्षमतेचा विकास झाला, तसेच निर्यातीच्या माध्यमातून भारत देशांतर्गत उत्पादनाला विविध देशात बाजारपेठ निर्माण करून देतो. त्यामुळे भारताच्या देशांतर्गत बाजारपेठेला चालना मिळते.

या व्यापारासंबंधी विविध संघटना कार्यरत आहेत. यातील आयातगृह, निर्यातगृह, आयात-निर्यात व्यापारी, आयात-निर्यात प्रतिनिधी, आयात-निर्यात संघटना, उत्पादकांचा निर्यात विभाग इत्यादी संघटना विदेशी व्यापारात कार्यरत असून व्यापारविषयक भारताच्या परराष्ट्र धोरणावर यांचा प्रभाव पडतो.

### ❀ भारताचे परकीय व्यापार धोरण व परराष्ट्र धोरण :-

भारताचे परकीय व्यापार धोरणातूनच भारताची परराष्ट्र धोरणाची दिशा प्राप्त होते. स्वातंत्र्यपूर्वकाळामध्ये भारताचे परकीय व्यापार धोरण पूर्णपणे ब्रिटीश सरकारच्या मर्जीवर अवलंबून होते. या धोरणात ब्रिटीश साम्राज्यवादाला अनुसरून कार्य होत होते. यामुळे त्याचा विकास झाला नाही, तसेच त्याच्या या धोरणामुळे भारताचे परराष्ट्र धोरणही मर्यादित राहिले.

स्वातंत्र्यानंतर भारतीय व्यापार धोरणात बदल झाला. भारताला आपला विकास करण्यासाठी विदेशी व्यापाराची गरज निर्माण झाली, त्यामुळे भारताने सुरवातीच्या काळात परराष्ट्र धोरणात 'अलिप्तता' स्विकारली व जागतिक राजकारणात दोन्ही गटात न सामील होता दोन्ही गटाकडून मदत मिळवण्याचे धोरण अवलंबले व त्यानुसार भांडवलशाही व साम्यवादी गटातील देशांशी व्यापारी धोरण राबवले. या व्यापारी धोरणात देशांतर्गत निर्यातक्षम उद्योगांना प्रोत्साहन दिले. स्वदेशी मालास प्राथमिकता देताना इतर देशांबरोबर द्विपक्षीय व बहुपक्षीय करार केले. तसेच १९६२ ला आयात पर्यायी धोरण स्विकारले.

१९८० नंतर भारतीय व्यापारी धोरणात बदल होऊ लागले, तसेच परराष्ट्र धोरण ही बदले व १९८५ ला प्रथमच त्रिवर्षीय 'आयात-निर्यात' धोरण जाहीर केले, ज्यात निर्यातवृद्धीला प्राधान्य देण्यात आले. १९९१ ला आर्थिक सुधारणा लागू केल्यानंतर प्रथम १९९२-९७ ला पहिले पंचवार्षिक आयात-निर्यात धोरण घोषित केले गेले. या धोरणात 'उदारीकरण व स्वावलंबन' हा मुख्य उद्देश होता. या धोरणामुळे भारतीय परराष्ट्र धोरणात बदल झाला व व्यापारी उद्देशाने भारताने 'फोकस लॅटिन अमेरिका' धोरण स्विकारले. तसेच दुसरे आयात-निर्यात व्यापारी धोरण १९९७-२००२ ला जाहिर झाले. या धोरणामुळे भारताने 'फोकस सी.आय.एस.' ही योजना कार्यान्वित केली. तसे 'लुक ईस्ट' पॉलिसी जाहीर केले. ज्यामुळे भारतीय परराष्ट्र धोरणात आसियान देशांना महत्त्व प्राप्त झाले व त्यांच्याविषयी धोरण ठरवण्यास सुरवात झाली. भारताचा सहभाग आसियान शिखर संमेलनमध्ये होवू लागला.

२००४-०९ मध्ये नवीन असे 'परकीय व्यापार धोरण' जाहीर झाले. या व्यापार धोरणामध्ये परकीय चलनाप्रमाणेच 'आर्थिक वृद्धी' निर्माण करणे, निर्यातीत-जागतिक हिस्सा वाढवण्याचे धोरण होते. या धोरणामुळे भारतीय परराष्ट्र धोरणात आफ्रिका खंडातील देशाबद्दल व्यापारी दृष्टिकोन अवलंबला गेला व या देशांशी संबंध दृढ करायला सुरुवात केली. भारताचा व्यापार जगातील विविध

देशांशी वादू लागल्याने त्याचा परिणाम भारतीय परराष्ट्र धोरणातील विविध देशांशी असलेल्या संबंधावर पडू लागला. जसे, भारत-चीन व्यापार हा सर्वात जास्त आहे. त्यावेळी सीमा विवाद प्रश्नात संघर्ष झाला तरी तो टोकाचा संघर्ष होत नाही, त्यावर व्यापारी संबंध प्रभावित करत असतो. तसेच भारत ही जागतिक बाजारपेठ असल्याने आज प्रत्येक देश भारताशी संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे. भारताच्या या व्यापारी घटकामुळे अमेरिका, चीन, आसियात राष्ट्र, रशिया, जपान इ. राष्ट्र भारताशी संघर्षाचे नसून चांगले संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. व्यापार धोरणाचा अप्रत्यक्ष व प्रत्यक्षरित्या भारतीय परराष्ट्र धोरणावर मोठा प्रभाव पडतो.

भारतीय परराष्ट्र धोरणाची १९९१ नंतर आर्थिक घटक महत्त्वपूर्ण झाल्याने व्यापारी संबंधावर भारताचे परराष्ट्र धोरण आपले धोरण स्वतंत्रपणे आखत आहे. विविध देशात गुंतवणूक करून आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रभाव प्रस्थापित करत आहे. याचप्रमाणे व्यापारी उद्देशाने स्थापन झालेल्या जागतिक व्यापार संघटनेचा भारत सदस्य असून यासंघटनेच्या अटीचाही प्रभाव भारतीय परराष्ट्र धोरणावर पडतो आहे.

अशाप्रकारे 'व्यापार' हा घटक भारतीय परराष्ट्र धोरणाला प्रभावित करू शकतो.

## स्वयं अध्ययन प्रश्न-२

❑ **रिकाम्या जागा भरा.**

१. भारतात ............... पक्ष पद्धती आहे.

२. पंडित नेहरू ............... पक्षाचे पंतप्रधान होते.

३. १९९१ नंतर भारतात ............. धोरण स्विकारले.

४. शीतयुद्धाच्या काळात भारताने ............ धोरण स्विकारले.

५. ................ पहिले पंचवार्षिक परकीय धोरण जाहीर झाले.

### ❑ क) भारतीय परराष्ट्र धोरणावर आर्थिक प्रभाव :-

भारताचे परराष्ट्र धोरण हे स्वातंत्र्यात 'आंतरराष्ट्रीय शांतता, सहअस्तित्व, अलिप्तता, पंचशील' या तत्त्वावर आधारलेले होते. या धोरणात आंतरराष्ट्रीय राजकारण व राष्ट्रीय हितावर दृष्टीने जसे बदल झाले. तसेच सामाजिक आर्थिक घटकाचाही प्रभाव पडला. यातील सुरवातीच्या काळात, सांस्कृतिक, भौगोलिक, सामाजिक घटकाचा प्रभाव इतर देशाशी संबंध प्रस्थापित करताना पडत होता. यात सुरवातीला भारताने अलिप्तता धोरण स्विकारून जगातील विकसनशील राष्ट्राचा संच तयार केला. याचा उद्देश आंतरराष्ट्रीय शांतता व सहकार्य हे होते. येथे परस्पर सहकार्याने विकासाची भूमिका असली तरी त्याला प्रामुख्याने महत्त्व दिलेले नव्हते. यानंतर १९९० च्या दशकात व शितयुद्धाच्या

काळात भारताच्या परराष्ट्र धोरण विचारप्रणालीतून राष्ट्रीय हिताकडे वळू लागले. यामुळे आर्थिक हिताच्या दृष्टीने विचार होऊ लागला.

भारताने १९९१ ला जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण धोरण स्विकारले. या धोरणामुळे भारतीय परराष्ट्र धोरणात बदल झाले व परराष्ट्र धोरणात 'आर्थिक धोरण' प्रामुख्याने लक्ष देण्यात आले. यातून भारतीय परराष्ट्र धोरणात विविध धोरणांची निर्मिती झाली. यामध्ये 'पूर्वेकडे पहा' ही आर्थिक प्रभावातून निर्माण झालेले धोरण आहे. या धोरणाचा मुख्य उद्देश 'आर्थिक' असा होता.

भारताने उदारीकरणाचा स्विकार केल्यानंतर भारत एक जागतिक बाजारपेठ म्हणून उदयास येवू लागली व भारत आज जगातील सर्वात मोठी आर्थिक शक्ती म्हणून उदयास आली आहे. यामुळे परराष्ट्र धोरणाच्या विविध घटकांवर आर्थिक प्रभाव पडला तो पुढीलप्रमाणे :-

### १. १९९१ नंतर 'आर्थिक' विषय परराष्ट्र धोरण :-

भारतीय परराष्ट्र धोरणात १९९१ मध्ये 'खाऊजा'चा स्विकार केल्यानंतर देशांतर्गत विकास, आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे परराष्ट्र धोरणात 'आर्थिक' घटक प्रामुख्याने प्रस्तावित केले गेले व या धोरण विविध देशांशी संबंध प्रस्थापित करताना 'आर्थिक' घटकाला महत्त्व दिले गेले.

### २. 'आर्थिक'घटकाचा परराष्ट्र धोरणातील आदर्श तत्त्वावर प्रभाव :-

भारतीय परराष्ट्र धोरणात पंचशील, अलिप्तता, मानवी सहकार्य, वंशवाद इ. आदर्श मूल्याचा प्रभाव सुरवातीपासून दिसून येतो, पण 'आर्थिक' घटकाचा प्रभाव वाढल्याने परराष्ट्र धोरणात भारत इतर देशाशी संबंध प्रस्थापित करताना या घटकाकडे काही प्रमाणात दुर्लक्ष केले जात असल्याचे निदर्शनास येते, जसे म्यानमारमधील आकारान प्रांतातील मानवी हक्काच्या उल्लंघनाबाबत भारताचे मौन, श्रीलंकेतील वंशवाद, इराणमधील संघर्ष इ. घटनाबाबत भारताचे 'आर्थिक' घटक प्रभावी ठरत आहे.

### ३. 'आर्थिक' घटकामुळे भारतीय परराष्ट्र धोरणात नवीन धोरणाचा उदय :-

भारतीय परराष्ट्र धोरणाला 'आर्थिक' घटकाला महत्त्व दिल्याने भारत इतर देशांशी संबंध प्रस्थापित करताना धोरण राबवले आहे. यात भारताने आसियत देशातील विविध देशांशी संबंध प्रस्थापित करताना 'पूर्वेकडे पहा' हे धोरण राबवले यानुसार आसियान संघटनेचा सहभागी सदस्य बनवून 'आर्थिक' संबंध प्रस्थापित केले. १९९१ नंतर भारताने अमेरिकेबरोबर संबंधाची पुर्नरचना करताना भारताने 'आर्थिक' व्यवस्थेचा विचार केला. 'आफ्रिकाकडे पहा' हे भारताने २००२ नंतर भारतीय परराष्ट्र धोरणात आर्थिक दृष्टिने स्विकारलेले धोरण होय.

### ४. जागतिक आर्थिक संघटना व परिषदेमध्ये सहभाग :-

भारतीय परराष्ट्र धोरणावर 'आर्थिक' प्रभावामुळे भारताच्या परराष्ट्र धारेणाने जगातील विविध संघटनात भाग घेतला. ज्यात ब्रिक्स, 'आर्थिक व्यापार संघटना' यांचा भारत सदस्य आहे. तसेच युरोपियन युनियन शिखर परिषद, आफ्रिकन युनियन शिखर परिषद, आसियत शिखर परिषद, शांघाई संघटनेत सहभागी सदस्य अशी विविध संघटना व परिषदेमध्ये भारत 'आर्थिक' घटकामुळे सहभाग होत आहे.

### ५. नवीन जागतिक बाजारपेठ म्हणून उदय :-

भारताच्या उदारीकरण धोरणामुळे देशांतर्गत विकास वाढत आहे. आज भारत जागतिक बाजारपेठ म्हणून उपलब्ध आहे. यामुळे प्रत्येक देश भारताशी संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे. याच्यामुळे भारतीय परराष्ट्र धोरणात बदल घडते आहे. भारत आपले आर्थिक हिताच्या दृष्टीने विविध देशांशी संबंध प्रस्थापित करत आहे.

### ६. परराष्ट्र धोरणातील इतर घटकावर 'आर्थिक' घटकामुळे प्रभाव :-

भारतीय परराष्ट्र धोरणानी विविध नैसर्गिक, विचारधारा, सीमा, हवामान इ. घटक निर्धारक असले तरी यांच्यापेक्षा 'आर्थिक घटक' जास्त प्रभावी ठरत आहे. भारताचे शेजारील राष्ट्राबरोबर सीमा विवाद आहेत. जसे भारत-चीन सिमा विवाद तरीपण या विवादाला कधीच युद्धाचे स्वरूप आले नाही, त्याचे कारण 'आर्थिक हितसंबंध' आहेत. तसेच म्यानमारबरोबर असलेले संबंधात आता 'आर्थिक' घटक प्रभावी ठरत आहेत.

या पद्धतीने भारताच्या परराष्ट्र धोरणात आर्थिक घटक प्रभावी ठरत आहे. भारतावर अणुस्फोटानंतर आलेले निर्बंध 'आर्थिक' घटकाच्या प्रभावाने दूर झालेले आहेत.

## २.३ सारांश

भारतीय परराष्ट्र धोरणावर अंतर्गत व बाह्य घटकाचा प्रभाव पडतो. या घटकाचा परराष्ट्र धोरणाची दिशा देतात. यात राजकीय पक्ष, दबाव गट, प्रसारमाध्यमे ही लोकशाही व्यवस्थेतील प्रभावी घटकाचा भारतीय परराष्ट्र धोरण प्रभावित करतात पण यातील दबाव गटाचा प्रभाव कमी दिसून येतो. तसेच भारतीय परराष्ट्र धोरणावर आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या घडामोडीचा परिणाम होतो. अलिकडे परराष्ट्र धोरणावर 'आर्थिक घटक' प्रभावी ठरत असून आंतरराष्ट्रीय व्यापाराची भूमिकाही परराष्ट्र धोरण प्रभावित करते तसेच राजकारणाचाही प्रभाव पडतो. याप्रकारे भारतीय परराष्ट्र धोरणावर विविध घटकाचा प्रभावातून परराष्ट्र धोरणाची दिशा ठरते.

## २.४ पारिभाषिक शब्द

१. **दबावगट** : समाजहितसंबंध असलेले लोक संघटित होवून आपल्या मागण्यासंदर्भात शासनावर दबाव आणतात त्यांना दबावगट म्हणतात.

२. **बहुपक्षपद्धती** : एकापेक्षा अनेक पक्ष ज्यावेळी निवडणूकीत भाग घेतात त्याला बहुपक्ष पद्धत म्हणतात.

३. **आयात गृहे** : परदेशातून आपल्या देशातील आयातदारांच्यावतीने माल आयात करणाऱ्या संस्थांना आयात गृहे म्हणतात.

## २.५ स्वयंअध्ययन प्रश्न व उत्तरे

☛ **स्वयं अध्ययन प्रश्न–१ ची उत्तरे**

१. *आशिया खंडाच्या दक्षिण भागात भारताचे स्थान आहे.*

२. *भारताला १५,२०० कि.मी. सीमा लाभली आहे.*

३. *भारताच्या पूर्वेस बंगालचा उपसागर व पश्चिमेस अरबी समुद्र आहे.*

☛ **स्वयं अध्ययन प्रश्न–२ ची उत्तरे**

१. *कायदेमंडळ.*

२. *विचार विनिमय, चर्चा, प्रश्न विचारणे.*

३. *कार्यकारी मंडळ.*

४. *भारतीय पंतप्रधान.*

☛ **स्वयं अध्ययन प्रश्न–३ ची उत्तरे**

१. *बहुपक्ष पद्धती.*

२. *राष्ट्रीय काँग्रेस पक्ष.*

३. *जागतिकीकरण.*

४. *अलिप्तता.*

५. *१९९२–९७.*

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न.

१. भारतीय परराष्ट्र धोरणात कार्यकारी मंडळाच्या भूमिकेचे विवेचन करा.

२. भारतीय परराष्ट्र धारेणावर आंतरराष्ट्रीय राजकारण व व्यापारावर प्रभाव स्पष्ट करा.

### ब) टिपा लिहा.

१. भारतीय परराष्ट्र धोरणावर संस्कृतीचा प्रभाव.

२. भारतीय परराष्ट्र धोरणावर राजकीय पक्षाचा प्रभाव.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **डॉ. शैलेंद्र देवळाणकर :** *''भारत आणि जग''*, प्रकाशक-सकाळ पेपर्स, जून, २००५, पुणे.

२. **लाटे रा. ज. :** *''आंतरराष्ट्रीय संबंध''*, प्रकाशक-पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.

३. **रायपूरकर वसंत :** *''आंतरराष्ट्रीय संबंध''*, नागपूर प्रकाशन, १९९९.

४. **व्ही. बी. पाटील :** *''भारताचे परराष्ट्र धोरण''*, के. सागर पब्लिकेशन, पुणे, २०००.


❒❒❒

घटक–३

# शीतयुध्दोत्तर काळातील भारताचे इतर राष्ट्रांशी संबंध

**(India's relations with other Countries in Post Cold War Ear)**

अनुक्रमणिका

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

    ३.२.१ भारताचे अमेरिका व युरोपीय संघाशी संबंध

    ३.२.२ भारत : रशिया आणि चीन

    ३.२.३ भारत : पाकिस्तान, श्रीलंका व बांग्लादेश

३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.४ स्वयं:अध्ययन प्रश्न व उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्ट्ये

प्रत्येक राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणांमध्ये ते राष्ट्र आपल्या शेजारील व इतर राष्ट्रांशी आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वहित लक्षात घेवून मैत्री संबंध अथवा विरोधाचे/संघर्षाचे संबंध जोपासत असते. या संबधांचाच सदर प्रकरणाच्या अभ्यासात आपण पुढील घटकांचा अभ्यास करणार आहोत.

- १९९० नंतरच्या (शीतयुध्द समाप्ती) काळात भारताचे अमेरिका व युरोपियन युनियनशी कशा प्रकारचे संबंध निर्माण झाले ते समजून येईल.
- शीतयुध्दाच्या समाप्तीनंतरच्या काळात भारताने रशिया व चीनशी असणारे परस्परसंबंध कसे जोपासले याविषयी माहिती घेणे.

* याच काळात भारताने आपली शेजारी राष्ट्रे पाकिस्तान, श्रीलंका आणि बांग्लादेश बरोबर परराष्ट्र धोरण कसे राबवले याची माहिती घेणे.

या निमित्ताने आपण भारताच्या आंतरराष्ट्रीय राजकारणातील स्थानांचे व परराष्ट्र धोरणांतील बदलांचे आकलन होईल. या प्रकरणाच्या अभ्यासानंतर आपणास १९९१ नंतरच्या भारतीय परराष्ट्र धोरणातील परिवर्तने अभ्यासता येतील.

## ३.१ प्रास्ताविक

परराष्ट्र धोरण व आंतरराष्ट्रीय राजकारण हे विषय केवळ क्रमिक पाठ्यपुस्तक/संदर्भ ग्रंथ या पुरते मर्यादित न राहता ते आज आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव टाकणारे निकटचे विषय आहेत. परराष्ट्र धोरण किंवा आंतरराष्ट्रीय राजकारण हे केवळ राष्ट्रीय प्रश्न असून त्यांचा संबंध केवळ केंद्र सरकार, परराष्ट्र मंत्रालय, संरक्षण मंत्रालय यांच्याशिवाय असतो. या पोकळ गैरसमजातून आपणास बाहेर पडावे लागेल. कारण आज जग हे आज खेडे बनले आहे. दळणवळणाची प्रगत साधने व तंत्रज्ञानाने भौगोलिक सीमारेषा अस्तित्त्वहीन बनत चालल्या आहेत. देशातील प्रत्येक नागरिकाचा राष्ट्राचा घटक या नात्याने राष्ट्रांशी निगडित प्रत्येक धोरणांशी संबंध येतो.

दुसऱ्या महायुध्दानंतर जगामध्ये रशिया (साम्यवादी) व अमेरिका (भांडवलशाही) या दोन महासत्तामध्ये जगात वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी प्रत्यक्षात कधीही युध्द न करता फक्त सर्व बाजूने युध्दाची तयारी करण्यात आली. या दोन महासत्तांच्या वर्चस्व स्पर्धेच्या काळास (१९४५-९०) शीतयुध्द असे म्हणतात. दोन्ही राष्ट्रांनी या काळात आपल्या विचारसरणीच्या प्रसाराबरोबर आर्थिक, औद्योगिक, लष्करी व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात तीव्र ईर्षेने प्रगती केली. १९९० नंतर रशिया (USSR) चे छोट्या-छोट्या राष्ट्रांत विभाजन झाल्याने रशियाचे स्थान कमकुवत झाले व अमेरिकेला तुल्यबळ स्पर्धक न राहिल्याने शीतयुध्दाची इतिश्री झाली. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाला हे एक निर्णायक वळण व टप्पा होता. रशियाच्या विभाजनानंतर अमेरिका एकमेव प्रबळ महासत्ता राहिली.

या शीतयुध्दोत्तर काळात भारताच्या परराष्ट्र नीतीला या नव्या बदलाप्रमाणे नव्या नीतीचा अवलंब करावा लागला. आंतरराष्ट्रीय राजकारणात आपले स्थान मजबूत करण्यासाठी भारतीय परराष्ट्र धोरणात नव्या धोरणांचा अवलंब या काळात सुरू झाला. यासाठी सदरच्या घटकांत आपण शीतयुध्दोत्तर काळातील भारताचे इतर राष्ट्रांशी असणाऱ्या संबंधाची चर्चा करणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

पूर्वीच्या सोव्हिएत महासंघाच्या विघटनानंतर अमेरिका व सोविएत महासंघातील शीतयुध्दांची समाप्ती झाली असे चित्र निर्माण झाले. या शीतयुध्द काळात दोन्ही राष्ट्रांनी परस्परांना अनेक

धमक्या, चेतावण्या दिल्या होत्या. प्रत्यक्ष युध्द कधीही न होता दोन्ही राष्ट्रांनी आपल्या गटात आशिया व युरोपमधील अनेक राष्ट्रे खेचून एक परस्पर सहकार्याच्या संघटना उभ्या केल्या. उदा. NATO, वार्सा.

अमेरिका व सोव्हिएत महासंघ ही दोन्ही राष्ट्रे आपल्या गटातील राष्ट्रांना आर्थिक, लष्करी व तांत्रिक मदत करत व आपल्या भांडवलशाही व साम्यवादी धोरण-विचारांचा पगडा निर्माण करत. या सगळ्या शीतयुध्द काळात भारताने अधिकृतरित्या कोणत्याही गटांत सामील न होता. आपले आस्तित्व स्वतंत्र ठेवले, वास्तविक भारताने सुरुवातीपासूनच शांतता व सहकार्याचे धोरण स्वीकारले आहे. १९९० नंतर रशियाच्या विघटनानंतर जागतिक पातळीवर नवी कुटनिती व सहकार्याची समीकरणे निर्माण झाली. साम्यवादी विचारसरणीचा आश्रयदाता सोव्हिएत महासंघ दुबळा झाल्याने साम्यवादाला उतरती कळा आली. भारताने शितयुध्दाच्या काळात आपले परराष्ट्र संबंध या दोन्ही राष्ट्रांशी संतुलित ठेवले होते. भारतासाठी शीतयुध्दाचा काळ एक तारेवरची कसरत होती.

१९९० नंतर जागतिक राजकारणात अमेरिका ही एकमेव महासत्ता उरली. जागतिक राजकारणाचे स्वरूप शीतयुध्दानंतर बदलले. भारताला या प्रसंगी आपल्या पारंपारिक व अलिप्ततावादी परराष्ट्र नीतीला नव्या स्वरूपात मांडावे लागले. शेजारी राष्ट्रांबरोबरच युरोपीयन व अमेरिका या राष्ट्रांच्याबरोबर नवे मैत्रीपर्व आरंभ करावे लागले. शीतयुध्दोत्तर काळात भारताने आपल्या आर्थिक, व्यापारी, औद्योगिक व राजनैतिक हितसंबंधाना अनुसरून व राष्ट्राच्या संरक्षणसज्जतेसाठी परराष्ट्र धोरणात मूलभूत स्वरूपाचे बदल केले. शीतयुध्दाची समाप्ती हा जागतिक राजकारणातील सर्वात निर्णायक बदल होता. शीतयुध्दोत्तर काळात भारताने पं. नेहरू प्रणित आदर्शवादी परराष्ट्र धोरणांमध्ये बदलत्या जागतिक परिस्थितीनुसार बदल केले. या काळात भारताने आपले आर्थिक व औद्योगिक हितसंबंध प्रथम विचारात घेवून परराष्ट्रांशी संबंध जोपासले.

## ३.२.१ भारताचे अमेरिका व युरोपिय संघाशी संबंध

शीतयुध्दोत्तर काळात द्विध्रुवीय जागतीक रचना अमेरिकेच्या नेतृत्वामुळे एकध्रुवीय बनली. सोव्हिएत महासंघाच्या विघटनाने अमेरिकेला तुल्यबळ स्पर्धकच शिल्लक राहिला नाही. १९४५ ते १९९० या काळात भारतीय परराष्ट्र धोरणांत रशियाची मैत्री अधिक दृढ बनली होती. भारताचे पारंपारिक शत्रुराष्ट्र पाकिस्तान हे पूर्णपणे अमेरिका आश्रित असल्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर विशेषत: युनोमध्ये रशिया भारताचा समर्थक होता. सोव्हिएत महासंघाच्या विघटनाने जगाची रचना एकध्रुवीय (Unipolar) झाली. भारतानेही आपल्या पारंपारिक मित्रांबरोबर अमेरिकेशी असणारे द्विपक्षीय संबंध मजबूत करणे सुरू केले.

### ❒ १९९१ नंतरचे भारत-अमेरिका संबंध

१. **१९९१ नंतर भारत-अमेरिका संबंधात सकारात्मक परिस्थिती :** १९९१ सालचे भारताचे

नवे आर्थिक-औद्योगिक धोरण आणि भारतात सुरु झालेली खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाची प्रक्रिया या नव्या बदलांमुळे भारताने आपल्या पारंपारिक समाजवादी धोरणाला सोडचिठ्ठी दिली. भारतात थेट परकीय गुंतवणूक व बहुराष्ट्रीय कंपन्याना भारतीय बाजारपेठ खुली झाली. औद्योगिक परवाना पध्दत शिथिल झाली. १९९२ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात अधिक उदारीकरण स्विकारून अर्थव्यवस्थेला नवे वळण दिले गेले. या नव्या वळणामुळे अमेरिका प्रभावित झाली. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक यांच्या मदतीने आयात उदारीकरण, विनियंत्रण आणि रुपयाचे अवमूल्यन सुरू झाले. भारताची महाकाय बाजारपेठ अमेरिकेला उपलब्ध झाल्याने परस्पर मैत्री व सहकार्याचे नवे पर्व सुरू झाले. यावेळी अमेरिकेने आर्थिक व औद्योगिक अंगाने विचार केल्यास चीन व पाकिस्तानपेक्षा भारताला अधिक पसंती दिली. युनोच्या निर्णयप्रक्रियेत भारताने अमेरिकेच्या बाजूने आखाती युध्दात कौल दिला. भारताच्या आखाती युध्दातील सहकार्याबद्दल अमेरिकेने भारताचे कौतुक केले. भारताने इस्रायल या अमेरिकेच्या मित्रराष्ट्रांशी अनुकूल धोरण स्वीकारल्याने अमेरिकेनेही काश्मीर प्रश्नावर भारताला अनुकूल भूमिका घेत ''शिमला समझोता'' मान्य केला.

२. **जॉर्ज बुशच्या काळातील संबंध :** १९९२ साली अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांनी भारत-पाक चर्चा व सहकार्याचा विचार मांडला. मे १९९२ साली भारत-अमेरिका नौदलाचा संयुक्त अभ्यास सराव झाला. पुढे अमेरिकेत डेमॉक्रॅटिक पक्षाचे बिल क्लिंटन राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर दोन्ही देशांतील संबंधाना नवे वळण प्राप्त झाले. श्री. क्लिंटन यांनी द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यासाठी नोव्हेंबर १९९२ साली उच्चस्तरीय प्रतिनिधी मंडळ पाठवले. शीतयुध्दोत्तर काळात असे सकारात्मक बदल झाले तरी देखील अमेरिकेने NPT, CTBT या अण्वस्त्र प्रसार नियंत्रण करारांवर सही करण्याचा दबाव भारतावर वाढवला होता.

३. **पी. व्ही. नरसिंहराव काळातील संबंध :** मे १९९४ साली तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव यांनी अमेरिकेला भेट दिली. याप्रसंगी दोन्ही देशात लोकशाही, मानव अधिकार, उदारमतवाद, जागतिक शांतता आणि स्थिरता क्षेत्रात सहकार्याचे संयुक्त घोषणापत्र जाहीर केले. यामुळे दोन्ही देशातील संबंधाना गती प्राप्त झाली. व्यापार, संरक्षण, विमा, उर्जा संचार या क्षेत्रात १९९५ पर्यंत द्विपक्षीय संबंधात सहकार्याचे चढ-उतार दिसून येतात. मार्च १९९५ साली श्रीमती हिलरी क्लिंटन या भारत दौऱ्यावर आल्या. पर्यावरण सुरक्षा क्षेत्रात दोन्ही देशांनी एकत्रित काम करण्याचे ठरविले. अशा सकारात्मक बाबी दोन्ही देशात घडत असताना दुसरीकडे अमेरिकेने पाकिस्तानला लष्करी

महत्त्व देणे चालूच ठेवले. १९९६-९८ नंतर दोन्ही देशांत सहकार्यात वाढ झाली.

४. **१९९७ नंतरचे भारत-अमेरिका संबंध :** १९९७ साली तत्कालीन पंतप्रधान आय.के.गुजराल व श्री. क्लिंटन यांची संयुक्त राष्ट्र संघटनेत भेट झाली. माजी पंतप्रधान मा. अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात १९९८ साली भारताने अणुचाचणी घेतली. या चाचण्यानंतर अमेरिकेने भारतावर कडक आर्थिक निर्बंध लादले. भारताने केलेल्या अणुचाचणीनंतर भारत-अमेरिका संबंधात कटुता निर्माण झाली.

५. **२००० नंतर भारत-अमेरीका संबंध सहकायाचे पर्व :** सन २००० नंतर वाजपेयी सरकारच्या काळात भारत-अमेरिका संबंध हे व्यापार-उद्योग या क्षेत्रात सहकार्याचे राहिले. २००४ साली भारतात केंद्र सरकारमध्ये सत्तापरिवर्तन झाले व डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधान बनले. या काळात २००६ साली झालेला दोन्ही देशातील नागरी अणुउर्जा सहकार्य करार हे मोठे वळण होते. भारताला ऊर्जा निर्मितीसाठी अणु इंधन व तंत्रज्ञान मिळाले. २००९ साली बराक ओमाबा राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी २०१० साली भारत दौरे केले व भारताशी असणारे द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्याचे घोषित केले. भारतीय संस्कृती-लोकशाही प्रणाली व धर्मनिरपेक्षता या भारतीय परंपरेचे त्यांनी कौतुक केले. मे २०१४ साली मा. नरेंद्र मोदी पंतप्रधान बनले. केंद्रातील सत्ता परिवर्तनानंतर भारत-अमेरिका संबंधाना नवे स्वरूप प्राप्त झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेला भेद दिली. याही काळात व्यापार-उद्योग-पर्यटन-आरोग्य व शैक्षणिक क्षेत्रात सहकार्याचे संबंध सुरू राहिले.

२०१७ साली अमेरिकेत सत्ता परिवर्तन होत डोनाल्ड ट्रंम्प राष्ट्राध्यक्ष बनले. अमेरिकेने प्रथम हे धोरण स्वीकारल्याने भारतातून अमेरिकेत नोकरी शिक्षणासाठी गेलेल्या व जाणाऱ्या नागरिकांना व्हीसा विषयक निर्बंध लागू केले. आता भारत-अमेरिका संबंधात अनेक क्षेत्रात मित्रत्वाने व सहकार्याचे संबंध आहेत. यामध्ये चढ-उतार दिसून येतात.

अमेरिका आपले पाकिस्तानविषयक धोरण हे पक्षपातीपणाचे ठेवते. त्याचा दहशतवादी स्तरावर भारताला फटका बसतो. आशिया खंडातील चीनच्या वर्चस्वाला शह देण्यासाठी अमेरिका भारताबरोबर सलोख्याचे संबंध ठेवत आहे. भारतीय अर्थव्यवस्था-बाजारपेठ व उदयोन्मुख महासत्ताकडे होणारी वाटचाल लक्षात अमेरिका भारताशी उत्तम सहकार्याचे धोरण ठेवत आहे.

## ❐ भारत व युरोपिय युनियन संबंध

### ❀ युरोपीय युनियन (EU)

युरोपमधील २७ देशांची अतिप्रगत आर्थिक व व्यापारी संघटना म्हणजे युरोपियन युनियन होय. १९४५ म्हणजे दुसऱ्या महायुध्दानंतर आर्थिक सहकार्य तसेच व्यापार वर्धित करण्याच्या उद्देशाने युरोपीयन देश एकत्र येवू लागले. १९५७ साली बेल्जियम, जर्मनी, फ्रान्स, इटली, लक्झेनबर्ग आणि नेदरलँड या सहा देशांनी EEC (European Economic Community) संस्था स्थापन केली. या संस्थेमार्फत व्यापार, सेवा, उत्पादन आणि उत्पादनाचे घटक यांची मुक्तपणे देवाण-घेवाण होऊ लागली. कालांतराने युरोपियन देशांमधील हे सहकार्य आर्थिक आणि व्यापारापलीकडे अणुऊर्जा पर्यावरण, आरोग्य, सुरक्षा आणि जागतिक संबंध, न्याय आणि स्थलांतर अशा व्यापक दृष्टीकोणातून होऊ लागले. यातूनच पुढे १९९३ साली EEC चे रूपांतर युरोपियन युनियन मध्ये करण्यात आले.

युरोपियन युनियन ही कायदे आधारित संस्था आहे. युरोपियन युनियनचे विविध करारांवर आधारित सर्व निर्णय घेतले जातात. उदा. १९९३ मॅस्ट्रीयच करार (Maastricht Treaty).

युरोपियन युनियनच्या प्रशासनात प्रातिनिधीक लोकशाहीचे तत्त्व अवलंबिण्यात आले आहे. या लोकशाहीचे खालील आधारस्तंभ आहेत.

१) युरोपीयन संसद.

२) युरोपीयन आयोग.

३) युरोपीयन युनियन परिषद.

४) युरोपीयन परिषद.

युरोपियन युनियनने शांतता, स्थैर्य आणि भरभराटीचे कार्य उत्तमपणे बजावले आहे. युरोपातील शांतता, सलोखा, लोकशाही आणि मानवी हक्क या क्षेत्रातील कार्याबद्दल २०१२ चा शांततेचे Nobel पारितोषिक देण्यात आले.

### ❀ युरोपियन युनियनचे सदस्य राष्ट्रे :-

ऑस्ट्रीया, बेल्जियम, बल्गेरिया, क्रोएशिया, सायप्रस, डेन्मार्क, फिनलँड, फ्रान्स, जर्मनी, ग्रीस, हंगेरी, झेकप्रजासत्ताक, इस्टोनिया, आयर्लंड, इटली, लाटव्हिया, लिथूआनिया, लक्झेमबर्ग, माल्टा, नेदरलँड, पोलंड, पोर्तुगाल, रुमानिया, स्लोवाकिया, स्पेन, स्वीडन, इंग्लंड. सन २०१६ साली इंग्लंड युरोपियन युनियनमधून बाहेर पडला आहे.

## ❒ भारत आणि युरोपीयन युनियन

१९९१ साली भारताने नव्या आर्थिक धोरणांचा स्वीकार केला. भारतामध्ये आर्थिक उदारीकरणाची व मुक्तपणाची प्रक्रिया सुरू झाली. भारतीय बाजारपेठ जगभरातील गुंतवणूक व भांडवलासाठी खुली झाली. या नव्या आर्थिक व औद्योगिक धोरणाचा प्रभाव भारताच्या परराष्ट्र धोरणावरही पडला. युरोपातील राष्ट्रांशी भारताचे औद्योगिक, कृषी, तंत्रज्ञान, पर्यावरण व ऊर्जा या क्षेत्रांत परस्परहिताचे संबंध प्रस्थापित झाले.

१) २८ जून २००७ पासून भारत आणि युरोपियन युनियन दरम्यान BTIAC (Bialateral Trade and Investement Agreement) हा करार चर्चाधीन आहे. द्विपक्षीय वस्तू व्यापार, सेवा, गुंतवणूक वाढण्यासाठी दोघांमध्ये चर्चा सुरू आहे.

२) भारत आणि  दरम्यान होणाऱ्या चर्चेत पुढील विषय आहेत. व्यापार सरलीकरण, व्यापार अडथळे, व्यापार सहकार, स्पर्धा शासकीय वसुली, तंटा निवारण.

३) युरोपमधील स्वित्झर्लंड, लियेनस्टीन, नॉर्वे, आईसलँड यांनी एक युरोपीयन मुक्त व्यापार क्षेत्र निर्माण केले आहे. भारताने या क्षेत्रासोबत TEPA (Trade and Partnership Agreement) करार केला आहे. नोव्हेंबर २०१३ मध्ये TEPA अंतर्गत नवी दिल्लीत बैठक पार पडली. लवकरच हा करार लागू होण्याची शक्यता आहे.

४) २०१५-१६ साली भारताच्या निर्यातीत युरोपियन युनियनचा १७% वाटा होता. यात प्रामुख्याने रत्ने, दागिने, मौल्यवान खडे, मौल्यवान धातू या गटांचा समावेश होतो. २०१५-१६ साली भारताच्या आयातीत युरोपियन युनियनचा वाटा ११.५ होता.

५) युरोपीयन युनियन मध्ये भारताचा सर्वाधिक व्यापार जर्मनी व त्या खालोखाल इंग्लंड सोबत आहे. जर्मनी हा भारताच्या आयातीतला मोठा भागिदार तर इंग्लंड हा भारतातून होणाऱ्या निर्यातीतला सर्वात मोठा भागिदार देश आहे.

६) २०१७ साली भारत व युरोपीय युनियनमध्ये ९१.५२ असा डॉलरचा व्यापार झाला.

## ३.२.२ भारत : रशिया आणि चीन

शीतयुध्द काळातही भारत आणि सोव्हिएत संघ परस्परसंबंध घनिष्ठ स्वरूपाचे होते. सोव्हिएत संघाचे विघटन होणे. भारतासाठी चिंताजनक होते. १९७१ साली भारत आणि सोव्हिएत महासंघात मैत्री, शांतता आणि सहकार्याचा करार झालेला होता. सोव्हिएत महासंघाच्या विघटनानंतर १९९१ साली न्यूयॉर्क मध्ये रशियाचे राष्ट्रपती बोरिस येल्तसित यांनी आपले तत्कालीन पंतप्रधान श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांची भेट घेतली.

१. **१९९२ नंतरचे भारत व चीन संबंध :** जानेवारी, १९९२ साली भारताच्या परराष्ट्र सचिवांच्या नेतृत्त्वाखाली एक उच्चस्तरीय शिष्टमंडळाने रशियाला भेट दिली. यामध्ये रशियाबरोबर एका नव्या मैत्री व सहकार्याला अंतिम रूप देण्यात आले. भारताने जुन्या सोव्हिएत महासंघातील विभाजन होवून स्वतंत्र झालेल्या देशांना मदतीसाठी १५ कोटी रुपये देण्याचे ठरविले. ही आर्थिक मदत तेथील लहान मुलांना आहार, औषधे व अत्यावश्यक सेवा उपलब्ध करण्यासाठी खर्च केली जाणार होती.

एप्रिल, १९९२ साली रशियाच्या परराष्ट्र मंत्र्यांनी भारताला क्रांयोजेनिक तंत्रज्ञान (क्षेपणास्त्र प्रणाली) देण्याचे सुतोवाच केले. भारताला त्यांनी दिलेल्या भेटीत रशिया व भारतातील परस्परहितांवर आधारीत राजकीय व आर्थिक व्यवस्थामध्ये असणारे संबंध मजबूत करण्याचा संकल्प केला व भारत-रशियातील व्यापार संधीला अंतिम रूप दिले. १९९२ पर्यंत या संधीची वैधता होती.

जानेवारी, १९९३ मध्ये रशियाचे राष्ट्रपती येलत्सीन यांनी भारत दौरा केला. या दरम्यान दोन्ही देशांत रुपया-रुबल या चलनांचा विनिमय दर, भारताच्या अंतराळ संशोधनाच्या कार्यक्रमाला क्रायोजेनिक तंत्रज्ञान देणे. या विषयांवर सहकार्य करार झाले. जुन्या मैत्री कराराची जागा नव्या मैत्री कराराने घेतली. यामध्ये १४ सूत्री कार्यक्रम होता. ज्यामध्ये संरक्षण साहित्य, विज्ञान, दहशतवाद विरोध, मादक पदार्थ तस्करी रोखणे या संदर्भातील करार होते.

या भारतभेटी दरम्यान राष्ट्रपती येलत्सीन यांनी पत्रकार परिषदेत घोषणा केली की, रशिया काश्मीरला भारताचा अविभाज्य भाग मानतो व आंतरराष्ट्रीय स्तरावर रशिया भारताला काश्मीर प्रश्नांवर सहकार्य करेल. तसेच श्री. येल्तसिन यांनी युनोतील सुरक्षा परिषदेत भारताला कायम सदस्यत्व मिळण्यासाठी मत देण्याची तयारी दर्शविली. रशियाने घेतलेली ही भूमिका भारतासाठी खूप महत्त्वाची व बळ देणारी होती. श्री. येल्तसिन यांच्या भेटीनंतर भारत व रशियामधील अनावश्यक गैरसमज दूर होवून द्विपक्षीय सद्‌भाव, सहकार्य व मैत्रीचे नवे युग सुरू झाले.

२. **पी. व्ही. नरसिंहराव काळात भारत-रशिया संबंध :** जुलै, १९९४ साली भारताचे पंतप्रधान श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांनी रशिया दौरा केला. यामध्ये लष्करी, व्यापार, तंत्रज्ञान व युध्दनीतीच्या क्षेत्रांतील करारांवर सह्या झाल्या. या दरम्यान "Indo-Russia Aviation Private Limited" स्थापन करण्याचे ठरले. या प्रकल्पांतर्गत भारतामध्ये 'मिग' विमानांचा निर्मिती सुरू झाली.

यानंतर मार्च १९९६ साली दोन्ही देशांत परस्पर सहकार्याच्या ३ करारांवर सह्या झाल्या. तत्कालीन परराष्ट्रमंत्री प्रणव मुखर्जी यांनी भारताची बाजू मांडत दोन्ही देशांच्या पंतप्रधान कार्यालयांदरम्यान तात्काळ संपर्कासाठी ''हॉट लाईन'' स्थापन करण्याचे ठरले. रशियाकडून अत्याधुनिक अशा सुखोई-३० एम.के.१ या युध्द विमानांची खरेदी करण्याचा करार झाला.

३. **एच. डी. देवेगौडाच्या काळातील संबंध :** मार्च १९९७ साली तत्कालीन पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांनी रशियाला भेट दिली. या दरम्यान द्विपक्षीय आणखी सहा करार झाले. अमेरिकेचा विरोध असतानाही रशियाने भारतात दोन अणुभट्ट्या निर्माण करण्याची योजना तयार केली. १९९८ साली रशियाचे पंतप्रधान प्रिमाकोव भारताचा राजकीय दौरा केला. १९९९ सालच्या कारगील युध्दात रशियाने पाकिस्तानला नियंत्रण रेषेचे पालन करत घुसखोरी थांबवण्याचा सल्ला दिला होता. सन २००० नंतर वाजपेयी सरकारच्या काळात द्विपक्षीय संबंध सुरळित व घनिष्ठ राहिले.

४. **२००४ नंतरचे भारत-रशिया संबंध :** २००४ साली डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधान झाल्यानंतर भारताची अमेरिकेशी जवळीक वाढली. विविध क्षेत्रांत अमेरिकेबरोबर ही सहकार्य सुरू झाले. यामुळे रशियाने भारताशी असलेल्या संबंधात थोडी परिवर्तनाची भूमिका घेतली.

आज केंद्रात मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ही रशियाबरोबर लष्करी साहित्य, दहशतवादाविरोधातील लढा, आर्थिक व औद्योगिक सहकार्य चालू ठेवले आहे. २०१५ मध्ये मॉस्कोतील सैन्य परेडमध्ये भारताने सहभाग घेतला होता. रशिया व भारताने नव-नवीन प्रकल्पाचे उद्घाटन संयुक्तपणे केले आहे. भारतातील हेलिकॉप्टर्सच्या संयुक्त निर्मितीने संबंधातील नवीन आयाम प्राप्त झाले आहेत. भारताचे 'मेक इन इंडिया' प्रकल्पाला रशियाने मजबूतीकरण दिले आहे. रशिया हा परमाणु ऊर्जातील भारताचा महत्त्वपूर्ण भागिदार आहे. २०१५ मध्ये अंतरीम एजन्सीच्या शांतता उद्देश सहकार्य करार झाला आहे.

सन २०१० पासून भारत-रशिया सहकार्याला नवे वळण रूप प्राप्त झाले. 'ब्रिक्स' या संघटनेच्या स्थापनेत भारत, रशिया, ब्राझील, चीन व साऊथ आफ्रिका या राष्ट्रांनी संयुक्तपणे पुढाकार घेतला. कर्नाटकमधील 'कैगा' अणुऊर्जा प्रकल्पाला रशियाचे सहकार्य लाभले आहे. तामिळनाडूमधील 'कुडणकुलम' या अणुऊर्जा प्रकल्पाला रशियाने तांत्रिक मदत पुरवली आहे. भारताचे इतर देशांशी असणाऱ्या संबंधाबरोबर रशियाशी असणाऱ्या जुन्या घनिष्ठ संबंधात काही चढ-उतार होत असले तरी आजही रशिया-भारत मैत्री-

सहकार्य वृध्दिगंत होत आहे.

## स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१

### ❐ रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१. .................. साली भारत-रशिया मैत्री सहकार्य करारा झाला.

२. तामिळनाडूमधील .................... अणुप्रकल्पाला रशियाचे सहकार्य लाभले आहे.

३. जुलै १९९४ साली .................... यांनी रशियाला भेट दिली.

४. ................... साली भारत-रशिया दरम्यान Hot Line सुरू झाली.

५. ................... ही विमाने भारताने रशियाकडून खरेदी केली.

### ❐ भारत आणि चीन

चीन हे भारताचे शेजारी राष्ट्र असून स्वातंत्र्यप्राप्तीपासून भारत-चीनची वाटचाल आशिया खंडातील महासत्ता देश म्हणून सुरू आहे. १९६२ च्या चिनी विश्वासघातकी आक्रमणानंतर भारताने चीनशी असणारे परस्पर संबंधाना अधिक वास्तवतेची जोड दिली. सोव्हिएत महासंघाचे विघटन आणि शीतयुध्दाची समाप्ती झाल्यानंतर भारताने शेजारी राष्ट्रांशी असणाऱ्या परराष्ट्र संबंधात बदलत्या आंतरराष्ट्रीय समीकरणाप्रमाणे परिवर्तन केले.

शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर भारताचे चीनशी असणारे संबंध पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. **राजीव गांधीच्या काळातील संबंध :** १९८८ साली तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी ५ दिवसीय चीनचा दौरा केला होता. यादरम्यान दोन्ही देशांत आर्थिक, वैज्ञानिक, तांत्रिक व सांस्कृतिक सहकार्यासाठी एका संयुक्त आयोगाची स्थापना करण्यात आली. यानंतर पुढे डिसेंबर १९९१ साली चीनच्या पंतप्रधानानी ६ दिवसांचा भारत दौरा केला. ३१ वर्षानंतर चीनचे पंतप्रधान भारत दौऱ्यावर आले होते. या भेटीदरम्यान पुढील ३ करार झाले होते.

    (अ) शांघाय व मुंबई दरम्यान वाणिज्य दुतावास सुरू करणे.

    (ब) दोन्ही देशांत सीमा व्यापार सुरू करणे.

    (क) दोन्ही देशात अंतराळ संशोधन, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात परस्पर सहयोग करणे.

    तसेच दोन्ही देशांतील सीमावादाचा तोडगा शीघ्रपणे व परस्पर संमतीने काढला जाईल व अंतिम तोडगा निघेपर्यंत सीमेवर शांतता ठेवली जाईल, असे ठरवण्यात आले.

भारतानेही तिबेटवरील चीनच्या हक्कांचा दावा स्वीकारत तिबेट चीनचा एक स्वायत्त क्षेत्र असल्याचे जाहीर केले.

२. **१९९१ नंतरचे संबंध :** मे १९९२ साली भारताचे राष्ट्रपती श्री. आर. वेंकटरामन चीनच्या राष्ट्रपतींच्या नियंत्रणावरून ६ दिवसांच्या सरकारी दौऱ्यावर चीनला गेले होते. श्री. वेंकटरामन हे चीनला भेट देणारे पहिले राष्ट्रपती होते. या भेटींमुळे भारत-चीन संबंधात धिम्यागतीने सुधारणा झाली. चीनच्या राष्ट्रपतींनीही ही भेट ''मोठी संधी'' असल्याचे कौतुक केले. या भेटीत ''हिंदी-चीनी भाई-भाई'' चा पुनरुच्चार करण्यात आला. सप्टेंबर १९९३ साली तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्या चीन भेटीनंतर द्विपक्षीय संबंधात रचनात्मक बळ प्राप्त झाले. या दौऱ्याचे सर्वात मोठे यश म्हणजे दोन्ही देशांनी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर शांति व सहकार्य ठेवण्याचे धोरण ठरवले व सीमेवरील परिस्थिती ''जैसे थे'' ठेवण्याचे ठरले. यासाठी संयुक्त कार्य गटाची स्थापना करण्यात आली.

मे-जून १९९४ साली चीनमध्ये भारत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. चीनमध्ये एखाद्या परराष्ट्राचा होणारा पहिलाच मेळावा होता.

३. **१९९६ नंतर भारत-चीन संबंध :** १९९६ साली (२८ नोव्हेंबर ते १ डिसेंबर) चीनचे राष्ट्रपती जियांग जेमिन यांनी भारताला भेट दिली. या यात्रेदरम्यान सीमारेषा व प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर विश्वासाचे वातावरण तयार करण्याच्या कराराला मूर्त रूप देणे निश्चित झाले होते. यासह अन्य तीस करार झाले. यानुसार हाँगकाँग मध्ये भारताचा वाणिज्य दुतावास स्थापन्न करण्याचे ठरवले.

मे, १९९७ मध्ये दोन्ही देशांत विमान सेवा पुरवण्याचा करार झाला. त्या अंतर्गत दोन्ही देशात थेट विमानसेवा सुरू होवून दोन्हींकडील २-२ विमान सेवा कंपन्यांना संधी दिली जाईल.

तत्कालीन परराष्ट्रमंत्री जसवंत सिंह यांनी जून, १९९९ साली चीनचा दौरा केला. याच दरम्यान कारगीर संघर्ष सुरू असल्याने भारताच्या दृष्टीने महत्त्वाची होती. या भेटीत दोन्ही देशांत ''सुरक्षा संवाद तंत्र'' प्रारंभ करण्याचे ठरले. कारगिलबाबत दोन्ही देशांनी आपले दृष्टीकोन एकमेकांस कळवणे असे निर्णय घेण्यात आले.

४. **२००० नंतरचे बदलते संबंध :** मे-जून, २००० साली भारताचे राष्ट्रपती के. आर. नारायणन यांनी द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यासाठी ६ दिवसीय राजकीय भेट दिली. याप्रसंगी चीनने भारतामध्ये तिबेटमधील दलाई लामा या नेत्याला दिलेला आश्रय चुकीचा व धोकादायक असल्याचे विधान केले.

याशिवाय दोन्ही देशांतील सिया विवादाच्या तर्कसंगत तोडग्यासाठी एक तज्ञ दल स्थापन करण्याचे ठरले. या दौऱ्यातही राष्ट्रपती के. आर. नारायणन यांनी तिबेट हा चीनचा स्वायत्त प्रदेश असल्याचा पुनरुच्चार केला. या दौऱ्यात दोन्ही देशाच्या नेत्यांनी अण्वस्त्रे व तैवान या विषयांना बगल देत सीमाविवाद सोडवण्यासाठी परस्परसंबंध, सामंजस्य व विश्वासाची भावना निर्माण करण्याचे धोरण ठरवले.

चीनचे राष्ट्रपती जियांग यांनी सीमा प्रश्नावर उपाय काढण्यासाठी ३ प्रमुख सुत्रे ठरवली. त्यामध्ये (१) परस्पर समायोजन, (२) परस्पर सद्भाव, (३) परस्पर संमतीने तोडगा. परंतु चीनच्या राष्ट्रपतींनी युनोतील सुरक्षा परिषदेमधील भारताला कायम सदस्यत्व देण्याच्या मागणीला कोणतंही ठोस आश्वासन दिले नाही. त्याऐवजी भारताने युनोच्या पुनर्रचनेची केलेली मागणी योग्य असल्याचे सांगत आशियाई-आफ्रिकी व द-अमेरिकन देशांना युनोत अधिक प्रतिनिधीत्व असावे अशी इच्छा व्यक्त केली.

सन २००० ते २०१० या कालावधीतही भारत आणि चीन चे द्विपक्षीय सहकार्य चालूच राहिले आहे. व्यापार-उद्योग, कृषी आणि वैज्ञानिक क्षेत्रात दोन्ही देशांचे सहकार्य आहेच, परंतु आजही सीमा प्रश्न व तिबेटमधील धर्मगुरूंना भारतात आश्रय देण्याचा प्रश्न सुटलेला नाही. चीनला भारत व त्यांच्या मधील मॅकमोहन ही सीमारेषा मान्य नाही. अरुणाचल व लडाख मधील भूप्रदेशावर चीनने दावा सांगितला आहे. आजही चीन पाकिस्तानला सर्व प्रकारचे आर्थिक, औद्योगिक, लष्करी सहकार्य करत असल्याने चीनवर भारत विश्वास ठेवू शकत नाही. आशिया खंडात भारताला शह देण्यासाठी व भारताची महासत्ता वाटचाल खंडित करण्यासाठी चीन भारताच्या शेजारी राष्ट्रांना भारतविरोधी कारवायांसाठी मदत करतो. २०१२ नंतर भारत-चीन संबंधात पाकिस्तानमध्ये इकॉनॉमिक कॉरीडॉर प्रकल्पावरही भारताने आक्षेप घेतला, कारण हा प्रकल्प काश्मीरच्या भूप्रदेशातून जातो. तसेच चीनची 'स्ट्रीग ऑफ पल्स' नीतीने भारत व चीन संबंधात दुरावा निर्माण झाला आहे. भारताला शह देण्यासाठी चीनने मालदीव, नेपाळ, श्रीलंका देशात आपले वर्चस्व निर्माण करून भारताला शह दिल्याचा प्रयत्न केला आहे. 'डोकलाम' मधील सदस्याचा संघर्ष भारत-चीनमधील तणाव निर्माण झाला आहे.

अशाप्रकारे भारत-चीन संबंधामध्ये आपणांस असे अनेक चढ-उतार दिसून येतात. दोन्ही देशामध्ये सीमाविवाद असला तरी आर्थिक, औद्योगिक व वाणिज्य या क्षेत्रात दोन्हीं देश आज सर्वाधिक जोडले गेलेले आहेत. चीनच्या महत्त्वाकांक्षा व भारताला शह देण्याच्या कुरघोडीना भारत समर्थपणे तोंड देत आशियातील शेजारी राष्ट्रांचे सहकार्य मिळवत आहे. आजही परराष्ट्र संबंध व आंतरराष्ट्रीय राजकारणात चीन हा अविश्वासू व बेभरवशाचा सहकारी आहे.

## स्वयं-अध्ययन प्रश्न-२

❒ **चूक की बरोबर सांगा.**

१. भारत आणि चीनमध्ये असणाऱ्या सीमारेषेला ड्युरंड रेषा असे म्हणतात.

२. राष्ट्रपती के. आर. नारायण यांनी सन २००० साली चीनला भेट दिली?

३. १९९९ साली भारत आणि चीन दरम्यान विमानसेवा सुरू झाली.

४. मे १९९४ साली चीनमध्ये भारत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले?

५. सुरक्षा परिषदेतील स्थायी सदस्यात्वासाठी चीनने भारताला पाठिंबा दिला आहे.

## ३.२.३ भारत : पाकिस्तान, श्रीलंका व बांगलादेश

### ❒ भारत आणि श्रीलंका

शीतयुध्दांच्या समाप्तीनंतर भारताचा हिंदी महासागरातील शेजारी व पौराणिक काळापासून भारताशी देश म्हणजे श्रीलंका होय. १९९० नंतर भारत आणि श्रीलंका संबंधाचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करता येईल. तत्पूर्वी १९४८ पासून भारत-श्रीलंका मैत्री व परस्परसहकार्य समाधानकारकरित्या निर्माण झाले होते.

१. **पंतप्रधान राजीव गांधीच्या काळातील संबंध :** २९ जुलै १९८७ साली भारत आणि श्रीलंका दरम्यान ऐतिहासिक करार झाला, ज्याअन्वये द्विपक्षीय संबंधात नवे पर्व सुरू झाले होते. तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी व श्रीलंकेचे पंतप्रधान श्री. प्रेमदासा यांनी या मैत्री व परस्पर सहकार्यावर संमती केली होती. १९८७ साली भारतात श्रीलंकेतील तामिळ उग्रवादावर तोडगा काढण्यासाठी शांतीसेना पाठवली. भारतीय शांतिसेनेने श्रीलंकेत अंतर्गत हिंसाचारावर उपाययोजना करत तेथील प्रादेशिक परिषदांना निवडणूका घेवून लोकशाही शासन निर्माण करत मजबूती आणली. भारतीय शांतीसेनेला लंकेत हिंसाचाराबरोबर अंतर्गत विरोधालाही तोंड द्यावे लागले.

नोव्हेंबर १९८९ साली भारतातील केंद्रीय सत्ताबदलानंतर शांतिसेना श्रीलंकेतून माघारी बोलावली. १९९० पर्यंत श्रीलंकेतून शांतिसेना पूर्णपणे माघारी परतली. यामुळे तेथील LTTE (Liberation Tiger's of Tamil Elam) या तामिळ बंडखोर संघटनेचे नेते व्ही. प्रभाकरन यांनी पुन्हा नव्या उद्रेकाला सुरुवात केली.

१९९०-९१ साली श्रीलंकन लष्कराने तामिळ बंडखोरांविरोधात जोरदार कारवाई सुरू केली. याप्रसंगी भारताने हा श्रीलंकेचा अंतर्गत प्रश्न मानत मूळ भूमिका स्वीकारली.

भारताने थेट हस्तक्षेप नाकारला. श्रीलंकेतील तामिळ हिंसाचाराचा फटका भारतातील सामाजिक व राजकीय क्षेत्राला बसू नये. यासाठी भारताने श्रीलंकेत थेट हस्तक्षेप थांबवला.

२. **१९९१ नंतर भारत–श्रीलंका संबंध :** २४ ने १९९१ साली LTTE च्या बंडखोरांनी भारताचे तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या घडवून आणली. तामिळ दहशतवादाचा अधिक उग्र धोका नव्याने उभा राहिला. श्रीलंकेतील वांशिक संघर्षाचा जबर फटका भारताला बसला. यानंतर भारतातील तामिळ निर्वासितांना परत श्रीलंकेत पाठवत १९९२ साली LTTE वर बंदी घालण्यात आली. यानंतर द्विपक्षीय संबंधात कटुता व संवेदनशीलता निर्माण झाली. भारतातून तामिळ निर्वासितांना माघारी पाठवण्यास सुरुवात झाली. एकप्रकारे भारताने श्रीलंकेतील अंतर्गत वांशिक प्रश्नांपासून फारकत घ्यायला सुरुवात केली. भारताने LTTE शी कोणतीही बोलणी करण्यास असमर्थतता दर्शवली. यामुळे श्रीलंकेत सरकारमध्ये भारताविषयी नाराजी निर्माण झाली. या काळात द्विपक्षीय संबंध जैसे थे राहून LTTE चा प्रश्न अनिश्चित राहिला.

या सर्व पार्श्वभूमीवर भारत–श्रीलंका पुढे ही चालू राहिले. ऑक्टोबर १९९२ साली श्रीलंकेचे तत्कालीन राष्ट्रपती श्री. प्रेमदासा यांनी भारताला भेट दिली. या दरम्यान भारत–श्रीलंका संबंधाची नव्याने आशादायी सुरुवात झाली. या भेटीत श्रीलंकेच्या राष्ट्रपतींनी LTTE कोणताही समझोता न करण्याचा पुनरुच्चार केला व सार्क देशांदरम्यान सहकार्याचे आवाहन केले. या भेटीत भारतीय मच्छीमारांचा प्रश्न, आर्थिक सहकार्य या विषयांवर चर्चा झाली. परंतु या भेटीत LTTE च्या प्रश्नांबाबत निश्चित योजना तयार झाली नाही. यानंतर १ मे १९९३ साली राष्ट्रपती श्री. प्रेमदासा यांची LTTE च्या बंडखोरांनी निर्घृण हत्या घडवून आणली. यामुळे LTTE वरील बंदी व नियंत्रण कारवाई भारत व श्रीलंकेकडून तीव्र करण्यात आली.

मार्च १९९५ साली श्रीलंकेच्या राष्ट्रपती चंद्रिका कुमारतुंगे यांनी भारताला भेट देत द्विपक्षीय आर्थिक व व्यापारी सहकार्याबरोबर सार्कच्या मजबूतीसाठी समर्थन दिले. तसेच दोन्ही देशांतील अडथळे निर्माण करणाऱ्या घटकांबाबत चर्चा केली. डिसेंबर १९९६ साली पुन्हा राष्ट्रपती कुमारतुंगा यांनी भारताचा ७ दिवसीय दौरा केला व प्रादेशिक सहकार्याचे आश्वासन दिले. यानंतर जानेवारी १९९७ साली पंतप्रधान गुजराल यांनी श्रीलंकेला भेट दिली व शेजारी राष्ट्रांशी सहकार्य वाटवण्याची ईच्छा बोलून दाखविली. याला श्रीलंकेत नेत्यांनी सहमती दर्शविली. भारताने तामिळ समस्येपासून दूर राहण्याबरोबर आर्थिक संबंध वाढवण्याचे ठरवले. या भेटीनंतर द्विपक्षीय संबंध विश्वासाचे वातावरण तयार झाले. दोन्ही बाजूंनी सकारात्मक परिस्थिती झाली. ही भेट बऱ्याच प्रमाणात

यशस्वी ठरली.

३. **वाजपेयीच्या काळातील भारत–श्रीलंका संबंध :** यानंतरच्या १९९८–९९ साली श्री. वाजपेयी यांच्या सरकारनेही दोन्ही देशांतील बहुपक्षीय विकास धोरणाला स्वीकारत श्रीलंकेतील अंतर्गत समस्येवरून दूर राहण्याचे ठरवले. श्री. वाजपेयी यांनीही श्रीलंकेबरोबरची मैत्री व सहकार्याची प्रतिबद्धता दर्शवत श्रीलंकेला मानवीय भूमिकेतून सहकार्य करेल, परंतु LTTE वरील लष्करी कारवाईपासून दूर राहण्याचे ठरवले. जून २००० साली तत्कालीन परराष्ट्रमंत्री जसवंत सिंह यांनी श्रीलंका दौऱ्यात भारतीय धोरणाचे स्पष्टपणे समर्थन केले. या दौऱ्यात मुक्त व्यापार व आर्थिक सहकार्य विकसित करण्याचे निर्णय घेतले गेले. या काळात पुढे फेब्रुवारी २००१ साली श्रीलंकेच्या राष्ट्रपतींनी भारत दौरा करत भारतीय नेतृत्वाबरोबर विभिन्न आंतरराष्ट्रीय समस्यावर चर्चा केली व LTTE च्या प्रश्नांवरील उपाययोजनांबाबत भारताला माहिती दिली. भारतानेही सकारात्मक प्रतिसाद द्विपक्षीय विकास प्रक्रिया गतिमान करण्याचे वचन दिले. LTTE मधील सहकार्यासाठी बैठका व चर्चा करण्याचे ठरवले. यानंतरच्या काळात भारताने श्रीलंकेतील तमिळ समस्या ही त्यांची अंतर्गत समस्या असून त्यावरील तोडगा हा श्रीलंकेच्या एकता व अखंडतेला लक्षात घेवूनच निघावा, अशी स्पष्ट भूमिका घेतल्याचे दिसते.

४. **२००० नंतर भारत–श्रीलंका संबंध :** २००० नंतर भारत–श्रीलंका संबंधात व्यापारात १२% वाढ झाली ती २.६ अब्ज डॉलरपर्यंत पोहचला. भारत–श्रीलंका हे दक्षिण व आशियाई सहकारी पर्यावरण कार्यक्रम, दक्षिण आर्थिक संघ, बिम्सटेक, सार्क यासारख्या बहुपक्षीय संघटनात त्यांचे सहकार्य दिसून येते.

२००३ पासून इकॉनॉमिक अॅन्ड टेक्नोलॉजिकल को–ऑपरेशन एग्रीमेंट करून सेवा, गुंतवणूक, तांत्रिक सहकार्य करण्याचे मान्य केले.

५. **चीनच्या हस्तक्षेपाने भारत–श्रीलंका संबंध :** भारत–श्रीलंका यांच्यातील संबंध सौहार्दाचे असले तरी तमिळ समस्या, मच्छीमाराचा वाद हे तणावाचे मुद्दे होतेच, त्यात चीनचा श्रीलंकेत हस्तक्षेप वाढू लागला व श्रीलंकेतील भारताच्या वर्चस्वाला शह देण्यास सुरुवात केली. मॅरीटन स्लिक रुट व बंदर विकासाच्या माध्यमातून श्रीलंकेत चीनने निधी दिला. यामुळे श्रीलंकेचा चीनकडे कल वाढला हाच भारत–श्रीलंका संबंधात तणाव मुद्दा झाला आहे. असे असतानाही भारताने चीनशी द्वीवंशीय संबंध वाढवण्यावर भर दिला आहे.

दक्षिण आशियातील हे दोन देशामध्ये सौहार्दाचे संबंध आतापर्यंत चालू आहे. पण विविध तणाव निर्माण झाले आहेत. यावेळी भारताने मोठ्या भावाची प्रतिमा सोडून

सहकार्याची प्रतिमा निर्माण केली जावी.

## ❒ भारत आणि पाकिस्तान (शीतयुध्दोत्तर काळातील संबंध)

स्वातंत्र्यप्राप्तीपासून भारत आणि पाकिस्तानचे संबंध काश्मीर प्रश्नांवरून तणावाचे राहिले आहेत. १९४८, १९६५, १९७१ या साली झालेल्या तीनही युध्दात भारताकडून पाकिस्तानचा दारूण पराभव झाला. भारताशी थेट समोरासमोर युध्दभूमीवर लढण्याची कुवत नसल्याने पाकिस्तानने अप्रत्यक्ष व छुप्या दहशतवादी मार्गांचा अवलंब सुरू केला. पाकिस्तान हा अमेरिकेचा मित्र व सामारिक भागीदार देश आहे. पाक लष्कराला अमेरिका आर्थिक व लष्करी मदत मोठ्या प्रमाणावर करत आला आहे, त्यामुळे भारताला रशियाशी असणारे मैत्रीसंबंध दृढ करण्याबरोबर अमेरिकेच्या दुटप्पी धोरणाला तोंडद्यावे लागले. शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर भारत-पाक संबंधाचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

१. **१९९१ नंतरचे भारत-पाक संबंध :** जून १९९१ साली तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्या सरकारने द्विपक्षीय संबंध सुरळित करण्यासाठी प्रयत्न केले. यानंतर दोन्ही देशांच्या प्रमुखांची निरनिराळ्या ठिकाणी ६ वेळा भेट झाली, परंतु या भेटी निष्फळ ठरल्या होत्या. जून १९९२ साली एका पत्रकार परिषदेत बोलताना तत्कालीन पंतप्रधान श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांनी पाकिस्तानशी बिघडलेल्या संबंधाबाबत वक्तव्य केले. १९९२ नंतरच्या काळात पाकिस्तानच्या दहशतवादी कारवाया, आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताविरोधात केलेला अपप्रचार या कारणांमुळे द्विपक्षीय संबंधात भक्कम स्वरूपाच्या सुधारणा झाल्या नाहीत. पाकिस्तानचा भारतद्वेष याला कारणीभूत होता.

६ डिसेंबर १९९२ साली बाबरी मशीद या वादग्रस्त प्रकरणानंतर पाकिस्तानने भारताविरोधात इतर मुस्लीम देशांची मोट बांधण्याचे प्रयत्न सुरू केले. भारताची प्रतिमा 'मुस्लिमविरोधी' असल्याचा दुष्प्रचार सुरू केला. भारतातील मुस्लिमांच्या मानवी हक्कांच्या सुरक्षेच्या प्रश्नावर एकांशी प्रचार सुरू केला. किंबहुना पाकिस्तानमधील राजकीय पक्षांनी लोकप्रियता मिळवण्यासाठी व देशांतर्गत प्रश्नावरून लक्ष विचलित करून अपयश झाकण्यासाठी पाकिस्तानमधील जनतेला सतत भारताची भिती घातली. भारतद्वेष वाढवणे हा तेथील सत्ताधारी राज्यकर्त्यांच्या कुटिल डावपेचाचा भाग बनला. १९९० नंतरच्या काळात पाकिस्तानमध्ये कोणत्याही पक्षाचे सरकार स्थापन झाले किंवा सत्तापरिवर्तन जरी झाले तरीदेखील द्विपक्षीय संबंधावर त्याचा नकारात्मक प्रभाव पडत राहिला. कारण भारतविरोधी प्रचार, द्वेषभावना यांचा उपयोग तेथील सत्ताधिश आपल्या राजकीय लाभासाठी करत आलेत. नवाज शरीफ यांच्यानंतर सत्तेत आलेल्या श्रीमती बेनझीर भुट्टो यांनीही भारतविरोधी धोरण स्वीकारले. भुट्टो यांच्या काळात भारत-पाक संबंध अधिक

कटु बनून पाकपुरस्कृत काश्मिरमधील दहशतवादी कारवाया चालूच राहिल्या.

२. **इंद्रकुमार गुजराल यांच्या काळात भारत-पाक संबंध :** पुन्हा १९९६ साली पाकमधील सत्तापरिवर्तनानंतर नवाज शरीफ पंतप्रधान झाले. त्यांनी भारताशी संबंध सुधारण्याची भाषा केली. याचदरम्यान जून १९९६ साली भारतात संयुक्त मोर्चा पक्षाचे सरकार स्थापन झाले व श्री. इंद्रकुमार गुजराल परराष्ट्रमंत्री बनले. त्यांनी 'गुजराल सिध्दांत' मांडत पाकिस्तानसहित शेजारी राष्ट्रांशी मैत्री व सहकार्याचे धोरण वृध्दिंगत करण्याचे धोरण स्वीकारले. पुढे १९९७ साली श्री. गुजराल स्वत: पंतप्रधान बनले. त्यांनी परराष्ट्रखाते स्वत:कडे ठेवून आपल्या परराष्ट्रनीतीला बळकटी दिली. या दरम्यान पंतप्रधान गुजराल यांनी सार्क व चोगम (राष्ट्रकुल) व युनोच्या सभेदरम्यान निरनिराळ्या प्रसंगी तत्कालीन पाकिस्तानच्या प्रमुखांशी भेट घेत श्री. गुजराल यांनी द्विपक्षीय आर्थिक व व्यापारी संबंध विकसित करण्याचा प्रयत्न केला. तसेच दोन्ही देशांतील संघर्षाचे प्रश्न चर्चेतून सोडवण्याची भूमिका घेतली. १९९७ साली युनोच्या महासभा अधिवेशनात श्री. नवाज शरीफ यांनी काश्मीर प्रश्नांवरून भारतावर आगपाखड केली. याचदरम्यान शरीफ यांनी श्री. गुजराल यांच्याशीही बोलणी केली, परंतु जागतिक पातळीवर त्यांनी भारताविरोधात कडवट प्रतिक्रिया दिली. नंतरच्या काळात १५ जानेवारी १९९८ साली भारत, बांगलादेश व पाकिस्तानच्या प्रमुखांदरम्यान ढाकामध्ये एक आर्थिक शिखर बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीदरम्यान भारत व पाकच्या प्रमुखांदरम्यान बोलणीही झाली, परंतु याचा द्विपक्षीय संबंधाना थेट काही फायदा झाला नाही. १९९१ ते १९९८ या काळात भारत-पाक संबंधात विशेष अशी प्रगती झाली नाही.

३. **पंतप्रधान वाजपेयीच्या काळात भारत-पाक संबंध :** कालांतराने मार्च १९९८ साली भारतात भाजपच्या नेतृत्वाखाली आघाडीचे सरकार स्थापन झाले व श्री. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान बनले. श्री. वाजपेयींनी द्विपक्षीय संबंध सुधारण्यास प्राधान्य दिले. तत्पूर्वी श्री. गुजराल यांच्या काळात दोन्ही देशांत आपत्कालीन तात्काळ संपर्क साधण्यासाठी Hot-Line ची स्थापना झाली होती. तसेच जून व सप्टेंबर १९९७ साली द्विपक्षीय परराष्ट्र सचिवांच्या ३ बैठका पार पडल्या होत्या. या परराष्ट्र सचिव स्वतरावरील बैठकांना पाकच्या आडमुठ्या धोरणांमुळे अपेक्षित यश मिळाले नाही. कारण प्रत्येकवेळी पाकने काश्मीर प्रश्नांचा स्वार्थीपणे अडथळा उभा केला.

यानंतर पंतप्रधान श्री. वाजपेयींच्या नेतृत्त्वाखाली १९९८ ते २००१ या काळात द्विपक्षीय संबंधात ताणतणावजन्य चढ-उतार राहिले. पुढील काही घटना या काळात दोन्ही देशांतील संबंधाना नकारात्मक वळण देणाऱ्या ठरल्या.

(१) भारताची आण्विक चाचणी, (२) कारगील युध्द, (३) लाहोर घोषणपत्र व बस वहातूक सेवा, (४) कारगील युध्दातील पाकच्या पराभवानंतर तेथे लष्कराची सत्ता स्थापन्न झाली. (५) अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांचा भारत दौरा इत्यादी.

श्री. वाजपेयी यांच्या सरकारने जुन्या परराष्ट्र धोरणाला अनुसरून पाकसोबत संबंध सुधारण्यास प्रयत्न केले. ११ व १३ मे, १९९८ साली भारताने पोखरण (राजस्थान) येथे ५ अणुचाचण्या घेतल्या व अण्वस्त्रसज्ज देश असल्याची घोषणा केली. या नव्या आण्विक धोरणांमुळे पाक व चीनची जवळीकता वाढून पाकने छुप्या मार्गाने अण्वस्त्रे बनवण्यास सुरुवात केली. २८ मे, १९९८ साली पाकने भारताला शह देण्यासाठी ६ अणुचाचण्या घेतल्या व स्वत:च्या अण्वस्त्र सज्जतेची घोषणा केली. या चाचणीनंतर श्री. शरीफ यांनी पाकची शस्त्रे व क्षेपणास्त्रे ही भारताच्या सर्व शहरांना लक्ष्य करण्यासाठी सक्षम असल्याची दर्पोक्ती केली. या अणुचाचण्यांमुळे भारत–पाक संबंध अधिक बिघडत गेले. तेव्हा भारताने कोणत्याही राष्ट्राविरुध्द आपण प्रथम अण्वस्त्रांचा वापर करणार नसल्याचे जाहीर केले व पाकशी द्विपक्षीय चर्चा व वाटाघाटी करण्याचे जाहीर केले. पुढे जुलै, १९९८ साली कोलंबोमधील सार्क शिखर संमेलनात भारत व पाकच्या प्रमुखांची झालेली भेट ही निष्फळ राहिली. पाकिस्तानने काश्मीर प्रश्नाला आंतरराष्ट्रीय स्वरूप देण्याचा कुटील प्रयत्न चालूच ठेवला व भारतासोबत आण्विक युध्दाच्या वल्गना केल्या. याच काळातील सार्कच्या परिषदांमध्ये पाकने केलेले भारतविरोधी प्रयत्न भारताने निष्प्रभ केले. या सर्व वातावरणात भारत–पाक संबंध तणावाचे राहिले.

पुढील काळात दोन्ही देशांतील संबंध सुधारण्यासाठी बस वाहतूक सुरू करण्याचा नवा प्रयोग झाला. १९ फेब्रुवारी १९९९ साली पंतप्रधान श्री. वाजपेयी यांनी वाघा सिमारेषेवरून पाकिस्तानपर्यंत प्रवास करत नवाज शरीफ यांची भेट घेतली. या दरम्यान भारत–पाक दरम्यान परस्पर संबंध सुधारण्यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण केले. तसेच या भेटीत द्विपक्षीय देशात लाहोर घोषणा व परस्पर समन्वयाच्या करारावर सह्या करण्यात आल्या. या भेटीनंतर दोन्ही देशात १६ मार्च १९९९ साली बससेवेला प्रारंभ झाला. भारताच्या पुढाकाराने दोन्ही देशात काही सकारात्मक घटना घडत असताना मे १९९९ साली पाकिस्तान लष्कराच्या सहकार्याने घुसखोर व दहशतवाद्यांनी कारगील क्षेत्रात पर्वतीय क्षेत्रात अवैधरित्या प्रवेश करत लष्करी तळ उभे केले. भारतीय भू–प्रदेशावर अतिक्रमण करत पाकिस्तानने काश्मीर प्रश्नांवरून भारतावर दहशतवादाच्या माध्यमातून दबाव वाढवायला सुरुवात केली. या तणावजन्य व युध्दसदृश्य परिस्थितीत

पाकिस्तानने भारताच्या शांततावादी प्रयत्नांना खो घालत फसवणूक केली. याप्रसंगी भारत सरकारने भारतीय लष्कराला घुसखोरीचा शेवट करत कारगील प्रदेश मुक्त करून प्रत्यक्ष नियंत्रणरेषेवर शांतता निर्माण करण्याचे आदेश दिले. भारताने लष्करी कारवाई करत असताना पाकिस्तानला आपले घुसखोर मागे घेण्याचा सल्ला दिला परंतु पाकिस्तानने कारगीर घुसखोरांना ''स्वातंत्र्यसैनिक'' संबोधन आपल्या सहभागाचा नकार दर्शवला. कारगील घुसखोरीमागे तत्कालीन पाक लष्करप्रमुख जनरल परवेझ मुशर्रफ यांचे कुटिल कारस्थान होते. पाकिस्तान सरकारशी भारताने केलेल्या सर्व वाटाघाटी याप्रसंगी अपयशी ठरत होत्या. भारताय लष्कराने कारगीलमधील घुसखोरांना चोख प्रत्युत्तर देत त्यांना यमसदनी पाठवण्याची कारवाई चालूच ठेवली. भारतीय लष्कराच्या अतुलनीय शौर्याला जसे यश मिळत गेले, त्याप्रमाणे ९ जुलै १९९९ साली अमेरिकेने पाकवर निर्माण केलेल्या दबावातून तेथील सरकारने घुसखोरांना माघारी बोलवत ११ जुलै, १९९९ रोजी दोन्ही देशांच्या लष्करी अधिकारी बैठकीत सैन्य कारवाई थांबवत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे ठरले. पाकिस्तानने भारतावर लादलेल्या या युध्दात पाकचा थेट व दारुण पराभव झालेला होता. भारतीय लष्कराला खडतर परिस्थितीत यश मिळाले.

कारगीलमधील पराभवानंतर पाकमधील अंतर्गत राजकीय परिस्थितीत लष्कर व शासनामध्ये संघर्ष होत अस्थिरता निर्माण झाली. पाकमधील लष्कराचा वाढता प्रभाव दोन्ही देशांतील संबंधाना घातक होता. यानंतरही पाककडून डिसेंबर १९९९ साली भारतीय विमानांचे अपहरण व दहशतवाद्यांची सुटका या कृत्याने सन २००१ पर्यंत दोन्ही देशांतील संबंध प्रतिकूल बनले. भारतानेही चर्चा आणि दहशतवाद या दोन्ही प्रक्रिया एकत्र नाकारत पाकबरोबर चर्चेला नकार दिला.

या सर्व पार्श्वभूमीवर पुन्हा पंतप्रधान वाजपेयी यांनी द्विपक्षीय संबंध सुरळीत होण्यासाठी १५ जुलै २००१ रोजी आग्रा येथे शिखर परिषद आयोजित केली. या परिषदेला पाकचे जनरल परवेज मुशर्रफ उपस्थित राहिले. शांतता व सहकार्य वृध्दिंगत करण्यासाठी आयोजिलेल्या या परिषदेत मुशर्रफ यांनी काश्मीर प्रश्नांवरून कडवट प्रतिक्रिया दिल्या. यामुळे परिषद तणावपूर्ण झाली. या परिषदेनंतरही भारत-पाक संबंधात चढ-उतार होतच राहिले. पाकिस्तानचा भारतविरोध व द्वेष कायम राहिला. १३ डिसेंबर २००१ साली भारतीय संसदेवर दहशतवादी हल्ला झाला. हा हल्ला पाकस्थित दहशतवादी गटाने घडवून आणला होता. यानंतर बोलणी प्रक्रिया पूर्णपणे थंडावली. भारतानेही याचा निषेध नोंदवत पाकबरोबरचे व्यवहार थांबवले. यानंतरच्या काळातही पाकने आपल्या भासविरोधी कारवाया चालूच ठेवल्या. भारताच्या चर्चा प्रक्रियेला ढोंगीपणे प्रतिसाद देत

दुटप्पीपणा स्वीकारला.

४. **२००८ नंतर भारत-पाक संबंध :** २६ नोव्हेंबर २००८ साली पाकस्थित दहशतवादी गटाने मुंबईवर सागरी मार्गाने भीषण दहशतवादी हल्ला घडवून आणला. तसेच काश्मिरमध्ये घुसखोरीबरोबर शस्त्रसंधीच्या उल्लंघनाचे प्रकार चालूच ठेवले आहेत. २००४ साली पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या सरकारनेही पाकबरोबर संबंध सुधारत पाकच्या दहशतवादी कृत्यांनाही रोखण्याचे सर्वतोपरी प्रयत्न झाले. मे, २०१४ नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला सहकार्याबरोबर प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर आपल्या लष्कराला पाकपुरस्कृत दहशतवादाचा बिमोड करण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्यही दिले. २०१६ मध्ये पठाणकोट हल्ल्यामुळे भारत-पाक संबंधात चर्चा पुन्हा थांबली. दहशतवादाचा पाकचा पाठिंबा देणे चालूच राहिले आहे. यामुळे पाकिस्तानशी शांतता चर्चा करणे काहीच उपयोग नाही. २०१७ साली युनोमध्ये परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांनी पाकिस्तानचे नाव घेवून दहशतवाद थांबवण्याचे आव्हान केले व भारताची भूमिका स्पष्ट केली.

अशाप्रकारे शीतयुध्दोत्तर काळानंतर भारत-पाक संबंधात सकारात्मक व नकारात्मक घटना-घडामोडी घडत असतानाही भारतातर्फे शांतता प्रक्रिया व वाटाघाटी चालूच राहिली. अनेक प्रसंगात तणाव-युध्दजन्य स्थिती असतानाही भारताकडून संयमाने व परस्पर सार्वभौमत्वाचा आदर राखत पाकबरोबर संबंध सामान्य पातळीवर ठेवण्याचे प्रयत्न झाले. परंतु आजतागायत पाकचा भारतद्वेष व विरोध चालूच असून भारताचा अपेक्षाभंग होत राहिला आहे.

## ❒ भारत आणि बांगलादेश (शीतयुध्दोत्तर काळातील संबंध)

२०व्या शतकाच्या अंतिम दशकात दोन्ही देशांच्या संबंधात सकारात्मक परिवर्तन निर्माण झाले. १९७१ साली स्वतंत्र व बांगलादेशच्या निर्मितीनंतर हा देश बऱ्याच प्रमाणात भारतीय मदतीवर अवलंबून होता. तत्कालीन राष्ट्रपती इर्शाद यांच्या राजीनाम्यानंतर बांगलादेशमध्ये खऱ्या अर्थाने लोकशाहीची स्थापना झाली. फेब्रुवारी १९९१ साली तेथे शांततामय वातावरणात सार्वत्रिक निवडणूका पार पडल्या. यामध्ये माजी राष्ट्रपती जिया-उर-रहमान यांची पत्नी, राष्ट्रीय पक्षाच्या नेत्या बैगम खलिदा जिया यांनी सत्ता संपादन घेतली. त्यानंतर सप्टेंबर १९९२ साली देशातील सार्वमतानंतर नव्याने संसदीय शासनाची स्थापना झाली व बेगम खालिदा देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनल्या. याचवेळी इकडे भारतातही पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेस पक्षाचे सरकार सत्तेत आले. या दोन्ही देशांच्या प्रमुखांनी द्विपक्षीय संबंध सुधारण्यास सुरुवात केली. १९९१ ते ९६ या काळात दोन्ही देशांतील संबंध प्रगतीपथावर होते. जून १९९६ मध्ये बांगलादेश मध्ये स्व.शेख मुजिबर्र रहमान यांच्या कन्या शेख हसीना यांनी अवामी लीग या पक्षाच्या माध्यमातून सत्ता

हस्तगत केली. याच दरम्यान भारतातील केंद्रातील सत्ताबदल झाला. १९९६-९८ या काळातही द्विपक्षीय संबंध चांगल्या प्रमाणात सुधारले. यानंतरच्या काळातही दोन्ही देशांतील संबंध बऱ्याच प्रमाणात सुधारले.

## १. १९९१ ते १९९६ या काळातील भारत-बांगलादेश संबंध :-

या काळात भारत सरकारने पुढाकार घेत द्विपक्षीय संबंध सुधारण्याच्या दिशेने कार्य सुरू केले. तत्कालीन परराष्ट्रमंत्री माधवसिंह सोलंकी यांनी संसदेत भारत-बांगलादेश मधील वादग्रस्त बनलेल्या ''तीन बिघा'' भूप्रदेशाबाबत तोडगा काढण्याचे सुतोवाच केले. तत्कालीन पंतप्रधान बेगम जिया यांच्या सरकारनेही भारताच्या पुढाकाराला सकारात्मक प्रतिसाद दिला. ऑगस्ट १९९१ साली बांगलादेशचे परराष्ट्र मंत्री एम. रहमान भारत दौऱ्यावर आले असताना भारतीय नेतृत्वाबरोबर त्यांनी विविध आर्थिक व राजकीय विषयावर चर्चा केली.

मे १९९२ साली बांगलादेशच्या तत्कालीन पंतप्रधान बेगम खलिदा झिया यांनी केलेल्या भारत दौऱ्यात निर्वासित बांगलादेशींना भारतातील आश्रयाबद्दल चर्चा केली. या भारत दौऱ्यात भारतीय पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव यांनी विश्वास व परस्पर वातावरण निर्माण केले. दोन्ही देशाच्या नेतृत्वात झालेल्या बोलणीनंतर द्विपक्षीय संबंधात आशादायी वातावरण निर्माण झाले.

### अ) गंगा नदी पाणी वाटप :-

बांगलादेशच्या पंतप्रधान बेगम खलिदा झिया यांच्या दौऱ्यात गंगा नदीच्या पाणी वाटपासंदर्भात दोन्ही देशांचे व्यावहारिक हित लक्षात घेवून करार करण्यात आला. ब्रम्हपुत्रा व तिस्ता या नद्यांच्या पाणीवाटपात समाधानकारक चर्चा झाली.

### ब) चकमा निर्वासित :-

बांगलादेशमधील 'चकमा' जमातीचे निर्वासित भारतातील त्रिपुरा राज्यात शरणार्थी म्हणून आश्रयास होते. दोन्ही देशांच्या नेतृत्वाने चकमा निर्वासितांना परत मायभूमीत रवाना करण्यासाठी एका संयुक्त कार्य गटाची स्थापना करण्याचे ठरवले. या शरणार्थींचे पूर्ण सुरक्षितरित्या चितगावला पाठवणी करण्याचे ठरले.

### क) बांगलादेशी नागरिकांचे बेकायदेशीर स्थलांतर :-

प्रचंड दारिद्र्य व बेरोजगारीमुळे बांगलादेशमधून भारतात होणाऱ्या बेकायदेशीर स्थलांतराबाबत उपाययोजना करण्याचे या दौऱ्यात ठरले. पंतप्रधान बेगम खलिदा झिया यांनीही भारतातील स्थलांतर मान्य करत भविष्यात हे स्थलांतर रोखण्यासाठी भारताला सहकार्य करण्याचे वचन दिले.

### ड) कर प्रस्ताव :–

१ एप्रिल १९९३ पासून नवीन आर्थिक वर्षात दोन्ही देशांतील दुहेरी कर आकारणी थांबवण्यासाठी करार झाला. निर्यात व भांडवल–गुंतवणूक वाढवण्यासाठी हा करार उपयुक्त होता.

### इ) द्विपक्षीय सहकार्य :–

या भारत दौऱ्यात दोन्ही देशांमध्ये व्यापार, संस्कृती, शिक्षण, संरक्षण व माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रांत सहकार्य वाढवण्यासाठी विचार–विमर्श झाला. १९९३ च्या सार्क संमेलनाचे यजमानपद बांगलादेशकडे असल्याने या निमित्ताने प्रादेशिक सहकार्य मजबूत करण्याचे ठरले.

### ई) तीन बिघा जमीन :–

बेगम खलिदा झिया यांच्या या भारतभेटीत भारताने तीन बिघा हा भूप्रदेश बांगलादेशला भाड्याने उपलब्ध करून दिला. २६ जून १९९२ साली याची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली.

वरील प्रमाणे बांगलादेशच्या तत्कालीन पंतप्रधानाची भारत भेट यशस्वी ठरली. शीतयुद्धोत्तर काळात नवीन निर्माण होत असलेल्या जागतिक व्यवस्थेत भारत आणि बांगलादेशचे परस्पर सहकार्य महत्त्वाचे ठरतात. कारण १९७५ नंतर बांगलादेशमध्ये धार्मिक कट्टरतावादातून भारतविरोधी वातावरण तयार झाले होते. बांगलादेशच्या नेतृत्वाने सार्क व द्विपक्षीय आर्थिक व व्यापारी हितसंबंधातून भारताचे महत्त्व ओळखले होते. मैत्री व सहकार्य वृध्दींगत होत गेले. बांगलादेशची अंतर्गत परिस्थिती कमालीची अस्थिर व अशांत असल्याने द्विपक्षीय संबंधात अडथळे निर्माण होत गेले. जुलै, १९९३ साली भारत सरकारने बांगलादेशला "Most Favoured Nation-MFN" (अत्याधिक उपकृत राष्ट्र) हा दर्जा दिला. भारताने हे सकारात्मक पाऊल टाकल्यानंतर दोन्ही देशातील आर्थिक व व्यापारी संबंध विस्तारले जाणार होते. यानंतर १९९६ साली दोन्ही देशांनी फरक्का नदीचे पाणी वाटप विवाद शांततामय व परस्पर मैत्रीच्या आधारावर सोडवला. यातून दोन्ही देशातून आर्थिक प्रक्रिया गतिमान बनली.

## २. भारत आणि बांगलादेश संबंध (१९९६–१९९८)

१९९६ साली बांगलादेशमध्ये अवामी लीग या पक्षाचे सरकार बनले व शेख हसीना वाजेद पंतप्रधान बनल्यानंतर दोन्ही देशातील संबंध १९७५ पेक्षा अधिक चांगले मित्रत्व व सहकार्याचे वातावरण तयार झाले. याच काळात जून १९९६ साली भारतातील संयुक्त आघाडीचे सरकार सत्तेत आल्यानंतर श्री. आय. के. गुजराल परराष्ट्र मंत्री बनले. त्यांनी मांडलेल्या ''गुजराल सिध्दांतानुसार शेजारी देशांशी भारत संबंध सुधारण्यासाठी विशेष रूपाने प्रयत्नशील राहणार असल्याचे निश्चित झाले. या परिवर्तनानंतर दोन्ही देशांच्या संबंधात आशादायी वातावरण निर्माण झाले.

सप्टेंबर १९९६ साली परराष्ट्रमंत्री श्री. गुजराल यांनी बांगलादेशचा दौरा केला. या दौऱ्यात

दोन्ही देशांनी गंगा नदी पाणी वाटप विवादावर तोडगा काढण्याचे ठरवले. याच चर्चा व बोलणीतून पुढे दोन्ही देशांत १२ डिसेंबर १९९६ साली गंगा नदीच्या फरक्का या स्थानाजवळ परस्पर भागीदारीचा ऐतिहासिक करार झाला व परस्परांना स्वीकारार्य असा पाणीवाटपाचा योग्य तोडगा निघाला. या करारानंतर जानेवारी १९७७ साली पंतप्रधान श्री. देवेगौडा व परराष्ट्रमंत्री श्री. गुजराल यांनी बांगलादेशला दिलेल्या भेटीत द्विपक्षीय लाभदायी बोलणी केली. या भेटीदरम्यान दोन्ही देशांनी आर्थिक व व्यापारी सहकार्य गतिमान करण्याबरोबर ईशान्य भारतातील फुटीरतावादी दहशतवादी गटांना रोखण्यासाठी परस्पर सहकार्यातून कारवाई करण्याचे ठरले. ''चकमा'' जमातींच्या निर्वासितांसाठी उपाययोजना सुरू झाली. याच कालावधीत भारत आणि बांगलादेश ने भूटान व नेपाळ सोबत उपक्षेत्रीय आर्थिक व्यापारी सहकार्याची व्यवस्था स्वीकारली.

मार्च १९९७ साली भारत आणि बांगला देशादरम्यान संयुक्त आर्थिक आयोगाची तीन दिवसीय बैठक पार पडली. या बैठकीत दोन्ही देशांनी नवीन संपर्क व्यवस्था स्थापन्याबरोबर दीर्घकालीन मजबूत संबंध स्थापित होण्यासाठी आवश्यक अशा संस्थात्मक कार्यव्यवस्था तयार करण्याचे ठरले. १९ मार्च १९९७ साली दोन्ही देशांत मित्रत्व, शांतता व सहकार्याचा जुना करार समाप्त झाला. परंतु दोन्ही बाजूने या कराराची मुदत वाढ करण्यासाठी हालचाल झाली नाही.

एप्रिल १९९७ नंतर तत्कालीन पंतप्रधान आय.के.गुजराल यांनीदेखील बांगलादेशबरोबरच्या संबंधात सकारात्मक दिशा व गती ठेवण्याचे धोरण स्वीकारले. श्री. गुजराल यांच्या काळात नदीपाणी (गंगा, तिस्ता) वाटप विवादासंदर्भात चर्चा व वाटाघाटी घडून आल्या. जुलै १९९७ साली संयुक्त नदी आयोगाची स्थापना झाली. १५ जानेवारी १९९८ साली भारत-पाक-बांगलादेश या तीन देशांदरम्यान पंतप्रधानाची शिखर बैठक ढाकामध्ये झाली. ज्यामध्ये परस्परांत आर्थिक व व्यापारी सहकार्य वृद्धिंगत करण्याचीच चर्चा झाली.

१९९७-९८ दरम्यान दोनही देशांच्या संबंधात सातत्याने सुधारणा झाली.

## ३. १९९८ पासूनचे भारत-बांगलादेश संबंध :-

मार्च १९९८ मध्ये भारतातील सार्वत्रिक निवडणूकानंतर पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्त्वाखाली भाजपाचे व सहकारी पक्षांचे 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी'चे सरकार स्थापन झाले. या सरकारनेही बांगलादेशला परराष्ट्र धोरणात प्राधान्य दिले. एप्रिल १९९८ साली बांगलादेशच्या परराष्ट्र मंत्र्यानी भारत दौरा करत भारतीय नेतृत्वाबरोबर उच्चस्तरीय चर्चा केली. दोन्ही देशांनी या दरम्यान दहशतवाद समाजी द्विपक्षीय व्यापार, नदी पाणी वाटपाबाबत एकत्रित कार्य करण्याचे ठरवले. मे. १९९८ साली भारताने परमाणू परीक्षण करून स्वत:च्या अण्वस्त्रधारी देश होण्याची घोषणा केल्यानंतर बांगलादेशने भारताप्रती संयमाचे धोरण दाखवले. जून १९९८ साली बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी भारताला भेट देत पंतप्रधान श्री. वाजपेयी यांच्याशी केलेल्या बोलणीनंतर आर्थिक व

व्यापारी सहकार्य वाढवण्याचे ठरले. या भेटीत श्री. वाजपेयी यांनी बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांना भारताच्या परमाणू परीक्षणामागची कारणे सांगितली. पंतप्रधान शेख हसीना यांनी भारताच्या अणुचाचणीचा अधिकार हा अंतर्गत सार्वभौमत्वाचा भाग असल्याचे मान्य करत NPT आणि CTBT हे दोन्ही करार भेदभावपूर्ण असल्याचे प्रतिपादित केले.

१९ ऑगस्ट १९९८ साली दोन्ही देशांच्या झालेल्या संयुक्त कार्य गटाच्या नवी दिल्ली येथील बैठकीत संरक्षण, दहशतवाद, पाक गुप्तहेर संघटना ISI च्या कारस्थानाबाबत, घुसखोरी, सीमा निश्चिती, ईशान्य भारतातील फुटीरतावादी कारवाया या विषयांवर बोलणी झाली. १९९९ पर्यंत सीमारेषेची निश्चिती करण्याचे ठरले. डिसेंबर १९९८ साली भारताने बांगलादेश बरोबरची सीमा रेषा तारांनी बंदिस्त करण्याचा निर्णय घेतला. अवैध घुसखोरी रोखण्यासाठी हा निर्णय होता. एप्रिल १९९९ साली दिल्लीमध्ये दोन्ही देशातील नदी आयोगाची ३३वी बैठक पार पडली होती.

## ४. भारत–बांगलादेश बस कूटनीती :–

भारत आणि बांगलादेशने रस्ते मार्गाने परिवहन व्यवस्था होण्यासाठी ९ एप्रिल १९९९ साली पहिली बस कलकत्ता ते ढाका दरम्यान सुरू केली. १९ जून १९९९ साली या बससेवेचे अधिकृत उद्घाटन करत पंतप्रधान श्री. वाजपेयी बांगलादेशला भेट दिली. या भेटीत दोन्ही देशांत मैत्री व सहकार्याच्या अंगाने चर्चा झाली. या भेटीत भारताने बांगलादेशला २०० कोटी रुपयांचे कर्ज देण्याचे व दोन्ही देशादरम्यान चेंबर ऑफ कॉमर्स स्थापन करण्याची घोषणा झाली. बससेवा प्रारंभ झाल्यामुळे दोन्ही देशातील जनतेत विश्वासाचे वातावरण तयार झाले. या नव्या वातावरणात द्विपक्षीय व्यापार प्रक्रिया गतिमान बनली.

## ५. २१व्या शतकातील भारत–बांगलादेश संबंध :–

२१व्या शतकाच्या प्रारंभी दोन्ही देशांतील संबंध अधिक विकसित करण्यासाठी काही महत्त्वपूर्ण पाऊले उचलली गेली. जानेवारी २००० साली भारतीय परराष्ट्र मंत्र्यानी ढाका यात्रा करत संबंध सुधारण्यावर भर दिला. दोन्ही देशांत त्रिपुरा (आगरतळा ते ढाका दरम्यान) बस सेवा सुरु करण्याचे ठरले. या रस्ते परिवहन व्यवस्थेतून म्यानमार, भूटान, नेपाळ व बांगलादेश या भौगोलिक समीपता असणाऱ्या देशांत संपर्क व्यवस्था जोडायची होती. यानंतर पुढे जानेवारी २००० साली दोन्ही देशांनी परस्पर भूप्रदेशांचे आदान–प्रदान करण्याचा निर्णय घेतला. सीमा निश्चितीबाबत चर्चा झाली. फेब्रुवारी २००० साली भारताने बांगलादेशला दळण–वळण सुविधांच्या विकासासाठी ४०० कोटींचे कर्ज देण्याचे मान्य केले. यानंतर एप्रिल २००० साली सीमा क्षेत्रातील शांतता व सुरक्षेबाबत वरिष्ठ लष्करी अधिकारी व गृह सचिवादरम्यान चर्चा झाली. बांगलोदशच्या भूमीचा वापर भारतविरोधी दहशतवादी कारवायांसाठी होणार नाही, तसेच दोन्ही देशांच्या सुरक्षा दलांत सीमेवरील गुन्हेगारी रोखण्यासाठी

नियमित बैठका घेण्याचे ठरवण्यात आले. पुढे भारताने अंतर्गत सुरक्षेसाठी जून २००० साली अवैध बांगलादेशी नागरिकांची ओळख निश्चित करण्यास प्रारंभ केला.

जुलै २००० साली दोन्ही देशात रेल्वेद्वारे माल वाहतूक करण्याचे ठरले. रस्ते वाहतुकीवरील ताण कमी करत द्विपक्षीय व्यापार वाढवण्यासाठी जानेवारी २००१ मध्ये प्रत्यक्षात रेल्वे व्यापार सुरू झाला. फेब्रुवारी २००१ मध्ये नवी दिल्ली येथील बैठकीत दोन्ही देशांत व्हिसा सुविधेबाबत चर्चा झाली. दोन्ही देशांतील नागरिकांना पासपोर्ट मिळण्याबाबत नवीन नियमावली करण्यात आली.

मार्च २००१ साली त्रिपुरा या राज्यालगतची बांगलादेश सीमा बंदिस्त करणयाबाबत भारताने बनवली. अवैध घुसखोरी रोखणे व दहशतवादी हालचालींना आळा घालणे हा यामागे उद्देश होता. परंतु भारताच्या या निर्णयावर बांगलादेशने नापसंती व्यक्त केली होती.

बांगलादेशमधील सत्तांतरानंतर तेथील हिंदू धर्मीयांच्या विरोधात अत्याचाराच्या घटना सुरू झाल्या व नवीन सरकार चीन व पाकिस्तानसोबत मैत्रीला प्राधान्य देणार असल्याच्या बातम्या येवू लागल्या होत्या. या पार्श्वभूमीवर भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार श्री. ब्रजेश मिश्रा यांनी बांगलादेशला भेट दिली. या दौऱ्यात श्री. मिश्रा यांनी बांगलादेशमधील हिंदू धर्मियांच्या हत्येबाबत चिंता व्यक्त करत भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या हिताबाबत बोलणी केली. बांगलादेशी नागरिकांनी हिंदू धर्मीयांच्या बाबतीत भेदभाव न करण्याचे आव्हान केले. जानेवारी २००२ साली काठमांडू येथे झालेल्या सार्क शिखर संमेलनात दोन्ही देशाच्या नेत्यांनी परस्परांत आर्थिक व व्यापारी सहकार्य वाढवण्यासंदर्भात धोरणाचा पुनरुच्चार करण्यात आला.

फेब्रुवारी–मार्च २००२ मध्ये भारतातील गुजरात या राज्यात झालेल्या धार्मिक दंगलीनंतर बांगलादेशमध्ये भारतविरोधी प्रतिक्रिया उमटवू लागल्या. बांगलादेशने या काळात चीनसोबत संबंध सुधारण्याबरोबर भारतावर दबाव टाकण्याचे धोरण अवलंबले. या बांगलादेशी धोरणांमुळे दोन्ही देशांतील विश्वासाचे वातावरण थोडे गढूळ झाले.

## ६. २००३ नंतर भारत–बांगलादेश संबंध :–

२००३ नंतर भारत–बांगलादेश संबंधातील तणावाचे धोरण निवाळण्याचा प्रयत्न झाला. २०११ मध्ये दोन्ही देशातील जुना सीमा विवाद समाप्त करण्याचा करार झाला व २०१५ ला त्याची अंमलबजावणी झाली. २०१५ ला नरेंद्र मोदीनी बांगला देश दौराच्या वेळी २२ करारावर सह्या केल्या. ज्यात ऊर्जा क्षेत्र महत्त्वपूर्ण होते. २०१७ ला शेख हसीना व नरेंद्र मोदी यांच्यात संयुक्त सैन्य अभ्यास व प्रशिक्षण करार केला. संरक्षण खरेदीला ५०० दशलक्ष डॉलर देण्यात आले. तसेच भारत–बांगलादेशी विद्यार्थीना शिक्षणासाठी स्कॉलरशीप देण्याचे ठरवले. २०१८ मध्ये भारत व बांगला देशमध्ये १० अब्ज डॉलर्स व्यापाराची शक्यता आहे. याप्रकारे भारत–बांगलादेश यांच्यातील संबंध सध्या सुधारत आहेत.

## ३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

- **शीत युध्द :** दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक वर्चस्वासाठी दोन देशामधील सत्तास्पर्धानी निर्माण केलेल्या प्रभाव क्षेत्राला शीतयुध्द म्हणतात.
- **LTTE :** Liberation Tigers of Tamil Elam.
- **शांतीसेना :** भारताकडून श्रीलंकेतील अंतर्गत हिंसाचार दूर करण्यासाठी पाठवलेल्या सेनेला 'शांतीसेना' म्हणतात.

## ३.४ स्वयं:अध्ययन प्रश्न व उत्तरे

### ❒ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ची उत्तरे

१. १९७१.

२. कुडणकुलम.

३. पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव.

४. १९९६.

५. सुखोई ३० एम.के.-१

### ❒ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

१. बरोबर.

२. बरोबर.

३. चूक.

४. बरोबर.

५. चूक.

## ३.५ सारांश

शीतयुध्दोत्तर काळ हा भारतीय परराष्ट्र धोरणाच्या बदलत्या विविध देशांशी संबंधाची पूर्नमांडणीचा कालावधी होता. भारतीय परराष्ट्र धोरण शीतयुध्दात काही प्रमाणात रशियाकडे झुकलेले असले तरी अलिप्ततावादी चळवळीच्या माध्यमातून स्वतंत्र अस्तित्त्वाची लढाई भारताने चालू ठेवली. शीतयुध्दोत्तर जागतिक राजकारणात जे बदल झाले, त्याचा परिणाम भारतीय परराष्ट्र धोरणावरही पडला व रशियाचा नाहीतर अमेरिका व शेजारील राष्ट्रांशी स्व:हित व जागतिक शांततेच्यादृष्टीने

परराष्ट्र धोरणाची मांडणी केली आहे.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

❐ **दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. भारत-अमेरिका शितयुध्दोत्तर संबंध स्पष्ट करा?

२. शितयुद्धोत्तर काळातील भारत-पाकिस्तान संबंध स्पष्ट करा?

❐ **टीपा लिहा.**

१. युरोपीय युनियन.

२. शांतीसेना.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१. **प्रा. जे. एन. दिक्षित :** *''भारतीय विदेश नीती''*, प्रकाशक-प्रभात प्रकाशन, दिल्ली.

२. **प्रा. पवन कुमार :** *''भारत की विदेश नीती''*, आयेगा पब्लिकेशन.

३. **डॉ. बी. डी. तोडकर** : *'भारत आणि जग'* डायमंड पब्लीकेशन, पुणे.

❐❐❐

**घटक–४**

# भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसमोरील सद्यकालीन आव्हाने
# (India's Contemporary Security Challenges)

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

 ४.२.१ भारताची संरक्षण सज्जता : ऊर्जा सुरक्षा आणि सागरी सुरक्षा

 ४.२.२ अण्वस्त्र प्रसार

 ४.२.३ दहशतवाद

४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.४ स्वयं:अध्ययन प्रश्न व उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## ४.० उद्दिष्ट्ये

'भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसमोरील सद्यकालीन आव्हाने' या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर आपणांस पुढील विषयांचे नीट आकलन होईल.

- भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेची सज्जता कशी आहे व आपल्या सुरक्षा यंत्रणासमोर कोणती आव्हाने आहेत.
- राष्ट्रीय सुरक्षेसमोरील उर्जा क्षेत्र व सागरी क्षेत्रांसमोर कोणती संकटे असून त्यांची सद्य:स्थिती काय आहे.
- देशांतर्गत व बाह्य घटकांकडून राष्ट्रीय सुरक्षेची सज्जता कशी बनली आहे.

* भारतातील अण्वस्त्रे अणुऊर्जा, अणुइंधन व आंतरराष्ट्रीय पातळीवरील नियम-अटींचे करार यांची स्थिती काय आहे.
* जगातील सर्वात भीषण संकट असणाऱ्या दहशतवादाचे भारतासमोरील धोके कोणते आहे. दहशतवादाला भारत कसे हाताळत आहे.

सदर प्रकरणाच्या अध्ययनानंतर आपल्याला भारताची संरक्षण सज्जता समजून येईल.

## ४.१ प्रास्ताविक

आज जगभरात प्रत्येक राष्ट्रांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्या राष्ट्राची सर्वंकष व अभेद्य सुरक्षा व्यवस्था ही अत्यंत निकडीची बाब आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर आपण ज्यांना प्रगत, विकसित व समृध्द देश मानतो, त्या राष्ट्रांची संरक्षण सज्जता ही परिपूर्ण व सुसज्ज आहे. त्यामुळे त्या राष्ट्रांची विकासप्रक्रिया निर्धोकपणे चालू शकते. भारतासारख्या खंडप्राय व विशाल भू-प्रदेश असणाऱ्या देशासमोर सुरक्षेचे अनेक धोके उद्भवत आहेत. आज आपल्या देशाच्या केंद्रीय अर्थसंकल्पातील सर्वाधिक खर्च हा देशाच्या संरक्षणव्यवस्थेवर होतो. स्वातंत्र्यप्राप्तीपासून ते आजतागायत भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेवर अनेक आघात झालेले आहेत. आपला देश विकसनशील असल्याने आपण देशाचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, वैज्ञानिक व औद्योगिक विकास साध्य करत असताना संरक्षण व्यवस्थेच्या मजबूतीसाठी लागणाऱ्या आर्थिक तरतूदींची निकड आपल्याला भासते.

स्वातंत्र्यप्राप्तीपासून भारताचे परराष्ट्र धोरण हे शांततावादी आणि परस्पर सहकार्याचे आहे. भारताने कधीही कोणत्या राष्ट्रावर आक्रमण केले नाही. भारताने शेजारी राष्ट्रांच्या सार्वभौमत्त्वाचा नेहमीच आदर करत मैत्रीपूर्ण संबंध जोपासले आहेत. भारताचा अणुऊर्जेचा कार्यक्रम ही उर्जानिर्मितीसाठी आहे. भारत आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन नेहमीच करतो. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेपासून भारताने आपले सक्रिय योगदान दिले आहे. आजही जगात भारतातील लोकशाही व्यवस्थेचे कुतूहल आहे. आपला देश बहुविविधतेने नटलेला आहे. ही विविधता आपली शक्ती आहे. परंतु आपली शेजारी राष्ट्रे ज्यांना भारताची महासत्ता देश म्हणून होत असणारी भविष्यातील वाटचाल रोखायची आहे. आपले पारंपारिक शत्रु राष्ट्र पाकिस्तान भारतासमोर सर्व प्रकारचे अडथळे आणण्यात व्यस्त असतो. चीन व पाकिस्तानची सामरिक भागीदारी काश्मीर प्रश्न पाकपुरस्कृत दहशतवाद, 'नक्षलवाद' ही आव्हाने आपल्या सुरक्षा व्यवस्थेसमोर आहेत.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ भारताची संरक्षण सज्जता

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने आर्थिक, औद्योगिक विकासाबरोबर संरक्षण सज्जतेसाठी विविध

पातळीवर प्रयत्न केले. भारताची संरक्षण सज्जता ही स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या ७० वर्षाच्या काळात उत्तरोत्तर भक्कम व समग्र बनत गेली. पाकिस्तान व चीनसारखं कुरापतखोर शेजारी लाभल्याने भारताने आपली संरक्षण सज्जता बहुआयामी बनवली आहे. आज भारताला देशांतर्गत व सीमापार अशा दोन्हीं पातळीवर सुरक्षा उपाययोजना करावी लागत असल्याने आपण केंद्रीय अर्थसंकल्पातील सर्वाधिक आर्थिक तरतूद संरक्षण क्षेत्रासाठी करत आहोत.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या सुरुवातीच्या काळात पं. नेहरू यांच्या राजवटीत कृषी व औद्योगिक विकासाला तसेच विज्ञान-तंत्रज्ञान, ग्रामविकास, वाहतूक, शिक्षण आणि ऊर्जा निर्मिती क्षेत्रांना नियोजनाच्या माध्यमातून वेगाने सुरुवात केली गेली. १९६२ सालच्या भारत-चीन युध्दानंतर भारतामध्ये इतर क्षेत्रांबरोबर संरक्षण क्षेत्राच्या सक्षमतेबाबत वेगवान उपाययोजना सुरू झाल्या. १९६५ साली भारताने पाकिस्तानचा थेट युद्धभूमीवर पराभव केला. १९७१ सालच्या बांगलादेश मुक्ती संग्रामात भारतीय लष्कराने पाकिस्तानला चारीमुंड्या चीत करत पाकिस्तानी लष्कराला शरणागती स्वीकारायला भाग पाडले. यानंतर पाकिस्तानने निरनिराळ्या मार्गाने भारतासमोर धोके निर्माण केला. उदा. दहशतवादी हल्ले, घुसखोरी, १९९९ सालच्या कारगिल युध्दातही भारताने अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीत विजय संपादन केला. भारताच्या संरक्षण क्षेत्रातील परिपूर्ण विकासामध्ये काही प्रमाणात मर्यादा असल्यातरी भारताने त्या दिशेने टप्प्याटप्प्याने वाटचाल सुरू केली. आज भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा दलामध्ये पुढील यंत्रणा कार्यरत आहेत.

(१) भारतीय भूदल (२) भारतीय नौदल (३) भारतीय हवाईदल (४) निमलष्करी दल (५) पोलीस यंत्रणा (६) गुप्तचर यंत्रणा.

जगामध्ये आकार व बळाच्या दृष्टीने भारताची लष्करी व्यवस्था चौथ्या क्रमांकाची आहे.

## ❐ ऊर्जा सुरक्षा :-

भारताच्या महासत्तेच्या दृष्टिने 'ऊजा सुरक्षा' हा अत्यंत महत्त्वाचे धोरण झाले आहे. भारताने अन्नाबाबत स्वयंपूर्ण झाला असून अजून ऊर्जाबाबत स्वयंपूर्णता नाही. भारताच्या विकसित होत असलेल्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी ऊर्जाची गरज आहे. आज जागतिक अर्थव्यवस्थेत ऊर्जा मिळवण्यासाठी संघर्ष चालू आहे. ऊर्जा जर एखाद्या देशाला आवश्यक प्रमाणात प्राप्त होत नसेल तर तो देश प्रगतीपथावर जावू शकत नाही. त्यामुळे ऊर्जासाठी सतत संघर्ष चालू असतो. भारताला आज केवळ ऊर्जेची गरज पूर्ण करण्याच्या प्रयत्नांमुळेच नव्हे तर स्वस्त खर्चात ऊर्जा निर्माण करण्यासाठी व गुणवत्तापूर्ण ऊर्जा निर्माण करण्याचे आव्हान आहे व हे आव्हान 'ऊर्जा सुरक्षा' दृष्टीने पूर्ण करण्याचा प्रयत्न भारत करत आहे.

भारत जगातील उदयोमुख अर्थव्यवस्था आहे व हे स्थान सुरक्षीत ठेवण्याच्या उद्देशासाठी

सतत आर्थिक विकासासाठी ऊर्जाची आवश्यकता आहे. यासाठी ऊर्जाची सुरक्षितता महत्त्वाची आहे. ऊर्जा सुरक्षा म्हणजे १) सर्व नागरिकांना ऊर्जा प्रदान करणे होय. जर ते शक्य होत नसेल तर देशासाठी एक टिकाऊ स्थिती नाही. २) ऊर्जा सुरक्षताची आवश्यकतेतून देशाच्या जीवनरेखाचा ऊर्जा गरजा पूर्ण झाली पाहिजे. यामुळे ऊर्जा ही एक व्यक्तीची मूलभूत गरज आहे. ३) समाजातील संपूर्ण स्तरावर पैसे देण्याच्या क्षमतेच्या नुसार ऊर्जाची मागणी पूर्ण करावी.

अशा पद्धतीत ऊर्जा सुरक्षा महत्त्वाची आहे. या ऊर्जा सुरक्षतेतून अर्थव्यवस्थेला चालना मिळते.

**ऊर्जा प्रकार :**

ऊर्जाचे पारंपरिक व अपारंपरिक स्त्रोत आहे. यातील पारंपारिक स्त्रोतामध्ये कोळसा, पेट्रोलियम, नैसर्गिक वायू इ. समावेश होतो. तर अपारंपारिक स्त्रोतामध्ये सौर, वारा, भूतापीय व बायोगॅस ऊर्जाचा समावेश होतो.

ऊर्जाच्या इतर स्त्रोतामधये कॉइल, तेल, गॅस, जलविद्युत, आण्वीक इ. व्यवसायिक हेतूने निर्माण होणारी ऊर्जा स्त्रोत आहे. तर लाकूड, चारकोल, शेण हे बिगर व्यापारी स्त्रोत आहे. देशामध्ये एकूण ऊर्जाचा वापर जीवाश्म इंधनाचा वाटा जास्त आहे. यात कोळसा हा सर्वात मोठा स्त्रोत आहे. भारतात ऊर्जा वापरात सध्यस्थित कोळसा (५१%), खनिज तेल (३६%), नैसर्गिक वायू (१०%), जलविद्युत (२०%), अणुऊर्जा (१%) वापरला जातो.

**ऊर्जा सुरक्षेसंबंधी समस्या**

भारताच्या 'ऊर्जा सुरक्षा'संबंधी अनेक आव्हाने आहेत. भारताकडे ऊर्जाचे स्त्रोतात जीवाश्म इंधनावर पूर्णपणे ऊर्जा क्षेत्र अवलंबून आहे याचा परिणाम ऊर्जा निर्भयतेकडे जातो. कारण ही इंधने पुढील काही वर्षानंतर संपुष्टात येणार आहेत. यामुळे शाश्वत स्त्रोत शोधले पाहिजेत. तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणामुळे भारतातील ऊर्जा स्त्रोतावर विपरीत परिणाम घडतो. कारण भारत ८०% नैसर्गिय तेल आयात करते. तसेच भारतात ऊर्जा वितरणात प्रगत तंत्रज्ञानाचा अभाव यामुळे ऊर्जा गळतीची समस्या दिसून येते.

या ऊर्जा समस्यामुळे ऊर्जा सुरक्षेसाठी धोरण आखले पाहिजे. ऊर्जाचे विविध स्त्रोतचा सहभाग व उत्पादन वाढवले पाहिजे. 'ऊर्जा धोरण' प्रभावी अवलंबले पाहिजे. शाश्वत विकासासाठी स्वच्छ ऊर्जा व स्वतः ऊर्जाचे ध्येय निर्माण केले पाहिजे. तरच भारताच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळते. राष्ट्रीय सुरक्षा व ऊर्जा वापरासंबंधी नैसर्गिक संसाधनाची उपलब्धता याच्याशी निगडीत ऊर्जासुरक्षा असते. आधुनिक अर्थव्यवस्थेच्या कार्यपद्धतीत स्वस्त ऊर्जा मिळणे आवश्यक आहे आणि त्यासाठी प्रत्येक देश प्रयत्न करत असतो. पण ऊर्जाचे देशामध्ये असमान वितरण व पुरवठा यामुळे देशाला ऊर्जासुरक्षतेसंबंधी प्रयत्न करावे लागतात. ऊर्जा सुरक्षतेच्या माध्यमातून विकासाला चालना मिळते.

यामुळे 'ऊर्जा पुरवठा सुरक्षीत करणे' हे प्रत्येक देशाचे ध्येय असते.

भारताला 'ऊर्जा सुरक्षेची' गरज आहे. कारण भारताच्या विकासाला चालना मिळणे, ऊर्जेशिवाय विकास नाही. भारतीय समाजाच्या सामुहिक प्रगतिसाठी ऊर्जा आवश्यक आहे. भारतीय अर्थव्यवस्था व मानवी विकासाच्या निरंतर वाढीवर ऊर्चाचा परिणाम घडतो. त्यामुळे ऊर्जाचे बहु आयामी पैलू हे राष्ट्रीय सुरक्षाचे कारण बनले आहे. राष्ट्रीय सुरक्षता आर्थिक सुरक्षीता, पर्यावरण सुरक्षीतता या तीन्हीचा मध्यबिंदू ऊर्जा सुरक्षा आहे.

ऊर्जा स्त्रोताचे प्रकार

ऊर्जा ही पारंपारिक व अपारंपारिक घटकामध्ये विभागलेली असते. ऊर्जेच्या पारंपारिक स्त्रोतामध्ये कोळसा, पेट्रोलियम, नैसर्गिक वायू इ. समावेश होतो. तर अपारंपारिक स्त्रोतात सौर ऊर्जा, वारा, भू-तापीय ऊर्जा, बायोगॅस याचा समावेश होतो.

ऊर्जाचे दुसरे वर्गीकरणात कॉइल, तेल, हायड्रो, परमाणु इत्यादीचा वापर होतो हे व्यवसायीकपणे वापरण्याची ऊर्जासाधने आहेत. तर चारकोल, लाकूड, गायशेण, पशुकचरा इ. बिगर व्यवसायिक ऊर्जास्त्रोत आहेत.

देशामधील एकूण ऊर्जा मिश्रणात प्रामुख्याने जीवाश्य इंधनाचा जास्त वापर होतो. त्यात 'कोळसा' हा प्रमुख ऊर्जा साधन आहे. देशातील एकूण विद्युत निर्मितीत ६१% पेक्षा जास्त ऊर्जा कोळशाच्या माध्यमातून प्राप्त होते. या जीवाश्य इंधनात गॅसचा सहभाग घेतल्यास ७०% पर्यंत पोहचते. तरीपण अलिकडील नूतनीकरणक्षम ऊर्जाची भागीदारी वाढत आहे. देशात ती १३% आहे. तर २% परमाणु ऊर्जा आहे.

**ऊर्जाची वाढती मागणी**

भारत सर्वात वेगाने वाढत जाणारी अर्थव्यवस्था आहे. भारताचा GDP 7.6% असून जगात ३ अर्थव्यवस्था म्हणून याचा उदय होत आहे. २००६-१० च्या काळात भारतातील प्राथमिक ऊर्जाची मागणी ८.३% होती. वाढत्या अर्थव्यवस्थेची गरज लक्षात घेता ही मागणी वाढतच आहे. ऊर्जाची सर्वात जास्त मागणी आज उद्योग क्षेत्रातून येते. ही वाढती ऊर्जा मोठ्या जलविद्युत प्रकल्पातून पुरवली जात असली तरी. जीवाश्म इंधनाचा भार कमी झाला नाही. तसेच हा भार वाढतच जाणार आहे तो ५ पटीने वाढेल कारण आज फक्त उद्योग क्षेत्रच नाही तर सेवा क्षेत्र, कृषी, दूरसंचार इ. क्षेत्रात ऊर्जाची मागणी वाढत आहे. २०२० पर्यंत भारताला ग्रामीण विद्युतीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण करायचे आहे.

**भारताची ऊर्जा सुरक्षा**

भारताच्या ऊर्जा वापराचा हिस्सा जगातील ऊर्जा वापराच्या ३.५% एवढा आहे. २०३१ पर्यंत तो १०% होण्याची शक्यता आहे. एकूण ऊर्जा निर्मितीत १०४८ अब्ज युनिट गरज होती. १२ व्या

पंचवार्षिक योजनेत भारताने ८८५३७ मेगावॅट क्षमतेची गरज वाढवण्याचे लक्ष दिले.

भारताने ऊर्जा सुरक्षाच्या दृष्टिने २००९-१० ला ७७१.५५१ मेगावॅट लक्ष होते तर आता २०१५-१६ ला ११०७.०२२ मेगावॅट लक्ष पूर्ण केले आहे. भारताने आपली ऊर्जा क्षमता वाढवली आहे. तसेच २००८ मध्ये कोळशावर आधारित वीज निर्मिती क्षमता ७६ GW वर नेण्याचे उद्दिष्ट ठरवले आहे.

भारतात ऊर्जा स्त्रोतचे कोळसा हे मुख्य भंडार असून दुसरे थर्मल ऊर्जा आहे. भारताचे कोळशाचे साठे असले तरी आयातीचा पर्यायही स्विकारला आहे. तसेच तेल व गॅस, जीवाश्म इंधन.

## ❒ सागरी सुरक्षा :-

आशिया खंडातील भारताचे स्थान व महत्त्व सागरी सुरक्षेच्या अंगाने अत्यंत महत्त्वाचे आहे. भारताला ७५०० कि.मी. लांबीचा विस्तीर्ण समुद्र किनारा लाभलेला आहे. भारताच्या पश्चिमेला- अरबी समुद्र, दक्षिणेला- हिंदी महासागर तर पूर्वेला- बंगालचा उपसागर आहे. पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवर भारतीय संघराज्यातील अनेक महत्त्वाची व्यापारी बंदरे आहेत. पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवर भारतीय संघराज्यातील अनेक महत्त्वाची व्यापारी बंदरे आहेत. पूर्व किनारपट्टीवर ओडिसा, आंध्रप्रदेश, तामिळनाडू तर पश्चिम किनारपट्टीवर गुजरात, महाराष्ट्र, केरळ, गोवा, कर्नाटक यासारखी प्रगत राज्ये वसलेली आहेत. भारतीय सागरी किनारपट्टीवरील मुंबई, विशाखापट्टणम, मार्मागोवा, कारवार, लक्षद्वीप इ.बंदरे आर्थिक व औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाची आहेत.

ऑस्ट्रेलिया, जपान, श्रीलंका, इराण, मालदीव यासहित अनेक विकसित व विकसनशील राष्ट्रांशी भारताचा व्यापार, आयात-निर्यात, सागरी मार्गाने होते. किंबहुना आपण जर भारतीय उपखंडातील भारताचे भौगोलिक स्थान सूक्ष्मपणे अभ्यासल्यास असे लक्षात येते की, हिंदी महासागरातील व बंगालच्या उपसागरात भारताचे प्रभावक्षेत्र व्यापक स्वरूपाचे आहे. लक्षद्वीप आणि अंदमान-निकोबार ही बेटे व भारतीय संघराज्याचे केंद्रशासित प्रदेश सागरी क्षेत्रात वसलेली आहेत.

सध्या आपल्या देशांमध्ये सागरी सुरक्षेसाठी भारतीय संरक्षण दलाच्या दोन यंत्रणा कार्यरत आहेत. (१) भारतीय नौदल (२) भारतीय तटरक्षक दल. भारतीय भू-सीमेपासून समुद्रातील १२ मैलापर्यंतच्या सागरी सुरक्षेची जबाबदारी तटरक्षक दलाकडे असते, तर १२ मैलापासून पुढे खोल समुद्रात भारतीय नौदल सुरक्षेची जबाबदारी पाडते. भारताला सागरी सुरक्षेच्या दृष्टीने दुहेरी स्तरावर सज्ज रहावे लागते. यामध्ये मानवनिर्मित धोके उदा. चाचेगिरी, दहशतवादी हल्ले, चोरटी आयात, तस्करी इ. याबरोबर नैसर्गिक आपत्तींनाही तोंड द्यावे लागत आहे. नैसर्गिक आपत्तींमध्ये त्सुनामी, महापूर, चक्रीवादळे इ. विनाशकारी सागरी आपत्तींचा सामना करावा लागत आहे.

## ❒ भारताची सागरी संरक्षण सज्जता

भारतीय नौदल ब्रिटिशकाळापासून सागरी सुरक्षेची जबाबदारी सांभाळत आहे. तत्पूर्वी छ. शिवाजी महाराजांच्या काळात १६व्या शतकांत सागरी आरमाराची निर्मिती झाली आहे. छ. शिवरायांनी उभे केले जलदुर्ग व नाविक दल ही भारतीय नौदलाची पायाभरणी आहे. भारतीय नौदलाच्या सक्षमीकरणासाठी भारत सरकारने विशेष प्रयत्नांतून वाटचाल सुरू केली. भारताची सागरी संरक्षण सज्जता स्वदेशी प्रयत्नांबरोबर मित्रराष्ट्रांच्या मदतीवर उभारलेली आहे. रशिया, फ्रान्स, ब्रिटन, अमेरिका यासारख्या तंत्रसमृध्द देशांनी भारताला नाविक साधन-साहित्य दिलेली आहेत. उदा. विमानवाहू युध्द नौका, पाणबुडी.

सद्या भारताचे पूर्व व पश्चिम किनारपट्टीवर सुसज्ज असे नाविक तळ आहेत. उदा. मुंबई विशाखापट्टणम, गोवा अलीकडेच मुंबई येथे माझगांव डॉकवर कलवरी या स्वदेशी बनावटीच्या युध्दनौकेचे अनावरण करण्यात आले. यासह आज भारताकडे ६ आण्विक पाणबुड्या आहेत. हिंदी व प्रशांत महासागरातील व्यापार-दळणवळणाच्या सुलभतेसाठी भारतीय नौदलाची विशेष पथके कार्यरत आहेत. चीनी नौदलाच्या भारतीय समुद्र हद्दीतील हस्तक्षेपालाही भारतीय नौदलाने आळा घालण्याचे कार्य सुरू ठेवले आहे. नायजेरिया व कांगोमधून समुद्रातील व्यापारात चाचेगिरी करणाऱ्या गटांना नौदलाने नियंत्रित ठेवले आहे. रशियाकडून 'चक्र' ही पाणबुडी भाडेतत्त्वावर आपण घेतली आहे. खाजगी व विदेशी कंपन्यांच्या सहाय्याने सध्या ३४ नौकांची बांधणी सुरू आहे.

## स्वयं-अध्ययन प्रश्न-१

### ❒ एका वाक्यात उत्तरे लिहा?

१. भारताच्या राष्ट्रीय सुरक्षात कोणत्या दलांचा समावेश होतो?

२. भारताला किती किलोमीटरचा समुद्र किनारा लाभला आहे?

३. भारतीय संरक्षण दलात कोणत्या दोन यंत्रणा कार्यरत आहेत?

४. भारताकडे आज किती आण्विक पाणबुड्या आहेत?

५. भारताने रशियाकडून कोणती पाणबुडी भाडेतत्त्वावर घेतली आहे?

## ४.२.२ अण्वस्त्र प्रसार

भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसमोर बदलत्या जागतिक परिस्थितीत अनेक प्रकारची आव्हाने निर्माण झालेली आहेत. आज राष्ट्रां-राष्ट्रातील युध्दाच्या व संघर्षाच्या पारंपारिक संकल्पनाही बदलत्या आहेत. आज थेट युद्धभूमीवर युद्ध न करताही एखादे राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राचे अमर्याद नुकसान घडवून आणू शकते. आज आपण आपल्या दैनंदिन जीवनातील घटना-घडामोडीकडे गांभीर्याने बघितल्यास

असे लक्षात येते की, आपल्याला पदोपदी अनेक संकटाना सामोरे जावे लागते. आज मानवी जीवन जितके प्रगत व तंत्रसमृध्द झाले तितकेच तणावाचे व स्पर्धामय बनले आहे. युद्ध किंवा हल्ला करण्यासाठी लागणारी पारंपारिक शस्त्रे-साधने कालबाह्य होवून नवनवीन रासायनिक व आण्विक शस्त्रे तयार झाली आहेत. विकसित व विकसनशील अशा दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांकडे अण्वस्त्रे आहेत. १९४५ साली जपानवरील आण्विक हल्ल्यानंतर अमेरिकेच्या आण्विक शक्तीची जगाला प्रचिती आली. त्यानंतर रशिया, फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड, चीनसारखी राष्ट्रे ही अण्वस्त्रसज्ज बनली.

भारत आणि पाकिस्तान ही आशियातील दोन राष्ट्रे अण्वस्त्रसज्ज बनली आहेत. इराण व उ.कोरियाचे आण्विक प्रकल्प जागतिक पातळीवर वादग्रस्त बनले आहेत. पाकिस्तान काश्मीर प्रश्नावरून भारताला आण्विक युध्दाची धमकी दिली आहे. आज भारताकडे अण्वस्त्रे असली तरी भारताने आपला अणु ऊर्जा प्रकल्प हा वीजनिर्मिती व नागरी कारणासाठी स्थापित केला आहे. तसेच भारताने कोणत्याही राष्ट्राविरुध्द आपण प्रथम अण्वस्त्रांचा वापर करणार नसल्याचे घोषित केले आहे. तरीदेखील आज पाकिस्तानमधील लष्कर व धार्मिक कट्टरतावाद्यांनी तेथील दहशतवादी गटांशी असलेली सांगड लक्षात घेता आपल्या राष्ट्रीय सुरक्षेसमोर गंभीर स्वरूपाचे धोके निर्माण झाले आहेत. अमेरिका व उ. कोरिया दरम्यान आण्विक चाचणीवरून युध्दसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. युनो व इतर आंतरराष्ट्रीय संघटनेच्या माध्यमातून आण्विक शस्त्रे नियंत्रणासाठी सातत्याने प्रयत्न चालू आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर आपण अण्वस्त्रे प्रासर व नियंत्रणाचा आढावा घेणार आहोत.

## ❒ अण्वस्त्रांच्या नियंत्रणासाठी झालेले विविध करार

अण्वस्त्रप्रसार नियंत्रण म्हणजे दोन किंवा त्यापेक्षा अधिक राष्ट्रांनी द्विपक्षीय किंवा बहुपक्षीय कराराअंतर्गत अण्वस्त्रे स्पर्धा थांबवणे. अण्वस्त्रांच्या साठ्यामध्ये कपात करण्यासाठी केलेले प्रयत्न. अशा प्रकारचे प्रयत्न शीतयुध्दोत्तर काळात अमेरिका व रशिया दरम्यान चालू झालेत. आण्विक युद्धातील अमर्याद विनाश टाळण्यासाठी अमेरिका व रशिया दोन्हीं राष्ट्रांनीही अण्वस्त्रांच्या साठ्यात कपात करण्याचा निर्णय घेतला. या निर्णया अंतर्गत पुढील करार झाले.

1) 1963 : Limited test band Traty
2) 1967 : Outer Space Treaty.
3) 1972 : Anti Ballestic Trenty.
4) 1972 : Strategic Aarms Limitation Treaty.
5) 1987 : Intermidiate Nuclear Forces Treaty.

वरील करारांबरोबर १९९१ साली अमेरिका व रशिया दरम्यान Strategic Aarms Reduction

Traty करार होवून अण्वस्त्रांच्या साठ्यात ३०% कपात करण्याचा निर्णय झाला. १९९२ साली याच कराराच्या दुसऱ्या टप्प्यानुसार ही कपात ५०% पर्यंत पोहचली.

## ❒ सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करार–१९९६

शीतयुद्धोत्तर काळात अण्वस्त्रांचा प्रसार रोखण्यासाठी एक बहुपक्षीय पातळीवरील मोठा प्रयत्न घडून आला. सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करार हा भविष्यातील अणुचाचण्या रोखण्यासाठी आहे. करारावर सह्या करणाऱ्या राष्ट्राला भविष्यात अणुचाचणी करता येत नाही. अमेरिकेत या करारावर स्वाक्षरी केलेली नाही. तर २००० मध्ये रशियाने या करारास मान्यता दिली आहे. या कराराबरोबर इतरही काही करार झालेले आहेत. १९७० सालापासून Nuclear non-proliferation Treaty (NPT) हा करार अस्तित्वात आला आहे. भारत वरील कराराचा सदस्य नाही.

## ❒ दक्षिण आशियातील अण्वस्त्र स्पर्धा :–

भारत आणि पाकिस्तान या दोन दक्षिण आशियातील पारंपारिक शत्रु राष्ट्रांनी अणुपरीक्षण करत स्वत:ला अण्वस्त्रधारी राष्ट्रे म्हणून घोषित केले. या घोषणेनंतर दक्षिण आशियात एक नवीन अण्वस्त्र स्पर्धा निर्माण झाली. दोन्ही राष्ट्रांतील पारंपारिक संघर्षाची तीव्रता लक्षात घेता एक छोटा संघर्षही अणुयुद्धाचे रूप धारण करू शकतो. परिणामी, याला दक्षिण आशियातील 'Nuclear Flash Point' चे रूप आलेले आहे. भारतातील प्रबळ व प्रगल्भ लोकशाहीची परंपरा तसेच भारताच्या जबाबदार व शांततामय परराष्ट्र धोरणांमुळे भारताकडून आण्विक कार्यक्रमांबाबत कोणतेही बेजबाबदार/बेकायदेशीर कृत्य होणे शक्य नाही. भारताची अण्वस्त्रे बचावासाठी आहेत. 'No First Use' हे भारताचे स्पष्ट धोरण आहे. भारताने आजपर्यंत अपवाद वगळता सर्व आंतरराष्ट्रीय कायदे व नियमांचे पालन केले आहे. भारताने काणत्याही इतर राष्ट्राला अण्वस्त्रे अणुसाहित्य किंवा तंत्रज्ञान अवैधरित्या पुरवलेले नाही. म्हणूनच आज भारताकडे आंतरराष्ट्रीय समुदाय एक ‘जबाबदार अण्वस्त्रधारी राष्ट्र’ म्हणून पाहतो. २०१५ पासून भारताने 'Nuclear Supply Group' चे सदस्यत्व मिळवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना अमेरिका, जपानसारख्या राष्ट्रांनी पूर्ण समर्थन दिले आहे.

पण आपल्या शेजारी राष्ट्र पाकिस्तानची भूमिका अगदी विरुध्द आहे. पाकने अण्वस्त्र विकसित केली असली तरी त्यांचे संरक्षण करणे पाकला अवघड बनले आहे. पाकमधील अल्पजीवी व नामधारी लोकशाही, लष्कराच्या अतिरेकी हस्तक्षेप, धार्मिक मूलतत्त्वाचा प्रभाव व दहशतवाद्यांचे उगमस्थान या बाबी लक्षात घेता पाकमधील आण्विक सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. अस्थिर राजकीय स्थितीमुळे पाकमधील अण्वस्त्रांचा ताबा दहशतवादी गटाकडे जाण्याची शक्यता आहे. याचा सर्वाधिक धोका भारतीय सुरक्षेला निर्माण झाला आहे. तसेच काश्मीर प्रश्नावरून पाक लष्कराने भारताला आण्विक हल्ल्याची धमकी दिली आहे.

## ❐ भारत आणि पाकिस्तानमधील आण्विक समस्या :-

दक्षिण आशियातील दोन मोठी राष्ट्रे भारत आणि पाकिस्तानने १९९८ साली अणुपरीक्षण करून स्वत:ला उघडपणे अण्वस्त्रधारी राष्ट्रे म्हणून घोषित केले आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर नव्या २ अण्वस्त्रधारी राष्ट्रांची भर पडली. दक्षिण आशियात नवी शस्त्रास्त्र स्पर्धा वाढली. सध्या पाककडे ३०-४० इतकी अण्वस्त्रे तर भारताकडे ५० ते ७५ इतकी अण्वस्त्रे आहेत. सन २००४ साली पाकच्या अणुकार्यक्रमाचे जनक ए. क्यु. खान यांचे अणुतंत्रज्ञान चोरट्या मार्गाने विक्री करण्याचे जाळे उघडकीस आले. पाकला अणुतंत्रज्ञानाच्या बेकायदेशीर व्यापारातून मोठा आर्थिक नफा मिळत असल्यामुळे पाक लष्कर व गुप्तहेर संस्थानी गैरमार्गाने आण्विक व्यापार केलेला आहे. या बेकायदेशीर अणुतंत्रज्ञानाचा फायदा इराण, उ. कोरिया आणि लिबिया सारख्या राष्ट्रांना झाला आहे.

भारताकडून आण्विक तंत्रज्ञानाबाबत कोणतीही बेकायदेशीर कृती होत नाही, परंतु पाकमधील अण्वस्त्रे तेथील भारतविरोधी दहशतवादी गटांकडे हस्तांतरित झाल्यास त्याचा सर्वाधिक गंभीर धोका भारताला आहे. त्यामुळे पाकच्या अण्वस्त्रांची सुरक्षा हा चिंताजनक विषय बनला आहे. आज पाकसारखे बेभरवशाचे राष्ट्र अण्वस्त्रधारी होणे याला अमेरिकेचे दुटप्पी धोरणही कारणीभूत आहे. कारण पाकने १९८६ च्या दशकापासून अणुबॉम्ब बनवण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान प्राप्तीसाठी प्रयत्नशील होते. अमेरिकेने पाकमधील आपले सामरिक व राजकीय हितसंबंध गृहीत धरून पाकच्या दुष्कृत्यांकडे डोळेझाक केले. तसेच पाकच्या अणुबॉम्ब निर्मितीसाठी १९८० पासून चीनने आवश्यक साधनसामग्री पुरवली आहे. वास्तविक चीनने अण्वस्त्रप्रसार बंदी करारावर स्वाक्षरी केलेली असतानाही पाकला अण्वस्त्रे बनवण्याचे तंत्रज्ञान पुरवले आहे. अमेरिका वा चीनच्या या दुटप्पी व स्वार्थी धोरणांचा फटका भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेला निर्माण झाला आहे. काही अभ्यासकांना पाकमध्ये धार्मिक क्रांतीची शक्यता वाटते. अशी क्रांती झाल्यास धार्मिक मूलतत्त्ववादाच्या प्रभावाखाली असणाऱ्या पाक लष्कराकडून दहशतवादी गटांना अण्वस्त्रे दिली जाण्याची शक्यता आहे. पाकिस्तानची अर्थव्यवस्था डबघाईला आल्याने पाककडे अणुप्रकल्पांची सुरक्षा व्यवस्था करण्यासाठी आवश्यक तेवढा पैसा उपलब्ध नाही.

## स्वयं-अध्ययन प्रश्न-२

### ❐ रिकाम्या जागा भरा.

१. 'Limited test band Traty' करार ............. साली झाला.

२. १९९६ ला अण्वस्त्र चाचणीबाबत ............ करार झाला.

३. भारत हे .............. राष्ट्र आहे.

४. पाकिस्तानच्या ............ शास्त्रज्ञाने अणु तंत्रज्ञान चोरट्या मार्गाने विकले.

## ४.२.३ दहशतवाद

### ❐ प्रस्तावना :-

भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसमोरील सर्वात मोठा धोका हा दहशतवादाचा आहे. अमेरिकेसारख्या बलाढ्य महासत्तादेखील या समस्येला बळी पडल्या आहेत. आज आंतरराष्ट्रीय समुदायापुढची सर्वात गंभीर समस्या म्हणून दहशतवादाचा उल्लेख केला जात आहे. दहशतवादी हिंसाचारात प्राण गमावलेल्या लोकांची संख्या लाखात आहे. आपल्या जम्मू-काश्मीर राज्यामध्ये सन १९८९ पासून ९० हजार लोक दहशतवादी हिंसाचारामध्ये मारले गेले आहेत. दहशतवादाला तोंड देण्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक करार गेल्या काही वर्षात झाले आहेत.

भारतातील दहशतवाद हा पाकपुरस्कृत आहे. भारताला शेजारील राषट्रांकडून प्रसार करण्यात आलेल्या दहशतवादी हिंसाचाराला सातत्याने तोंड द्यावे लागत आहे. २००८ साली मुंबईवरील दहशतवादी हल्ला हा पाकिस्तान प्रायोजित होता. भारताशी थेट युद्ध करू शकत असल्याने पाकिस्तानने या दहशतवादी मार्गाचा वापर केला आहे. १९७१ साली बांगलादेशची निर्मिती काश्मीर प्रश्न, पाकिस्तानमधील मूलतत्त्ववादी कट्टर धार्मिक दहशतवादी संघटना या प्रमुख कारणांमुळे आज भारताला राष्ट्रीय सुरक्षेचा विचार करताना दहशतवादाला अधिक गांभीर्याने तोंड द्यावे लागत आहे.

### ❐ अर्थ आणि स्वरूप :-

दहशतवाद ही गुंतागुंतीची आणि वादग्रस्त संकल्पना आहे. विचारवंत आणि राष्ट्रां-राष्ट्रांमध्ये ही दहशतवादाच्या व्याख्येविषयी मतभेद आहेत. काही प्रसंगी एखादे राष्ट्र ज्या व्यक्तीला किंवा गटाला दहशतवादी म्हणून संबोधते, त्याच व्यक्तीला दुसरे राष्ट्र स्वातंत्र्यसैनिक असे संबोधते. उदा. बुरहान वाणी (पाकिस्तान) सामान्यपणे राजकीय उद्दिष्ट्य प्राप्तीसाठी हिंसेच्या, साधनाचा वापर' अशी दहशतवादाची व्याख्या करता येईल. दहशतवादी भीती, दरारा आणि अनिश्चिततेचे वातावरण तयार करून काही उद्दिष्ट्ये प्राप्तीसाठी शासनावर, लोकमतावर दबाव आणतात. यासाठी हत्या बॉम्बस्फोट, अपहरण या साधनांचा अवलंब केला जातो.

### ❀ दहशतवादाची वैशिष्ट्ये :-

दहशतवादाची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात येतील.

१) दहशतवादी आपली उद्दिष्ट्यपूर्ती साध्य करण्यासाठी नियोजनपूर्वक हिंसात्मक साधनांचा वापर करतात.

२) अपहरण, खून, घातपात, गोळीबार या मार्गाने शासन व नागरिकांवर दबाव निर्मिती करणे.

३) आपल्या मागण्या, प्रश्नांना प्रसिध्दी मिळवून देण्यासाठी दहशतवादी संघटना विविध तंत्राचा वापर करतात. उदा. विमान अपहरण.

४) प्रस्थापित व स्थिर राजकीय व्यवस्थेत दहशतीतून अस्थिरता निर्माण करणे. सन २००० सालचा भारतीय संसदेवरील हल्ला.

५) दहशतवादी संघटना आपल्या उद्दिष्टांना जनसमर्थन प्राप्त करण्यासाठी वेगवेगळ्या विचारसरणीचा आधार घेतात. उदा. धार्मिक, वांशिक अल्पसंख्यांकाच्या मानवी अधिकारांचे संरक्षण.

## ❀ दहशतवादाची उद्दिष्ट्ये :–

दहशतवादी संघटनाची उद्दिष्ट्ये भिन्न असतात. सर्वसाधारणपणे पुढील उद्दिष्ट्ये सांगता येतील.

१) राजकीय स्वातंत्र्यप्राप्ती किंवा दहशतवादी कारवायांच्या माध्यमातून स्वतंत्र आणि सार्वभौम राज्य निर्मितीसाठी अनेक संघटना आज कार्यरत आहेत. उदा. हमास–पॅलेस्टाईन, LTTE-श्रीलंका.

२) अनेक दहशतवादी संघटना धार्मिक व वांशिक प्रेरणांचा आधार घेतात. उदा. अल कायदा, हिजबुल मुजाहिद्दीन या संघटना धार्मिक भावनेने प्रेरित होतात.

३) काही दहशतवादी संघटना राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक स्वरूपाच्या अन्यायाचा सूड घेणे यासाठी कार्यरत असतात. उदा. जैश–ए–मोहम्मद.

४) बऱ्याचदा अवास्तव व अतिरेकी स्वरूपाच्या मूलग्रही राजकीय व सामाजिक परिवर्तनासाठी काही दहशतवादी संघटना सक्रिय असतात. उदा. 'शरियत' कायद्याची सर्वत्र स्थापना करणे.

## ❀ दहशतवादाचे प्रकार :–

जगभरातील दहशतवादी संघटनाची कार्यक्षेत्र, त्यांची उद्दिष्ट्ये, कार्यप्रणाली या आधारावर दहशतवादाचे प्रमुख ५ प्रकार पडतात.

१) राष्ट्रीय पातळीवरील दहशतवाद.

२) आंतरराष्ट्रीय पातळीवरील दहशतवाद.

३) सीमापार दहशतवाद.

४) राज्यपुरस्कृत दहशतवाद.

५) धार्मिक आणि वांशिक भावनेने प्रेरित दहशतवाद.

वरीलप्रमाणे दहशतवादाचे प्रकार सध्या जगभरात आढळून येतात.

## ❒ भारतासमोरील दहशतवादाचे आव्हान :-

आज जगातील विकसित, विकसनशील व अविकसित अशी सर्व प्रकारची राष्ट्रे दहशतवादाला तोंड देत आहेत. भारत हा ही एक दहशतवादाची झळ बसलेला देश आहे. दक्षिण आशियातील भारताचे भौगोलिक स्थान आणि भारताची बहुआयामी धार्मिक, भाषिक, वांशिक आणि सामाजिक ओळख या बाबी ही काही प्रमाणात दहशतवादाला बळ देतात. स्वातंत्र्यप्राप्तीपासूनच भारताला पाकिस्तान हे शत्रू राष्ट्र लाभलेले आहे. काश्मीरच्या भूभागावरील ताब्यावरून भारत आणि पाकिस्तानमध्ये संघर्ष निर्माण झाला. वास्तविक काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असूनदेखील पाकिस्तानने त्यावर आपला मालकीहक्क सांगितला आहे. काश्मीर प्रश्नांवरून पाकिस्तानने गेल्या ६ दशकांत भारतात दहशती कारवाया चालू ठेवल्या आहेत.

पाकिस्तानस्थित पुढील दहशतवादी संघटना भारतामध्ये दहशतवादी कारवाया चालू ठेवण्यासाठी सक्रिय आहेत. (१) लष्कर-ए-तोयबा.

(२) जैश-ए-मोहम्मद.

(३) तेहरिक-ए-तालिबान.

(४) हिजबूला मुजाहिद्दीन

(५) अल-कायदा.

सध्या इराक व सीरियामध्ये हिंसाचार घडवणारी इसिस (Islamic State of Iraq and Syria) या संघटनेचाही भारताला धोका आहे. इसिस या क्रूर व निर्दयी दहशतवादी संघटनेने ईस्लामी देशांबरोबर युरोपीयन देशांतही हल्ले घडवून आणले आहेत. भारतातील महाराष्ट्र, केरळ, उत्तरप्रदेश या राज्यातील अनेक युवक इसिसकडे आकर्षित झाल्याचे तपास यंत्रणांनी उघड केली आहे. या बाबी भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी अत्यंत घातक आहे.

देशाच्या माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांची १९८४ साली खलिस्तानी दहशतवाद्यांनी हत्या केली. तसेच मे १९९१ साली माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची श्रीलंकेतील तामिळ दहशतवादी गट LTTE ने हत्या केली. ही दोन दुर्दैवी प्रकरणे भारतासमोरील दहशतवादाच्या आव्हानांचा आवाका स्पष्ट करतात. १३ डिसेंबर २००१ रोजी पाक दहशतवाद्यांनी भारताच्या संसदेवर हल्ला घडवून आणला. यापूर्वी १९९३ साली मुंबईत शेकडो निष्पापांचे प्राण घेणाऱ्या बॉम्ब स्फोटाची मालिका घडवून आली.

भारतीय रेल्वे ही सर्वसामान्यांची प्रवासवाहिनी असल्याने आजवर अनेकदा दहशतवाद्यांनी

रेल्वेमध्ये साखळी बॉम्बस्फोट घडवून आणले. सामान्य जनतेच्या मनात भीती व अस्वस्थता निर्मितीसाठी भारतीय रेल्वे, सार्वजनिक बाजारपेठा, शासकीय कार्यालये, प्रार्थना स्थळे व इतर गर्दीच्या ठिकाणांना दहशतवादी हिंसाचारासाठी लक्ष्य करतात. यासाठी सदैव दक्ष राहून राष्ट्रीय सुरक्षा भक्कम करणे व गुप्तचर यंत्रणाचे जाळे सक्रिय ठेवणे या बाबी अत्यावश्यक आहेत. सध्या भारताने दहशतवादाविरोधात ''शून्य सहानुभूती'' या कठोर भूमिकेचा स्वीकार केला आहे.

### ❒ भारताचे दहशतवादाविरोधातील प्रतिबंधात्मक उपाय :-

भारताने आपल्या सुरक्षा यंत्रणा सक्षम करण्याबरोबर दहशतवादाला तोंड देण्यासाठी पुढील उपाययोजना केल्या आहेत.

### १. देशांतर्गत सामाजिक व सांस्कृतिक उपाय :-

यामध्ये शासन देशातील सर्व धर्मीय व समाज घटकांना कोणतीही भेदभाव व उपेक्षेची वागणूक न देता सर्वांना विकास व प्रगतीची समान संधी दिली जाते. कोणताही वंश, धर्म उपेक्षित व मागास राहून त्या समाजामध्ये परकेपणाची भावना निर्माण झाल्यास तो समाजघटक गुन्हेगारी कृत्यात सहभागी होण्याचा धोका असतो.

भारतात धर्मनिरपेक्षता व परधर्म, सहिष्णूता या तत्त्वांचा स्वीकार करत सर्वांमध्ये प्रेम, जिव्हाळा व बंधुभाव वाढावा. यासाठी सर्व स्तरावर विशेष काळजी घेतली जाते. दारिद्र्य, गरीबी व बेरोजगारी या सामाजिक समस्या ही तरुणांना विचलित करतात. यासाठी शासनस्तरावरून विविध प्रोत्साहनपर योजना सुरू आहेत.

### २. राजकीय उपाययोजना :-

भारतात केंद्र सरकारने आपल्या मित्र राष्ट्रांशी यामध्ये रशिया, इस्रायल, अफगाणिस्तान, जर्मनी, फ्रान्स, बांगलादेश या राष्ट्रांसोबत आंतरराष्ट्रीय पातळीवर दहशतवादाचे निर्मूलन सामूहिकरित्या करार केले आहेत. या अंतर्गत दोन राष्ट्रे दहशतवादाला रोखण्यासाठी परस्पर माहिती व तंत्रज्ञानाची देवाणघेवाण करतात.

भारतातील युवावर्ग वाममार्गाला लागू नये यासाठी उच्चशिक्षण व रोजगाराची संधी देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी देशांतर्गत दहशतवाद-फुटीरतावादाला आळा घालण्यासाठी आसाम, मिझोराम, पंजाब या राज्यांशी शांततेचे करार केले.

### ३. सुरक्षा यंत्रणाची बळकटी :-

सध्या भारतीय लष्कर, नौदल, वायुदल सीमापार दशहतवादाला-घुसखोरीला समर्थपणे तोंड

देत आहे. भारतीय लष्कराने अनेक दहशतवादी-घुसखोर हल्ले निष्प्रभ ठरवलेत. देशांतर्गत फुटीरतावादी संघटनाच्या हिंसाचाराला सामोरे जाण्याचे कार्य निमलष्करी दले करतात. उदा. CRPF, CISF.

ईशान्येकडील राज्यातील व काश्मीरमधील हिंसाचाराला भारतीय सुरक्षादलांनी आजपर्यंत प्राणांचे बलिदान देत तोंड दिले आहे. आपल्या सुरक्षादलांकडे अजूनही अमेरिका, ब्रिटन, इस्रायल या राष्ट्रांकडे असणारे प्रभावी व अत्याधुनिक तंत्रज्ञान पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही. आपल्या जवानांची प्राणहाणी टाळण्यासाठी अधिक नाविण्यपूर्ण अशा शस्त्रे व साधन-साहित्याची गरज आहे. आपल्या सुरक्षा यंत्रणा उपलब्ध साधनसामग्रीच्या सहाय्याने ही दहशतवादाला चोख प्रत्युत्तर देत आहेत.

**४. गुप्तचर यंत्रणा :-**

दहशतवादी गट व संघटना आपली कट-कारस्थाने गुन्हेगारी कृत्ये गुप्तपणे चोरट्या मार्गाने करत असतात. भारतीय गुप्तहेर यंत्रणा जगभरात सक्रीय आहे. रॉ ही गुप्तहेर संघटना संपूर्ण जगभरात भारताच्या सुरक्षेसाठी कार्यरत आहे. तर आयबी (IB) देशांतर्गत गुप्तहेर यंत्रणाचे कार्य करते. आपल्या गुप्तचर यंत्रणा सक्षमपणे यशस्वी झाल्यास दहशतवादी कट हाणून पाडता येतात. भारतीय लष्कराच्याही स्वतंत्र गुप्तहेर यंत्रणा कार्यरत आहेत.

**५. राष्ट्रीय तपास संस्था (NIA) :-**

२००८ सालच्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने दहशतवादी हल्ल्यांचा स्वतंत्र तपास व्हावा यासाठी राष्ट्रीय तपास संस्था स्थापन केली. NIA मार्फत आज दहशतवादी गट-संघटना व त्यांच्याशी निगडीत सर्व घटकांचा विशेष तपास सुरू केला आहे. NIA च्या माध्यमातून आपण दहशतवादाला पूर्वतयारीने तोंड देवू शकतो. NIA ने दहशतवादी संघटनाची आर्थिक रसद तोडण्याची योजना राबवली आहे. यामध्ये NIA यशस्वी ठरली आहे.

**६. राष्ट्रीय सुरक्षा दल (NSG) :-**

१९८४ पासून भारतीय लष्कराची विशेष प्रशिक्षित शाखा म्हणजे NSG. कोणत्याही स्वरूपाच्या दहशतवादी हल्ल्याला चोख व सडेतोड प्रत्युत्तर देण्याची तयारी NSG ची असते. विशेष करून दहशतवादी हल्ले हाणून पाडण्यासाठीच NSG कार्यरत आहेत.

**७. विशेष अभियान :-**

भारतीय लष्कराने सीमापार पाकव्याप्त काश्मीरमधील व ईशान्येकडील सीमावर्ती-अशांत राज्यातील फुटीर संघटनांना अद्दल घडवण्यासाठी 'लक्ष्यभेदी अभियान' Surgical Strike यासारखी यशस्वी योजना राबवली आहे. उदा. म्यानमारमधील भारताची लष्करी कारवाई.

## ८. सुरक्षा यंत्रणाचा समन्वय :–

लष्कर आणि पोलीस या दोन्ही यंत्रणा आज जम्मू आणि काश्मीरमध्ये संयुक्तपणे अभियान राबवत आहेत. या संयुक्त प्रयत्नांना उत्तम यश लाभलेले आहे.

भारतातील नक्षलवादी हिंसाचाराला तोंड देण्यासाठी निमलष्करी दल व पोलीस छत्तीसगड, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश व झारखंड या राज्यांत एकत्रित काम करत आहेत. उदा. उ–६० पथक कोब्रा बटालियन.

## ९. भारतात दहशतवादी कृत्यांना आळा घालण्यासाठी पुढील कायदे करण्यात आले.

अ) अंतर्गत सुरक्षा कायदा–१९७१.

ब) राष्ट्रीय सुरक्षा कायदा–१९८०.

क) दहशतवाद व अशांततावादी कृतीविरोधी प्रतिबंधात्मक–१९८७, स्थानबध्दता कायदा–१९८७.

ड) दहशतवाद प्रतिबंधक अध्यादेश, २००१,

इ) दहशतवाद प्रतिबंधक कायदा, २००२.

फ) संघटित गुन्हेगारीनियंत्रक कायदा.

### स्वयं-अध्ययन प्रश्न-३

❒ **एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. इसिस ही दहशतवादी संघटना कोणत्या देशात कार्यरत आहे?

२. दहशतवादाचे प्रमुख किती प्रकार पडतात?

३. मुंबईवरील हल्यानंतर कोणत्या यंत्रणेची स्थापना झाली?

४. परराष्ट्रात गुप्त हेरगिरी करणारी भारताची यंत्रणा कोणती?

५. राजीव गांधीची हत्या कोणत्या दहशतवादी गटाने केली?

# ४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

- **NIA :** राष्ट्रीय तपास संस्था
- **LTTE :** Liberation Tigers of Tamil Elam.
- **NSG :** राष्ट्रीय सुरक्षा दल

## ४.४ स्वयं:अध्ययन प्रश्न व उत्तरे

### ❒ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ची उत्तरे

१. भारतीय भूदल, नौदल, हवाई दल, पोलीस यंत्रणा, गुप्तचर यंत्रणा इ. संघटना भारतीय राष्ट्रीय सुरक्षात कार्य करतात.

२. ७५०० कि.मी. समुद्र किनारा.

३. भारतीय नौदल व भारतीय तटरक्षण दल या दोन यंत्रणा.

४. ६ आण्विक पाणबुड्या.

५. रशियाकडून 'चक्र' पाणबुडी भाडेतत्त्वावर घेतली.

### ❒ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

१. १९६३.

२. सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करार.

३. अण्वस्त्रधारी.

४. ए. क्यु. खान.

### ❒ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे

१. इराक व सीरीया.

२. दहशतवादाचे ५ प्रकार पडतात.

३. राष्ट्रीय तपास यंत्रणा.

४. 'रॉ' ही गुप्तहेर संघटना.

५. LTTE ही संघटना.

## ४.५ सारांश

'भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसमोरील सद्यकालीन आव्हाने' या प्रकरणात आपण भारताच्या संरक्षण सज्जतेचा आढावा घेत, ऊर्जा व सागरी क्षेत्राच्या सुरक्षेसाठी असणाऱ्या उपाययोजना व संभाव्य धोक्याचा अभ्यास केला. आजही भारतातील संरक्षण यंत्रणेला निरनिराळ्या प्रकारच्या दहशतवादी कृत्यांना तोंड द्यावे लागत आहे. आपली संरक्षण दले उपलब्ध साधनसामग्रीनिशी आपले कर्तव्य बजावत आहेत. आज पारंपारिक युध्द, संकल्पना बदलून नव्या युद्धनीती बनल्या आहेत. आपल्या

देशाच्या वेगवान आर्थिक प्रगतीला खीळ बसावी. यासाठी शेजारील राष्ट्रांतील दहशतवादी गट सातत्याने सक्रिय असतात. दक्षिण आशियातील पाकिस्तान व भारत दोन्ही देश अण्वस्त्रसंपन्न असल्याने द्विपक्षीय संबंधात सतत तणावाचे व चढ–उताराचे प्रसंग येतात. पाकिस्तान वारंवार शस्त्रसंधीचे उल्लंघन करत असल्याने काश्मीरमध्ये अप्रत्यक्ष व अघोषित युद्धसदृश्य परिस्थिती आहे.

पाकपुरस्कृत दहशतवादाचा व घुसखोरींचा भारताला सर्वात मोठा नुकसानकारक धोका निर्माण झाला आहे. भारतातील मोठी शहरे, आण्विक प्रकल्प, सार्वजनिक ठिकाणे, मंदिरे व प्रार्थना स्थळे, विमानतळ, लष्करी तळ व इतर महत्त्वाची केंद्रे दहशतवादी हल्ल्यांच्या धोक्यामुळे सर्वत्र कडेकोट सुरक्षा व्यवस्था पुरवावी लागते. अशाप्रसंगी प्रशिक्षित मनुष्यबळ, संरक्षण साहित्य–साधने व यंत्रणाची अत्याधुनिक तंत्रे अत्यावश्यक ठरतात. आपल्या संरक्षण दलांच्या अत्याधुनिकीकरणासाठी आपण बऱ्याच प्रमाणात मित्र राष्ट्रांच्या मदतीवर अवलंबून आहोत. पाकिस्तानपेक्षाही चीनच्या वाढत्या आर्थिक व लष्करी शक्तीचा भारताला संभाव्य धोका आहे. तसेच आपल्याकडील वाढत्या लोकसंख्येची इंधन गरज पूर्ण करण्यासाठी अपारंपारिक ऊर्जा स्रोत व अणुऊर्जेची अधिक निकड भासणार आहे.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

❒ **दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. भारताच्या सागरी सुरक्षावर सविस्तर वर्णन करा.

२. भारताच्या अण्वस्त्र धोरणावर भाष्य करा.

❒ **टीपा लिहा.**

१. 'सर्वसमावेशक अणुचाचणी करार' टीप लिहा.

२. 'दहशतवाद' टीप लिहा.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१. डॉ. शैलेंद्र देवळाणकर : 'भारत आणि जग' प्रकाशक – सकाळ पेपर्स, जून २००५

२. व्ही. बी. पाटील : 'भारताचे परराष्ट्र धोरण' के. सागर पब्लिकेशन, पुणे २०००.

३. डॉ. बी. डी. तोडकर : 'भारत आणि जग' डायमंड पब्लीकेशन, पुणे २०१५

❒❒❒